नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६९ * | * नागपूर * | शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## आनंद विवाह कायद्याअंतर्गत करा शीख विवाहांची नोंदणी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :** सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी १७ राज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेशांना १९०९ च्या आनंद विवाह कायद्याअंतर्गत शीख विवाहांसाठी (आनंद कारज) नोंदणी प्रणाली चार महिन्यांत लागू करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने म्हटले की, नियमांच्या अभावामुळे शीख नागरिकांना असमान वागणूक मिळाली आणि संविधानाच्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन झाले. देशभरातील बहुतेक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना हा आदेश लागू होईल ज्यांनी अद्याप नियम बनवलेले नाहीत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## जनहित की प्रसिद्धी प्रीत

आज उच्च न्यायालयाने ॲड. विनीत धोत्रे यांनी केलेली जनहित याचिका फेटाळून लावली. कुणबी आरक्षण मिळवून देण्यासाठी हैदराबाद गॅजेटच्या विरोधातली ही याचिका होती. यामध्ये कुठले जनहित साधण्यासाठी याचिका केली गेली आहे अशी टिप्पणीही उच्च न्यायालयाने केली. आजकाल अशा प्रकारच्या प्रसिद्धीसाठी केलेल्या जनहित याचिका न्यायालयाचा किती वेळ घेतात याचे आता संशोधन झालेच पाहिजे. अगदी लघुवाद न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत हजारो खटले प्रलंबित आहेत, त्यासाठी न्यायालयाचा प्रचंड मोठा वेळ जात आहे? पण म्हणून जनहित याचिका करूच नये असे आमचे म्हणणे मुळीच नाही. मात्र ही जनहित याचिका खरोखरच जनहिताची आहे की नाही याचा गंभीरपणे विचार होणे गरजेचे आहे. कारण जनहित याचिकेद्वारे आपण जे मुद्दे मांडतो ते मुद्दे न्यायालयात टिकतील का याचा विचारही याचिकाकर्त्याने केला पाहिजे. आपल्या न्यायालयांमध्ये आजोबांनी दाखल केलेल्या खटल्याचा निकाल नातू म्हातारा होतो तेव्हा लागतो अशी परिस्थिती आहे. साधारण चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सत्तांतर झाले त्यासाठी रीतसर कोर्टात खटले दाखल करण्यात आले. पण या खटल्यांचा निकाल लागलाच नाही. तत्कालीन सर्वोच्च न्यायालयाचे सर्वोच्च जस्टीस यांनी जो तथाकथित निकाल दिला त्यात एक महत्त्वाचे वाक्य उच्चारले होते. ते असे की, 'जे झाले ते सर्व चुकीचे झाले उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यामुळे आता त्यांना पुन्हा सत्तेवर आणता येत नाही. अन्यथा आम्ही हे सरकार बरखास्त केले असते आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे पुनश्च सत्ता दिली असती' म्हणजेच सर्वोच्च न्यायालय असे म्हणते की हे सरकार बेकायदेशीर आहे. पण तरीही कायद्याने या सरकारला बेकायदेशीर ठरवता येत नाही त्यामुळेच न्यायालय त्यांना सत्तेवरून हटवत नाही. खरे तर तेव्हा ती जनहित याचिका नव्हती ती पक्षहित याचिका होती त्यामुळेच न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांनी आधी निकाल द्यावा अशी टोलेबाजी केली आणि त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी आपला संपूर्ण वेळ घेतला. त्यानंतर तारखांवर तारखा देत नवीन निवडणूक आली आणि याचिकाकर्त्यांच्या हाती सरतेशेवटी भोपळाच आला. आम्ही जनहित याचिका आणि याचिकाकर्त्यांची चर्चा करताना मुद्दामच हे उदाहरण दिलेले आहे. याचे कारण अनेक जनहित याचिका म्हणजे स्वतःचे किंवा आपल्या समाजाचे किंवा पक्षाचे हित किंवा प्रसिद्धी मिळवण्याचे साधन म्हणून या जनहित याचिका दाखल करण्यात येतात, असे वाटले तर ते चुकीचे ठरणार नाही ना. कारण प्रसिद्धीच्या प्रेमापोटी अशाप्रकारे गोष्टी होत असतात हे आता बऱ्यापैकी दिसून येत आहे. अशा प्रकारांमुळे न्यायालयासारख्या संवैधानिक रचनेचा विनाकारण बऱ्यापैकी वेळ जातो. आपल्या देशाव्यतिरिक्त कोणत्याही देशात अशा प्रकरणांमध्ये जगात कुठेही एवढा दीर्घकाळ लागत नाही, विशेष म्हणजे या गोष्टी आता लपून राहिलेल्या नाहीत. त्यातच अशा जनहित याचिकांच्या आधी अनेक माहितीचे अधिकार असतात मग, थोडेसे काही वाटले की टाकला माहितीचा अधिकाराचा अर्ज आणि त्यानंतर काय काय गोष्टी होतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. अशाच प्रकारे माहितीच्या अधिकाराचे आणि जनहित याचिकांचे फॅड सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात जनहित याचिकांच्या भडिमरामुळे सर्वच ठिकाणी दिसून येत आहे. संपूर्ण भारतातून अशा प्रकारच्या याचिकांची गोळा बेरीज केली तर अनेक याचिका केवळ न्यायालयांचा वेळ खाण्यासाठी असतात असेच दिसते. आपल्या महाराष्ट्रात सध्या जवळपास सर्व समाजाची वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या मागणीसाठी अनेक आंदोलने सुरू आहेत. या सर्वांच्या मागण्या मान्य केल्या तर आपल्याला शंभर टक्क्यांपेक्षाही जास्त आरक्षणे द्यावी लागतील असे दिसते.आरक्षण एक तर शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी महत्त्वाचे ठरते पण आता शिक्षणाचा उपयोग होत नाही आणि सरकारी नोकऱ्या तर आता जवळजवळ बंद झालेल्या आहेत. कारण आता सगळीच कामे ठेकेदार करतात. तेव्हा आता अशा याचिका दाखल करण्या विरुद्ध आणि करणाऱ्यांच्या विरुद्ध एखादी याचिका दाखल करून अशा याचिका कर्त्यांवर सरळ सरळ बंदीच आणली पाहिजे. कारण न्यायालयाचा बहुमूल्य वेळ वाचवण्यासाठी, कुठेतरी प्रसिद्धीसाठी केलेले हे जनहित याचिका प्रकरण थांबवणे किंवा कमी करणे अत्यंत गरजेचे आहे.


[signature]
nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## हैदराबाद गॅझेटविरोधातील जनहित याचिका
# हायकोर्टाने फेटाळली!

### मराठा समाजाला मोठा दिलासा : याचिकाकर्त्याला फटकारले

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट संदर्भात काढलेल्या अध्यादेशाला आव्हान देणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली असून, कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

वकील विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेतील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वतःची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली.

राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या अध्यादेशामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, यामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या अध्यादेशावर आक्षेप घेत दोन जनहित याचिका मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. हा मराठा समाजासाठी मोठा दिलासा समजला जात आहे.

कोर्टाने म्हटले की, या जनहित याचिकेत 'व्यापक जनहित' दिसत नाही. तसेच, 'ज्या व्यक्तींना सरकारी निर्णयामुळे थेट बाधा झाली आहे, अशांनीच याचिका दाखल करणे अपेक्षित आहे.'
सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. शासन निर्णयाने कुठल्याही समाजातील लोकांचे नुकसान झालेले नाही. इतर कोणत्याही जातीच्या आरक्षणावर त्याचा परिणाम झालेला नाही, असे सांगितले.

त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? अशा याचिका दाखल होणे उच्च न्यायालयाला अपेक्षित नाही. आम्ही या याचिकेवर कोणताही विचार करण्यास इच्छुक नाही आणि त्यामुळे ती फेटाळली जात आहे, असे कोर्टाने सांगितले.

मात्र, त्याचवेळी, याचिकाकर्त्याला इतर बाधित व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्याची मुभाही देण्यात आली आहे. जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वतःची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे कोर्टाने म्हटले आहे.

## ट्रेलरला धडकली भरधाव कार
# भीषण अपघातात ५ ठार

### चार जण गंभीर जखमी : मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश







■ **महासागर प्रतिनिधी, मलकापूर, दि. १८ :** मुक्ताईनगर ते मलकापूर महामार्गावर भानगुरा फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू. तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातात चार जण गंभीर जखमी झाले. ही घटना बुधवार १७ सप्टेंबरच्या रात्री ११.१५ वाजताच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुती ईको कार (एमएच ४६/ईएक्स ३१२०) ही मुक्ताईनगरकडून मलकापूरकडे भरधाव वेगात येत असताना चालक साजिद अजीज बागवान याने भानगुरा फाट्याजवळ समोर जात असलेल्या एका ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडक दिली.

कार चालक साजिद बागवान (वय ३०), रा. भुसावळ याच्यासह आणखी एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला . कारमधील तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला. मृत महिलांची ओळख अद्याप पटलेली नाही. या अपघातात चार प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.

जखमींमध्ये संतोष तेजराव महाले (४०), रा. चिखली, ता. मुक्ताईनगर, पंकज दिलीप गोपाळ (वय २२), रा. नांद्रा हवेली, ता. जामनेर, दीपिका विश्वास (वय ३०), रा. कोलकाता, प. बंगाल, टीना अजय पाटील (वय ४५, रा. भुसावळ व एक अनोळखी महिला यांचा समावेश आहे.

या घटनेबाबत अक्षय भास्कर सोनवणे, रा. चिखली, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यावरून एमआयडीसी मलकापूर पोलिस ठाण्यात आरोपी मृत चालक साजिद बागवान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार हेमराज कोळी,यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून हेकाँ नीता मारोती वाढे करीत आहेत.

## पंचाहत्तरीनंतर मी थांबलो नाही..

### शरद पवारांचा अप्रत्यक्ष टोला



■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १८ :** वयाच्या पंचाहत्तरीनंतर मी थांबलो नाही, मग पंतप्रधान मोदींना बोलण्याचा नैतिक अधिकार नाही असे शरद पवार कोल्हापूरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हणाले.

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीत झालेल्या नुकसानीवर शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, शिवरायांबद्दल आपण सगळेच आदर व्यक्त करतो. एकदा शिवरायांनी दुष्काळानंतरच्या पावसात सोन्याचा नांगर केला. सोन्याचा नांगर वापरुन शिवरायांनी एक संदेश दिला.

सध्या शेतीचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रात अनेक जागी अतिवृष्टी झाली, शेतीचे नुकसान झाले. जमिनी वाहून गेल्या, सोयाबीन उद्ध्वस्त झाले. सरकार पंचनामे कधी करते आणि मदत कधी पोहोचवते, हे पाहूया, असे म्हणत त्यांनी सरकारवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला.

## निवासी डॉक्टर संपावर ठाम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** रुग्णसेवा ठप्प होण्याच्या भीतीने राज्यभरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. एका मोठ्या निर्णयामुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून डॉक्टर संघटना सरकारविरोधात आक्रमक झाली आहे. रुग्णालयातील आकस्मिक सेवा, शस्त्रक्रिया आणि ग्रामीण-शहरी भागातील आरोग्य व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

शासनाने आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण होमिओपॅथी डॉक्टर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये स्वतंत्र नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला आयएमएने विरोध करीत संप पुकारला.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावर प्रतिक्रिया देताना, रुग्णसेवेचा विचार करून डॉक्टरांनी संप मागे घ्यावा. वैद्यकीय संघटनेची परंपरा पुढे चालू ठेवावी, असे आवाहन केले आहे. २०१४ पासून न्यायालयीन वादात अडकलेल्या अभ्यासक्रमास शासनाने ग्रीन सिग्नल दिला असला तरी अंतिम निर्णय उच्च न्यायालयाच्या आदेशावर अवलंबून आहे.

# मतदारांना हेतुपुरस्सर वगळण्यात आले

### सादरीकरणात राहुल गांधी यांचा नव्याने दावा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी मत चोरी या विषयावर त्यांची दुसरी पत्रकार परिषद घेतली. ३१ मिनिटांच्या सादरीकरणात राहुल गांधी यांनी मत चोरीचा आरोप केला आणि त्यांच्याकडे पुरावे असल्याचा दावा केला. निवडणूक आयोग जाणूनबुजून काँग्रेसच्या मतांना लक्ष्य करत आहे आणि त्यांची नावे वगळत आहे, असे ते म्हणाले.



यावेळी राहुल गांधी कर्नाटकातील ज्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती त्यांनाही सोबत घेऊन आले. त्यांनी आरोप केला की भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे भारतीय लोकशाही नष्ट करणाऱ्यांना संरक्षण देत आहेत. ते पुढे म्हणाले की महाराष्ट्र, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही असेच घडत आहे.

राहुल यांनी कर्नाटकातील आलंद विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण दिले. ते म्हणाले की, २०२३ च्या निवडणुकीत कोणीतरी ६,०१८ मते वगळण्याचा प्रयत्न केला होता. ही संख्या जास्त असू शकते.

राहुल यांनी असा दावा केला की, आलंदमधील मतदारांची नावे इतर राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या मोबाईल नंबरचा वापर करून हटवण्यात आली होती. राहुल यांनी त्यांच्या सादरीकरणात हे नंबरही शेअर केले.

राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर मत चोरांना मदत केल्याचा आरोप केला. ते म्हणाले, ज्ञानेश कुमार मत चोरांना संरक्षण देत आहेत. याचे स्पष्ट पुरावे आहेत. याबद्दल कोणताही गोंधळ नाही.

त्यांनी महाराष्ट्रातील राजुरा मतदारसंघाचाही उल्लेख केला. राजुरा मतदारसंघात ६८५० मतदार वाढवल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला.मत चोरी ही कार्यकर्त्यांच्या हातून झाली नाही, तर यासाठी खास मॉडेल तयार करण्यात आले आणि कॉल सेंटरच्या माध्यमातून हा प्रकार राबवण्यात आला. या प्रकाराला स्वतः केंद्रीय निवडणूक आयोगाचे समर्थन मिळत आहे, ते मतचोरांना संरक्षण देत आहेत, असा सनसनाटी आरोप राहुल गांधी यांनी केला.



### साधा लवंगी फटाका सुद्धा फोडता आला नाही...

राहुल गांधी यांच्या आरोपावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राहुल गांधी लवंगी फटका सुद्धा फोडू शकले नाहीत, फुसका बार त्यांनी लावला होता, असा टोला फडणवीस यांनी लगावला आहे.

फडणवीस म्हणाले, राहुल गांधी यांनी हायड्रोजन बॉम्ब सांगितला तर संपूर्ण भारत घाबरला होता, पण लवंगी फटाका सुद्धा ते फोडू शकलेले नाहीत. मी मागच्याही काळात सांगितले होते की राहुल गांधी हे सिरियल लायर आहेत. रोज खोटे बोलायचे आणि गोबेल्सचे तत्त्व हे त्याठिकाणी मांडायचा प्रयत्न असतो. इतके वेळा इलेक्शन कमिशनने त्यांना नोटीस दिली, आत्तापर्यंत एकही पुरावा ते देऊ शकले नाहीत. कितीही खोटे बोलले तरी जनतेचा त्यांच्यावर विश्वास नाही, माध्यमांसमोर येऊन खोटे बोलण्याची जी त्यांची हिंमत आहे ती वाखाणण्यासारखी असल्याचे फडणवीस म्हणाले.

## फेक नरेटिव्ह पसवरणे हाच काँग्रेसचा उद्योग



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेले मतचोरीचे आरोप जोरकसपणे फेटाळून लावले.

निवडणूक आयोगाने राहुल गांधी व इतर लोकांना मतचोरीचे पुरावे व प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. पण ते न करता ते केवळ आरोप करण्याचे काम करत आहेत, असे ते म्हणालेत. ईव्हीएमवर मतदान काँग्रेसच्याच काळात सुरू झाले. मग आता ईव्हीएमवर संशय घेऊन राहुल यांना आपल्याच सरकारची प्रक्रिया चुकीची आहे असे म्हणायचे आहे काय? निवडणूक आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते. परंतु ते न करता ते केवळ आरोप करण्याचे काम करत आहेत, असेही शिंदे यावेळी म्हणाले.

## चमोलीत ढगफुटी
# ७ जण बेपत्ता

■ **वृत्तसंस्था, डेहराडून, दि. १८ :** उत्तराखंडमध्ये दोन दिवसांत घडलेला हा दुसरा ढगफुटीचा प्रकार आहे. १७ सप्टेंबरच्या रात्री चामोली जिल्ह्यातील नंदनगर घाट परिसरात ढगफुटी झाली. कुंत्री लंगाफली वॉर्डमधील सहा घरे ढिगाऱ्याखाली गाडली गेली. सात लोक बेपत्ता आहेत. दोघांना वाचवण्यात आले.

यापूर्वी, १६ सप्टेंबर रोजी डेहराडूनमध्ये ढगफुटी झाली होती. डेहराडून ते मसूरी या ३५ किलोमीटरच्या मार्गाचे अनेक ठिकाणी नुकसान झाले होते. परिणामी, सलग तिस?या दिवशी मसूरीमध्ये २,५०० पर्यटक अडकले होते.

या हंगामात हिमाचल प्रदेशात पाऊस, पूर, भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुरामुळे ४१९ जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान खात्याने पुढील ४८ तासांसाठी उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशला हाय अलर्टवर ठेवले आहे.

या वर्षी २४ मे रोजी नैऋत्य मान्सून केरळमध्ये पोहोचला. देशात आतापर्यंत (१७ सप्टेंबर) सामान्यपेक्षा ८% जास्त पाऊस पडला आहे. इतर सात राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या काही दिवसांत आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीपर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## राज्यातील मंत्री आणि अधिकाऱ्यांना
# वाहन खरेदीसाठी मर्यादा निश्चित

### राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना किंमतीची मर्यादा नाही

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** सरकारी अधिकारी आणि मंत्र्यांसाठी वाहन खरेदीच्या नियमांमध्ये महाराष्ट्र सरकारने मोठे बदल केले आहेत.



अर्थ विभागाने १७ सप्टेंबर पासून लागू होणारा एक नवीन शासन निर्णय जारी केला आहे, ज्यानुसार आता मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या वाहन खरेदीसाठी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यापूर्वीचे सर्व संबंधित आदेश रद्द करण्यात आले आहेत. मात्र, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या वाहनांच्या खरेदीवर कोणतीही किंमत मर्यादा ठेवण्यात आलेली नाही.

वाहन उत्पादन खर्च, वाढती महागाई आणि बीएस-६ मानकांची नवीन वाहने यांच्या वाढलेल्या किमती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

राज्य सरकारच्या नवीन नियमानुसार, सरकारी अधिकारी आणि मंत्र्यांच्या वाहन खरेदीसाठी खर्चाची मर्यादा ठरवण्यात आली आहे. त्यात जीएसटी, वाहन कर आणि नोंदणी शुल्क यांचा समावेश नाही. या नियमानुसार, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांच्या वाहनांसाठी कोणतीही किंमत मर्यादा नाही, तर मंत्री आणि मुख्य सचिवांना ३० लाखांपर्यंतचे वाहन घेता येणार आहे.

अपर मुख्य सचिव आणि प्रधान सचिवांना २५ लाख, राज्य माहिती आयुक्त आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांना २० लाखांपर्यंतच्या गाड्या घेता येतील. राज्यस्तरीय विभागप्रमुख, आयुक्त, महानिदेशक आणि विभागीय आयुक्त यांच्यासाठी १७ लाखांची मर्यादा असून, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधीक्षकांना १५ लाखांपर्यंतचे वाहन घेता येणार आहे. इतर अधिकाऱ्यांसाठी ही मर्यादा १२ लाख निश्चित करण्यात आली आहे.

## ट्रम्पच्या ब्रिटन दौऱ्याला कडाडून विरोध



■ **वृत्तसंस्था, लंडन, दि. १८ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या राज्यभेटीचा निषेध करण्यासाठी हजारो लोक लंडनच्या रस्त्यावर उतरले. ही रॅली स्टॉप ट्रम्प कोॲलिशनने आयोजित केली होती. या निषेधात ५० हून अधिक संघटना आणि सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या, निदर्शकांनी पोर्टलँड प्लेस ते लंडन पार्लमेंट स्क्वेअरपर्यंत मोर्चा काढला.
सुमारे ५,००० लोक या निषेधात सहभागी झाले होते. सुरक्षेसाठी १,६०० हून अधिक पोलिस अधिकारी तैनात करण्यात आले होते. लोकांनी ट्रम्पचे स्वागत नाही, इस्रायलला शस्त्र देणे थांबवा असे फलक धरले होते.






सहवास जरी सुटला तरी स्मृती सुगंध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील.



स्व.गं.भा. साजीबाई राजु राठोड

यांचे दिनांक ०८/०९/२०२५ रोज
सोमवारला देवज्ञा झाली असुन
त्या निमित्य तेरविचा कार्यक्रम
दिनांक २०/०९/२०२५ शनिवारला
आयोजीत केला आहे. तरी आपली
उपस्थिती प्रार्थनिय आहे.

:- स्थळ :-
आमचे राहते घरी
करंजखेड (नविन) ता. महागांव जि. यवतमाळ

:- वेळ :-
दुपारी १२ ते ४ पर्यंत

:- विनित :-
▪ श्री. उत्तम राजु राठोड ▪ श्री. आत्माराम राजु राठोड ▪ श्री. राम राजु राठोड
▪ श्री. परशराम राजु राठोड ▪ श्री. सुनिल प्रकाश राठोड, नातु

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचा गौण खनिज आराखडा : चंद्रशेखर बावनकुळे



**पुणे :** राज्यातील अनेक जिल्ह्यात गौण खनिज क्षेत्र जाहीर झालेले नसल्यामुळे कृत्रिम वाळू उत्पादकांना वेगवेगळ्या विभागांची परवानगी घ्यावी लागत आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील महिन्याभरात गौण खनिज क्षेत्राचा आराखडा करून तो राज्य शासनाला सादर करावा, असा आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. राज्य शासनाच्या सेवा पंधरवडा उपक्रमाअंतर्गत नव्याने लागू केलेल्या एम सँड धोरणासंदर्भात बावनकुळे यांनी खाण चालक क्रशर मालक बांधकाम व्यावसायिक आणि अधिकाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यावेळी गौण खनिज क्षेत्राचा आराखडा जाहीर झालेला नसल्याचे स्पष्ट झाले. एम सँड धोरण चांगले आहे. ग्रामपंचायतींच्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची आवश्यकता नाही ही बाब स्तुत्य आहे. मात्र दीर्घ मुदतीचा खाणपट्टा घेण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. दीर्घमुदतीचे खाणपट्टे घेताना ग्रामपंचायतींचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले. त्या मुळे ते रद्द करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्यावर ग्रामपंचायतींनी तीस दिवसांच्या कालावधीत परवानगी न दिल्यास त्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर राहिल अशी सुधारणा शासन निर्णयात केली जाईल. सरसकट खाण उद्योगांना सवलती मिळणार नाहीत. खाणचालकांनी एम सँड प्रकल्प तीन वर्षांच्या आत टाकणे बंधनकारक आहे. त्यानंतरच त्यांना सर्व सवलती मिळतील असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# नव्या भारताबरोबरच सांस्कृतिक परंपरेचा उलगडला इतिहास
## ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील नवा भारत व सामर्थ्यवान समृद्ध भारतीय सांस्कृतिक परंपरा उलगडणाऱ्या अनोख्या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे- पाटील, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, अकादमीच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष दीपक करंजीकर, सदस्य मोहन बने आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या भारताच्या वाटचालीबरोबरच देशातील पुरातन सांस्कृतिक वैशिष्टे व परंपरांची नव्या पिढीला माहिती होईल, असा विश्वास मंत्री ॲ शेलार यांनी व्यक्त केला. राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता' या उपक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत २३ सप्टेंबरपर्यंत प्रदर्शन भरविण्यात येणार होते. मात्र, उद्घाटनानंतर वैविध्यपूर्ण व लक्षवेधी प्रदर्शन पाहिल्यानंतर प्रदर्शनाला आणखी दोन दिवसांची मुदतवाढ देण्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी केली. आता २५ सप्टेंबरपर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत प्रदर्शन रसिकांसाठी खुले राहणार आहे.



**प्रदर्शन २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत रसिकांसाठी खुले**

जगभरात सांस्कृतिक महासत्ता म्हणून भारताची ओळख आहे. देशातील योग, ध्यान, अध्यात्म, आयुर्वेद, स्थापत्य, संगीत, हस्तकला, लोककला, वस्त्र आणि सांस्कृतिक परंपरांबद्दल जगभरातील नागरिकांमध्ये कायम उत्सुकता पहावयास मिळते. तर गेल्या ११ वर्षांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या सांस्कृतिक परंपरेबरोबरच अन्य क्षेत्रातील अस्तित्वाची जगाला जाणीव करून दिली. देशाला सुवर्णकाळाकडे नेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच नियोजनबद्ध पद्धतीने विविध निर्णय घेतले आहे. जागतिक स्तरावरील एक जबाबदार देश म्हणून भारताची समर्थ वाटचाल सुरू झाली आहे. त्याचा वेध या छायाचित्र प्रदर्शनातून घेण्यात आला आहे. त्याचबरोबर भारतीय संस्कृतीचे पुरातन वैभव, संस्कृती व वारसा, विविधतेतून एकता आणि परिवर्तन असे विविध विषय या प्रदर्शनात मांडण्यात आले आहेत.

# कार कंटेनरवर आदळून २ विद्यार्थी ठार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १८ :

भरधाव वेगातील कार रस्त्याच्या कडेला थांबलेल्या कंटेनरवर आदळून 2 विद्यार्थी ठार झाल्याची घटना गुरूवारी पहाटे 5.30 वा. जुन्या मुंबई - पुणे महामार्गावर घडली. या घटनेत इतर 2 विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर लगतच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यासंबंधीच्या माहितीनुसार, जुन्या पुणे - मुंबई महामार्गावरील देहूरोड परिसरातील मामुर्डी येथील गणपती मंदिराजवळ हा अपघात घडला. येथे एक कंटेनर ट्रक रस्त्याच्या कडेला थांबला होता. या ट्रकवर भरधाव वेगातील एक कार येऊन आदळली. त्यात सिध्दांत आनंद (वय- २३,रा. झारखंड) आणि दिव्यराज राठोड (वय- २२, रा.राजस्थान) यांचा जागीच मृत्यू झाला. हे दोघेही पुण्यातील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होते. त्यांच्यासोबत त्यांचे आणखी दोन मित्र होते.

मयत सिध्दांत आनंद आणि दिव्यराज राठोड हे त्यांच्या जवळील मारुती सियाझ कारमध्ये (एमएच १४ ईएच ७५०२) आपल्या दोन मित्रांसोबत लोणावळा हिल स्टेशन येथून पुण्याच्या दिशेने जात होते. पहाटे साडेपाच वाजता त्यांची कार मामुर्डी परिसरात आली असताना चालकाचे अचानक तिच्यावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे गाडी वेगातच रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या कंटेनरला जाऊन आदळली. त्यात कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. गाडीची डावी बाजू, समोरील इंजिन व वरचा भाग देखील नुकसानग्रस्त झाला.

## राष्ट्रीय पोषण माहच्या माध्यमातून कुपोषणमुक्त महाराष्ट्र घडवु : आदिती तटकरे



**मुंबई:** मुंबईसह राज्यात कुपोषण कमी करण्यास अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे योगदान मोलाचे असून, सुपोषित भारतासह कुपोषणमुक्त महाराष्ट्र घडविण्याची संधी आपल्याला लाभली आहे, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आठव्या राष्ट्रीय पोषण माह अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते व सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, उपायुक्त संगीता लोंढे, उपायुक्त विजय क्षीरसागर यांच्यासह अधिकारी, पर्यवेक्षक, मुख्य सेविका, सेविका, मदतनीस हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, नवनियुक्त मदतनीस व सेविका यांना नियुक्तीपत्रही प्रदान करण्यात आले. राज्यातील सर्व अंगणवाडीमध्ये १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या कालावधीत आठवा राष्ट्रीय पोषण महिना साजरा करण्यात येणार आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महिला व बालकांच्या आरोग्य व पोषणविषयक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी जनजागृतीसाठी २०१८ पासून पोषण माह अभियान राबविण्यात येते. पोषण माह सप्ताहात दरवर्षी राज्य उत्कृष्ठ ठरले असून, यंदाही आपण समन्वयाने देशात उत्कृष्ठ काम करून, कुपोषण समूळ नष्ट करण्याकडे वाटचाल करूया.

# खोटे आरोप, खोटा कांगावा
## राहुल गांधींनी देशाची माफी मागावी
### केशव उपाध्ये यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

लोकसभा निकालानंतर सतत मतचोरीचा गाजावाजा करणाऱ्या राहुल गांधींवर भाजपाने थेट घणाघात केला आहे. मतचोरीचा खोटा कांगावा करणारे राहुल गांधी हेच खरे मतचोरीचे बादशाह आहेत, अशा शब्दांत भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज टीका केली.

राहुल गांधींच्या आरोपांना कोणताही ठोस पुरावा नसल्याचे सांगत उपाध्ये म्हणाले, गाजावाजा करा, पत्रकार परिषदा घ्या, व्हिडिओ सादर करा आणि शेवटी हवा निर्माण करा–हा काँग्रेसचा धंदा झाला आहे. जर खरे आक्षेप असतील तर निवडणूक आयोगाकडे प्रतिज्ञापत्र द्या, कोर्टात लढा, पण काँग्रेसला ते करायचेच नाही कारण त्यांच्याकडे पुरावे नाहीत.

यावेळी त्यांनी काँग्रेसच्या पूर्वीच्या मतचोरीच्या उदाहरणांची यादीही पत्रकारांसमोर मांडली. पृथ्वीराज चव्हाण यांच्या मतदारसंघात एकाच घरात अनेक नावे, काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा व त्यांच्या पत्नीची दोन-दोन ओळखपत्रे, अशी अनेक उदाहरणे देत काँग्रेसचा मतचोरीचा इतिहास उघड केला. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या ताज्या निकालाचा हवाला देत उपाध्ये म्हणाले, काँग्रेस आमदाराची निवड अवैध ठरवून मतांची फेरमोजणी करण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. म्हणजे काँग्रेसचे मतचोरीचे आरोप उलट त्यांच्याच गळ्यात पडले. बिहार मतदारयादीच्या पुनर्निरीक्षणालाही काँग्रेसने विरोध केला असल्याचे उपाध्ये यांनी निदर्शनास आणले. कायदेशीर लढाई करायची नाही, पुरावे द्यायचे नाहीत; फक्त माध्यमांमध्ये संशय निर्माण करून अराजक पसरवायचे–हा काँग्रेसचा कुटील डाव आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला.



## नीलेश घायवळ टोळीकडून गोळीबार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १८ :

गेल्या काही दिवसांत पुण्यात गुन्हेगारी घटनांची मालिका सुरूच आहे. नुकतेच नाना पेठेत झालेल्या टोळीयुद्धात 19 वर्षीय आयुष कोमकरचा निर्घृण खून झाल्याने पुणे हादरलेले असतानाच, कोथरूड भागात पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली आहे. मध्यरात्री एका किरकोळ कारणावरून गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. कुख्यात गुंड निलेश घायवळ यांच्या टोळीने गोळीबार केला असून, गाडीला पुढे जाण्यासाठी साईड न दिल्यामुळे ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे पुणेकरांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोथरूडमधील शिंदे चाळ परिसरात ही घटना घडली. निलेश घायवळ टोळीतील सदस्य कारमधून जात असताना पुढील वाहनचालकाने त्यांना साईड दिली नाही. किरकोळ वाटणाऱ्या या कारणावरून वाद वाढला आणि गुंडांनी थेट कारमधील प्रकाश दुरगुडे याच्यावर गोळीबार केला.

# भाजप नेत्याच्या मुलाचे मोठे कांड उघड

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. १८ :

भाजप नेत्याच्या मुलाने कर्जातून सुटका मिळवण्यासाठी स्वतःच्या मृत्यूचा बनाव रचल्याची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विशाल सोनी, असे या आरोपी मुलाचे नाव असून, तो मध्यप्रदेशातील राजगढचे भाजप नेते महेश सोनी यांचा मुलगा आहे. त्याने आपली कार नदीत ढकलून देत अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव केला होता. मात्र, तब्बल 10 दिवस शोध घेऊनही त्याचा मृतदेह न सापडल्याने पोलिसांना संशय आला आणि तांत्रिक तपासानंतर महाराष्ट्रातून त्याला ताब्यात घेण्यात आले.

5 सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास पोलिसांना मध्य प्रदेशातील कालीसिंध नदीत एक कार बुडाल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून कार बाहेर काढली, पण आत कोणीही नव्हते. ती कार विशाल सोनीची असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले. त्यानंतर, 10 दिवस त्याचा मृतदेह शोधण्यासाठी व्यापक मोहीम राबवण्यात आली. या शोधमोहिमेत अनेक पथकांनी 20 किलोमीटरच्या परिसरात शोध घेतला.



**कर्जातुन सुटकेसाठी अपघाती मृत्युचा रचला बनाव**

अनेक दिवस शोध घेऊनही विशालचा थांगपत्ता न लागल्याने पोलिसांना संशय आला. त्यांनी विशालच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स तपासले असता, त्याचे लोकेशन महाराष्ट्रात असल्याचे उघड झाले. तातडीने महाराष्ट्र पोलिसांच्या मदतीने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फर्दापूर येथे त्याला अटक करण्यात आली.

पोलिसांनी चौकशी केली असता विशालने धक्कादायक खुलासा केला. त्याच्यावर 1 कोटी 40 लाखापेक्षा जास्त रुपयांचे कर्ज होते. कर्ज फेडता येत नसल्यामुळे कुटुंबाच्या सल्ल्यानुसार, त्याने स्वतःच्या अपघाती मृत्यूचा बनाव रचला. मृत्यूपश्चात मिळणाऱ्या प्रमाणपत्रामुळे बँकेचे कर्ज माफ होईल, असा त्याच्या कुटुंबीयांचा समज होता.

याबाबत विशालने पोलिसांना सांगितले की, "5 सप्टेंबर रोजी सकाळी 5 वाजता, मी इंदूर रोडवरील गोपाळपुरा जवळील एका ढाब्यावर उभ्या असलेल्या माझ्या ट्रकमधून भाडे घेतले आणि नदीकाठी परतलो. मी चालत्या गाडीचे हेडलाइट बंद केले. मी गाडीतून उतरलो आणि गाडी नदीत ढकलली.

## शिवभोजन थाळी केंद्र चालकांचे थकलेले दोनशे कोटी सरकार देणार



**मुंबई:** महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुरू करण्यात आलेली शिवभोजन थाळी योजना महायुती सरकारच्या काळात रखडली आहे. फेब्रुवारी महिन्यापासून शिवभोजन केंद्र चालकांना अनुदानच न मिळाल्याने १८०० केंद्र चालकांनी ठिकठिकाणी उपोषण करीत निदर्शने केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोरही निदर्शने करण्यात आली. अखेर या शिवभोजन केंद्र चालकांचे थकलेले दोनशे कोटी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यभरात १८०० शिवभोजन थाळी केंद्रे आहेत. कोरोनाकाळात १० रुपयांत मिळणाऱ्या या शिवभोजन थाळी केंद्रांचा गरीब गरजू नागरिक, बांधकाम मजुरांना या थाळीचा मोठा आधार मिळाला. त्यानंतर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने ही योजना पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दरवर्षी अर्थसंकल्पात २७० कोटींची तरतूद करण्यात येत होती. मात्र महायुती सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेसाठीच्या अनुदानाचा प्रश्न निर्माण झाल्याने या योजनेकडे दुर्लक्ष झाले.

# गणपतीसाठी तब्बल ६ लाख कोकणवासियांनी एसटीने केला सूखरुप प्रवास : प्रताप सरनाईक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

गणपती उत्सवासाठी मुंबई,ठाणे आणि पालघर क्षेत्रातून सुमारे ५ लाख ९६ हजार पेक्षा जास्त कोकणवासीयांनी एसटीने सुखरूप प्रवासाचा आनंद घेतला. यातुन एसटीला सुमारे २३ कोटी ७७ लाख रुपये उत्पन्न मिळाले. तथापि, आप-आपल्या गावी, वाडया-वस्त्यावर या लाखो कोकणवासीयांना सुखरूप घेऊन जाणारे आमचे बहादर चालक-वाहक त्यांना मदत करणारे यांत्रिक कर्मचारी व मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक -अधिकारी अभिनंदनास पात्र आहेत, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



यंदा गणपती उत्सवासाठी एसटीद्वारे कोकण वासियांसाठी ५ हजार जादा एसटी बसेसची सोय करण्यात आली होती. या बसेस द्वारे १५ हजार ३८८ फेऱ्यातून ५ लाख ९६ हजार प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला. अर्थात, एसटी महामंडळाने या प्रवाशांची सुरक्षित आणि अपघात विरहित वाहतूक करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

२३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळामध्ये चालवलेल्या या वाहतुकीमध्ये एसटी प्रशासनाने सुयोग्य नियोजनाच्या आधारे गेल्या अनेक वर्षातील सर्व विक्रम मोडून काढत यंदा तब्बल ५००० बसेसद्वारे ५ लाख ९६ हजार पेक्षा जास्त प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली आहे. अर्थात, यासाठी राज्यभरातील विविध आगारातून आलेले १० हजार पेक्षा जास्त चालक-वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि त्यांना मार्गदर्शन करणारे अधिकारी यांनी विविध अडचणींना धैयार्ने सामोरे जात एवढी प्रचंड वाहतूक सुरक्षित पार पाडली, ते कौतुकास्पद आहे , असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

कोकणातील गणेश भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून, २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळात एसटीची वाहतूक सुरळीत करण्याबरोबरच बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत होते. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात आली होती. नादुरुस्त बसेस ना पर्याय म्हणून चिपळूण,महाड व माणगाव आगारात १०० बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

# व्यावसायिकाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

मुंबईतील वांद्रे-वरळी सी-लिंकवर मंगळवारी मध्यरात्री एका व्यावसायिकाने टॅक्सी थांबवून समुद्रात उडी मारली. अमित शांतीलाल चोप्रा (वय 47) असे या व्यक्तीचे नाव असून, त्यांचा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय होता. 'साप चावला' असा आरडाओरडा करून त्यांनी टॅक्सी थांबवली आणि समुद्रात उडी घेतली. व्यावसायिक कारणांमुळे असलेल्या तणावातून त्यांनी आत्महत्या केली असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. मात्र, त्यांना कोणतीही चिठ्ठी सापडली नाही. त्यामुळे आत्महत्येचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी पोलिसांकडून त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अमित चोप्रा मूळचे राजस्थानचे असून त्यांचे सर्व नातेवाईक तिथेच राहतात. मात्र, चोप्रा हे पत्नी आणि मुलांसोबत मुंबईतील अंधेरी पश्चिम येथे राहत होते आणि मुंबईतच त्यांचा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय होता. मंगळवारी मध्यरात्री 1 वाजण्याच्या सुमारास त्यांनी एक टॅक्सी पकडली.

टॅक्सी वांद्रेमार्गे सी-लिंकवर आल्यावर त्यांनी अचानक 'आपल्याला साप चावला' असा आरडाओरडा सुरू केला. त्यामुळे घाबरलेल्या टॅक्सीचालकाने गाडी थांबवली. याच संधीचा फायदा घेत चोप्रा यांनी टॅक्सीचा दरवाजा उघडला आणि थेट सी-लिंकवरून समुद्रात उडी मारली. टॅक्सीचालकाने पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

# महिलांच्या आरोग्यासाठी मोठा निर्णय
## स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान वर्षभर सुरू राहणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला असून, महिलांच्या आरोग्य आणि सशक्तीकरणावर आधारित स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानाला राज्यात मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या अभियानाचा कालावधी फक्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर एवढाच न ठेवता ते संपूर्ण वर्षभर सुरू ठेवावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मध्यप्रदेशातील धार येथून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभाग घेतला, तर मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यस्तरीय शुभारंभ झाला. या प्रसंगी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव, विधानपरिषद सदस्य डॉ.मनीषा कायंदे, तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




शिंदे म्हणाले की, घरातील महिला कुटुंबाची काळजी घेताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. या अभियानामुळे देशभरातील महिलांना आरोग्य तपासणी व सल्ला मिळणार आहे. तपासणी ही फक्त पंधरा दिवसांची मोहीम न ठरता, ती सातत्याने व्हावी, यासाठी वर्षभर उपक्रम राबवले जातील.

राज्यातील विविध ठिकाणी या निमित्ताने रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, योग व आयुष सत्रे, मानसिक आरोग्य समुपदेशन, अवयवदान मोहिमा आयोजित करण्यात आल्या आहेत. उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, सिकलसेल, ॲनिमिया यांसारख्या आजारांची तपासणी तसेच गर्भवतींसाठी प्रसूतीपूर्व काळजीची शिबिरे घेण्यात येत आहेत.

याशिवाय, राज्यातील नगरपालिका व नगरपरिषदमध्ये ३९४ नमो गार्डन, ७५ गावांमध्ये पाणीपुरवठा योजना, शालेय शिक्षण विभागामार्फत चित्रकला स्पर्धा, तर उद्योग विभागामार्फत नमो कौशल्य केंद्र सुरू करण्याचे उपक्रम जाहीर झाले.

## पुढील २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला असून, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. याचा सर्वाधिक फटका मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला बसला आहे. मराठवाड्यात पावसाच्या तडाख्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक हिरावले गेले आहे.

या मुसळधार पावसामुळे नद्या-नाल्यांना पूर येऊन अनेक जनावरे दगावली आहेत. शेतातील पिके वाहून गेली असून, अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अनेक भागांमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आल्यामुळे पावसाचा धोका अद्यापही कायम आहे. भारतीय हवामान विभागाने 18 सप्टेंबर रोजी महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. या अंदाजानुसार, राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस पडेल आणि ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यावर दुहेरी संकट येण्याची शक्यता असून, नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वीजांच्या कडकडटासह तसेच मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकणामध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, कोकणातील तीन जिल्हे सिंधुदुर्ग, रायगड आणि रत्नागिरीमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# सिन्नरच्या सहा शिक्षकांना पोस्ट ऑफ द मंथ अवॉर्ड

■ महासागर प्रतिनिधी
ठाणगाव, दि. १८ :

ठाणगाव सिन्नर तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील सहा शिक्षकांना जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत प्रत्येक महिन्यात विनोबा ॲपवर शैक्षणिक पोस्ट सादर केल्याबद्दल पोस्ट ऑफ द मंथ अवॉर्ड प्रदान करण्यात आला. १५ सप्टेंबरला पंचायत समितीत झालेल्या कार्यक्रमात तांत्रिक विनोबा भावे ॲपसाठी राकेश महाजन, गटशिक्षणाधिकारी डॉ. विजय बागुल, शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता आहिरे, विषयतज्ज्ञ संदीप गीते व केंद्रप्रमुख बाळासाहेब फड यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. या सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नवीन उपक्रम, अध्यापन पद्धती, उपयुक्त साधने व प्रेरणादायी शैक्षणिक पोस्ट नियमितपणे मांडल्या. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव करताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षकांना प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य देण्यात आले.



यावेळी डॉ. विजय बागुल म्हणाले की, विनोबा ॲपच्या माध्यमातून शिक्षकांनी केलेले नाविन्यपूर्ण प्रयोग समाजापर्यंत पोहोचत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. पोस्ट ऑफ द मंथ अवॉर्ड हा केवळ पुरस्कार नसून शिक्षकांच्या कर्तृत्वाचा गौरव आहे. सन्मानित शिक्षक तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरतील असे सांगितले. सिन्नर पंचायत समितीत राकेश महाजन गटशिक्षणाधिकारी डॉ. विजय बागुल , शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता आहिरे यांच्या हस्ते सत्कार प्रसंगी शिक्षक. संगीता पिंगळे (माळेगाव) बाळासाहेब सदगीर (कोळगाव माळ), सुनीता दातीर (शहापूर), कावेरी बोराडे (बोरखिंड), संदीप गिते (मोह) व शिला नवले (मुठाळ वस्ती) या शिक्षकांना पोस्ट ऑफ द मंथ अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# डिग्री दाखवा, भजे तळा आंदोलन

## काँग्रेसतर्फे राष्ट्रीय बेरोजगार दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १८ :




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय राष्ट्रीय युवक काँग्रेसच्या वतीने आजचा दिवस राष्ट्रीय बेरोजगार दिवस म्हणून साजरा केला.

या वेळी कार्यकर्त्यांनी पंचवटी चौकात भजे तळून निषेध व्यक्त केला.

या वेळी पदवी दाखवा आणि भजे तळा अशी नारेबाजी केली. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष नितीन काळे, वैभव देशमुख, शिवानी पारधी, अक्षय साबळे, निखिल बिजवे, स्वप्निल भामुद्रे, अ‍ॅड. अफरोज खान, संकेत साहू, सौरभ तायडे, चैतन्य गायकवाड, धनंजय बोबडे, सुजल इंगळे, साहिल वानरे, निशांत पवार, सम्यक वाकोडे, अभिषेक भोसले, कृष्णा बिसने, रोशन पवार, प्रथमेश गावंडे, मयूर निंभोरकर, हर्षल यावलीकर, अनिकेत शिरसागर, सुमित मानकर, आदित्य बिसने, अनय वाटाणे, सुरज चव्हाण, क्रिश कुचे, यश काठलेकर, ओम डोळस, प्रीतम कुकडे, आदित्य आगरकर, स्वराज पोटे, चेतन पवार, धनराज बागडे, दीपक शेंडे, प्रफुल तंतरपाळे, घनश्याम वखरकर, मोहित भेंडे, आनंद बरडे उपस्थित होते.

# किनगाव राजा परिसरात ढगफुटी सदृश पाऊस



■ महासागर प्रतिनिधी, किनगाव राजा , दि. १८ : किनगाव राजा परिसरासह सिंदखेडराजा तालुक्यातील सर्व मंडळांमध्ये १५ सप्टेंबर रोजी विजेचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह ढगफुटी सदृश पाऊस झाला. पावसाच्या या तडाख्यामुळे शेतकऱ्यांच्या उरल्या-सुरल्याआशाही बुडाल्या असून, निसर्गापुढे हतबल झालेल्या शेतकऱ्यांची आशा आता शासनाच्या मदतीकडे लागून असल्याचे दिसून येत आहे. किनगावराजासह सिंदखेडराजा, सोनोशी, दुसरबीड, साखरखेर्डा, मलकापूर पांग्रा, शेंदुर्जन या सर्व मंडळांमध्ये आज सकाळपासून सुरू असलेल्या 'धो - धो'' पावसाने शेतीपिकांचे प्रचंड नुकसान केले. परिसरातील सर्वच शेतकऱ्यांचे कापूस, सोयाबीन, मका, मिरची व भाजीपाला पीक नष्ट झाले. सिंदखेडराजा तालुक्यात यावर्षी सर्वाधिक सोयाबीन पेरणी व कपाशीची लागवड झाली होती. आधीच अतिवृष्टीमुळे थोड्याफार प्रमाणात बहरात आलेले सोयाबीन पीक येत्या १५ दिवसांत काढणीला येणार होते. सोबतच कपाशीचे पीकही थोड्याफार प्रमाणात सुस्थितीत आले होते. मात्र, ऐनवेळी आज पावसाने कहर केल्याने पिकांचे प्रचंड नुकसान झाले. विजेच्या कडकडाटासह झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने सिंदखेडराजा तालुक्यातील ११४ गावांमधील हजारो हेक्टरवरील पिकांवर पाणी फेरले. या मुसळधार पावसामुळे किनगावराजा, सोनोशी, सिंदखेडराजा, दुसरबीड मंडळातील शिवारातील अनेक नदी -नाले तुडुंब भरून वाहिले, सर्व बंधारे भरले, त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना वाढीव उत्पन्नाची अपेक्षा होती. सिंदखेडराजा : शहरासह परिसरात आज सकाळी ११ वाजतापासून पावसाला सुरुवात झाली. रात्रीपर्यंत विजेच्या कडकडाटासह मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू होता. याचा परिणाम म्हणून सिंदखेडराजा परिसरातील नदी -नाले तुडुंब भरून वाहू लागल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली. प्रामुख्याने मेहकर मार्गावरील एचडीएफसी बँकेजवळील नाला भरून वाहत असल्यामुळे या मार्गावर पाणी आले होते. त्यामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली. शहराजवळील नदी - नाले तुडुंब भरून वाहत होते. सावखेड तेजनजवळील दोन्ही नद्या दुथडी भरून वाहत होत्या. देऊळगावराजा शहरासह तालुक्यात वादळी पावसाने अक्षरशः कहर केला. या दरम्यान विजांचा कडकडाट, ढगांचा प्रचंड गडगडाट आणि 'धो -धो'''' पाऊस असा थरारक अनुभव नागरिकांनी घेतला.

# महाविहार मुक्तीसाठी आक्रोश आंदोलन




■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८ :

बौद्धगया येथील महाबोधी विहार मुक्तीसाठी देशभरात आंदोलन सुरू करण्यात आले आहे. हा कायदा रद्द करण्यात यावा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थान महू त्याचप्रमाणे नागपूर येथील दीक्षाभूमी मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्यावी या मागणीसाठी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी आणि समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी दि. १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच दिवशी सर्व जिल्ह्यावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी सातत्याने केल्या जात आहे. मात्र, या मागणीकडे शासनाचे पूर्णतः दुर्लक्ष आहे. बीटीएमसी कायदा रद्द करणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थान महू, नागपूर येथील दीक्षाभूमी मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्यावी, आदी मागण्या शासनापर्यंत पोचवाव्यात, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून मोर्चेकऱ्यांनी केली. या मोर्चात वंचितचे डॉ. नीरज वाघमारे, मोहन भवरे, रवी भगत, जयकुमार भवरे, रूपेश वानखडे, राहुल राऊत, गौतम कुंभार, ज्ञानेश्वर अभंग, मोरेश्वर देवताळे, अरुण खंडारे, उषा खंदारे, रंजना ताकसांडे, संगीता कुंभारे, वंदना कानंदी, विविध तालुक्यातील पदाधिकारी जयकुमार भवरे, सिद्धार्थ बनसोड, सिद्धार्थ गायकवाड, नागोराव बनसोड, विनायक देवतळे, भारत कांबळे, प्रकाश खंडारे, धम्मदीप पाईकराव, प्रा. उत्तम कांबळे, मधुकर कांबळे, राजू निमसरकार उपस्थित होते.

## करंजखेड येथील अवैध दारू बंद करा
## महिलांची पोलिस ठाण्यावर धडक



■ महासागर प्रतिनिधी महागाव , दि. १८ :

गावात होणाऱ्या अवैध देशी, गावठी दारू विक्री विरोधात करंजखेड येथील महिलांनी एल्गार पुकारला आहे. ग्राम सभेत ठराव घेवून महागाव पोलिस ठाण्यावर धडक देत अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली आहे. महागाव तालुक्यातील करंजखेड हद्दीतील अवैध देशी, गावठी दारूचा महापूर वाहत आहे. त्यामुळे जुन्या पिढीसह नविन पिढीसुध्दा व्यसनाधीन होत असल्याने अनेकांच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. त्यामुळे त्यांच्या महिला आत्महत्येच्या तयारीत असून यापुर्वी पतीच्या दारूच्या व्यसनामुळे हतबल झालेल्या काही महिलांनी आत्महत्या सुध्दा केली आहे. दारूच्या नशेत काही पुरुषांनी आत्महत्या केली असून या अवैध दारू विक्रीला पोलिस प्रशासनाचे अभय असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे गावातील महिलांत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या महिलांनी ग्रामसभेत अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी ठराव घेऊन महागाव पोलिस ठाण्यावर धडक देत करंजखेड येथील अवैध देशी, गावठी, विदेशी दारू विक्री बंद करण्याची मागणी केली. ही दारू बंदी न झाल्यास ठिय्या आंदोलन, महागाव तहसीलसमोर धरणे, दि. ३० सप्टेंबरपर्यंत मागणी पूर्ण न झाल्यास महात्मा गांधी जयंती दिनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ठाणेदार धनराज निळे यांना निवेदनातून देण्यात आला. यावेळी सरपंच स्नेहा संदीप ठाकरे, माजी पं. स. सदस्य संदीप ठाकरे, माजी सरपंच भरोश चव्हाण यांच्यासह नागरिक, महिला उपस्थित होत्या.

## महाबोधी विहाराच्या मुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. १८ :

महाबोधी महाविहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मभूमी महू, नागपूरची दीक्षाभूमीच्या मुक्तीसाठी भारतीय बौद्ध महासभेच्या नेतृत्वात समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा भिक्खू संघ, जिल्ह्यातील आंबेडकरी विचारांच्या धार्मिक सामाजिक व राजकीय संस्था संघटनांचा बुधवारी १७ सप्टेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून बौद्ध बांधवांनी जिल्हाकचेरीवर जन आक्रोश मोर्चा काढला.

या वेळी जिल्हा कचेरीवर मोर्चेकऱ्यांनी धडक दिली. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे आद्य प्रणेते अनागारीक धम्मपाल, पेरियार ईव्ही रामास्वामी यांची जयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सुपुत्र भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर राज्यव्यापी आंदोलनांतर्गत जिल्हा कचेरीवर मोर्चाला प्रारंभ झाला. हा मोर्चा राणी दुर्गावती चौक मार्गे जिल्हा कचरीवर धडकला.

मोर्चामध्ये पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून बौद्ध उपासक उपासिका हातात पंचशील ध्वज घेऊन शांततेच्या मार्गाने घोषणा देत जिल्हाकचेरी परिसरात पोहोचले.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या शिष्ट मंडळांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, बिहारचे मुख्यमंत्री यांना सह्यांचे निवेदन पाठवले. या वेळी बुद्धगयेचे महाबोधी विहार मुक्त झालेच पाहिजे, महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात मिळालेच पाहिजे, बीटी अ‍ॅक्ट १९४९ रद्द करा, जग मे बुद्ध का नाम है -यहीभारत की शान है, भारतीय संविधानाचा विजय असो आदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. बुद्धांच्या अस्मितेचा अस्तित्वाचा प्रश्न असल्याने जिल्ह्यातील आंबेडकरी विचाराच्या संस्था, संघटना, बौद्ध विहार महिला मंडळ सहभागी झाले होते. शिस्तबद्ध निघालेल्या मोर्चात सहभागी बौद्ध उपासक, उपासिकांनी दोनच्या रांगेत शिस्तबद्धपणे मोर्चा सहभागी झाल्या होत्या.

समता सैनिक दलाचे सैनिक मोर्चावर नियंत्रण ठेवून होते. अनुसूचित घटना घडू नये, याकरिता समता सैनिक दलाचे सैनिक मोर्चावर लक्ष ठेवून होते. मोर्चात भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार, जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर, संजय चौरपगार, प्रा. डॉ मुकेश सरदार, प्रचार व पर्यटन सचिव नयन मोंढे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया धांडे, गणपत तिडके, रमेश बडगे, विद्या वानखडे, उमा वानखडे, सुनीता रामटेके, मालती मेश्राम, पुरुषोत्तम बंजारी, प्रा. डा. प्रमोद भालेराव, आर के भटकर, मदन खंडारे, माधुरी चौरपगार, ज्योती बोरकर, राजेश्वरी मनोरे, मुकुंद मेश्राम, सुरेश दहाटे, अनुपमा दामले, अंजना आठवले, पुष्पा बोरकर, जया ढोके, सुनिता कवाडे, राहुल शेंडे, बळवंत गाठे, माजी नगरसेवक मंगेश मनोहरे, प्रा जगदीश गोवर्धन, अ‍ॅड. प्रमोद वानखडे, राजेश चोरपगार, बाबूलाल धाकडे, आनंद इंगळे, बाबाराव गायकवाड, राजेश वानखडे, सुरेश तायडे, सचिन तेलमोरे उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागाच्या
## विद्यार्थ्यांची मध्यवर्ती कारागृहास शैक्षणिक भेट



■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. १८ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच अमरावती शहरातील मध्यवर्ती कारागृहास शैक्षणिक भेट दिली. या शैक्षणिक भेटी दरम्यान विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी भारतीय तुरुंग व्यवस्थेच्या दृष्टीने अभ्यास केला. तुरुंगातील बांदिस्ताना मानवी दृष्टीकोनातून बघावे, केवळ गुन्हेगार म्हणून त्यांच्याकडे बघू नये आणि यातून त्यांच्या परिवर्तनाकडे अधिक भर देण्यात येतो, अशी माहिती कारागृह अधीक्षक श्री संजय घोलप व श्री ललित मुंडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिली.

भारतीय कायद्यातील विविध प्रकारच्या शिक्षेच्या तरतुदींबाबतही त्यांनी सांगितले. कारागृह परिसरातील बागकाम, सुतार काम, स्वयंपाकाचे काम, दळण केंद्र तसेच बायमेट्रीक याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विशेष म्हणजे बंदिस्त असलेल्या बांधवांनी तयार केलेल्या एलइडी लाईटचा प्रोजेक्ट महाराष्ट्रातील अमरावती कारागृहात पहिल्यांदाच सुरू करण्यात आला असल्याचेही सांगून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसनही श्री घोलप केले. यावेळी विधी विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार एस. चौबे यांच्या मार्गदर्शनात या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. डॉ. कल्पना जावळे, डॉ. योगिता हुतके, डॉ. स्वप्नील बावरे, प्रा. प्रतिक्षा डोंगरे, प्रा. हेमलता आत्राम, प्रा. खुशबू झांझोटे, प्रा. राजकुमार कटकतलवारे, प्रा. चेतन उघडे यांनी श्री संजय घोलप, वरिष्ठ तुरुंग अधिकारी ज्योती आठवले, कर्मचाऱ्यांचे रोपटे देवून स्वागत केले. अधिक्षक कीर्ती चिंतामणी व विधी विभागातील श्री. मुरलीधर खोपडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रीय बेरोजगार दिनी अनोखे आंदोलन

## चहा, फळांची दुकाने थाटून व्यक्त केला संताप



**चिखली :** सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील २ कोटी युवकांना रोजगार देण्याची हमी दिली होती. प्रत्यक्षात मात्र देशात युवकांच्या बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. उच्च शिक्षण घेऊनही हातात नोकरी नसल्याने युवकांना चहा, वडापाव, फळांची दुकाने टाकावी लागत आहे. युवकांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त चिखली शहर व तालुका युवक काँग्रेसतर्फे चिखली येथील जयस्तंभ चौकात राष्ट्रीय बेरोजगार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शहर व तालुका युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी चहा, फळे वडापाव, मक्याची कणसे विकून तीव्र संताप व्यक्त केला. जयस्तंभ चौक येथे मोठ्या संख्येने तरुणांनी उपस्थित राहून वाढत्या बेरोजगारी विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. युवकांनी पदवी समारंभाचा शैक्षणिक पोषक परिधान करून 'इंजिनिअर चायवाला', 'एमबीए वडा पाववाला', 'ग्रॅज्युएट फळ विक्रेता' अशा फलकांसह प्रतिकात्मक आंदोलन केले. दरम्यान, 'नोकरी चोर गद्दी छोड', 'स्टॉप वोट चोरी', 'रोजगार द्या अन्यथा सत्ता सोडा' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सरकारने रोजगार निर्मितीसाठी ठोस धोरण आखावे आणि तरुणांच्या भविष्याशी खेळणे थांबवावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून दत्तपूरच्या समस्यांची दखल



■ महासागर प्रतिनिधी बुलडाणा, दि. १८ :

बुलडाणा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर दरम्यान आयोजित सेवा पंधरवडा आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची दत्तपूर ता.जि. बुलडाणा येथे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या उपस्थितीत उत्साहात सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वतः ग्रामसभा घेत दत्तपूर येथील गावकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केले. दत्तपूर हे जिल्हा प्रशासनाचे दत्तक गाव असून या गावाच्या विकासामध्ये जिल्हाधिकारी यांनी व्यक्तिशः लक्ष दिले आहे. या सेवा पंधरवड्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत शिव, पाणंद रस्त्याचे सर्वेक्षण करण्यात आले व त्याबाबत चावडी वाचना द्वारे गावकऱ्यांना अवगत करण्यात आले. तसेच जिवंत सात बारा मोहिमेबाबतही गावकऱ्यांना माहिती देण्यात आली व घरकुलांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.

## हैदरपुरा शहरी आरोग्य केंद्र येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत शेकडो महिलांनी घेतला लाभ




■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. १८ :

महानगर पालिका क्षेत्रात असलेल्या हैदरपुरा शहरी आरोग्य केंद्र येथे सार्वजनिक आरोग्य विभाग व महानगर पालिकेच्या संयुक्त विद्यमानाने मनपा आयुक्त सौम्या चांडक , अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक , उपायुक्त मेघना वासनकर व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांचे आदेशानुसार डॉ .सीमा नैताम वैद्यकीय अधिकारी , डॉ .रुपेश खडसे साथ रोग अधिकारी, डॉ स्वाती कोवे डॉ माधवी वानखेडे यांच्या नियंत्रणाखाली विविध तज्ञ डॉक्टर यांच्या कडून तपासणी करून महिला व बाल गोपाल यांचे आरोग्य चांगले असले पाहिजे त्यासाठी त्यांच्या रक्त तपासणी , डोळे तपासणी महिलांचे गुप्त आजार , कॅन्सर , बी पी, शुगर , छातीचे आजार व सर्व तऱ्हेचे आजाराचे तपासणी व औषधं उपचार देण्यात आले ह्या कार्यक्रमात हैदर पुरा येथील. वैद्यकीय अधिकारी डॉ सीमा नैताम यांनी आयोजन केले व सर्व जनतेला जाहीर आवाहन करून ह्या अभियानाचा सहभागी होऊन उपचार करण्याची विनंती केली त्याच सोबत शहरातील डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी सुधा सर्व शहरात होणाऱ्या ४ तारखे पर्यंत सर्व आरोग्य केंद्रात नागरिकांनी जाऊन सोबत आधार कार्ड घेऊन आपली आरोग्य तपासणी विनामूल्य करून घ्यावी असे जाहीर आवाहन करण्यात आले ह्या अभियानाचे परीक्षण करण्यासाठी सार्वजानिक आरोग्य विभाग येथील नोडल अधिकारी डॉ स्वाती कोवे व डॉ माधवी वानखेडे यांनी केले कार्यक्रमाला उत्फूर्त प्रतिसाद नागरिकांनी दिला.

**नगर परिषद रामटेक, जिल्हा - नागपूर**
**निविदा सूचना**

क्र./नपरा/सवि/२०२५/०४९१ दि.१८/०९/२०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी, नगर परिषद रामटेक, जिल्हा नागपूर यांचे वतीने नगर परिषद रामटेक क्षेत्रातील विविध ठिकाणी सोलर ट्री बसविणे या नॉन सी एस आर बाबींचे दर मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा विस्तृत तपशील, अटी व शर्ती व शुद्धीपत्रके हि https. mahatenders.gov.in या संकेत स्थळावरच पाहण्यास उपलब्ध आहेत.

--स्वा--
मुख्याधिकारी
नगर परिषद रामटेक

**कार्यालय नगर पंचायत गोधणी (रेल्वे)**
**ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर**

निविदा.क्र.न.प.गो.(रे.) /नगर रचना/कावि/४७३/२०२५ दिनांक :- १८/०९/२०२५

**ई- निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगर पंचायत गोधणी (रेल्वे), ता. नागपूर (ग्रामीण) जि. नागपूर यांच्या वतीने नगर पंचायत गोधनी (रेल्वे) ची विकास योजना तयार करणे अंतर्गत बि-१ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई- निविदा पद्धतीने करावयाची आहे, निविदा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक १९/०९/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच वेळोवेळी प्रसिद्ध होणारे शुद्धीपत्रके याच संकेतस्थळावर (वेबसाईटवर) पाहण्यास मिळेल

- स्वा/ -
(डॉ. सुप्रिया राठोड)
मुख्याधिकारी
नगर पंचायत गोधनी (रेल्वे)

**दि शेतकरी सहकारी जिनींग प्रेसींग सोसायटी**
**लि. काटोल र. नं. १०१**

**निविदा सूचना २०२५ - २०२६**

संस्थेचे नांव :- दि शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग सोसायटी लि. काटोल रं. नं.१०१ संस्थेचा २०२५-२०२६ कापूस हंगाम भाडे करारनाम्या करीता जिनिंग प्रेसिंग कारखाना किरायाने देण्याकरीता व कार्यालयाचे वर रूमचे बांधकामाकरीता निविदाची www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर माहीती प्रसिध्द करण्यात आली आहे

अध्यक्ष
दि शेतकरी सहकारी जिनींग
प्रेसींग सोसायटी लि. काटोल

# बिहार विधानसभा : आघाडीचे पारडे जड!

पुढील आक्टोंबर नोव्हेंबर महिन्यात बिहार विधानसभेची निवडणूक होणे अपेक्षित आहे त्या दृष्टीने बिहारमध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. आचारसंहिता केव्हाही लागू शकते यासाठी आता पासून सर्व राजकीय पक्ष आप आपल्या पद्धतीने कामाला लागलेले आहेत. इंडिया आघाडी विरुद्ध भाजपा प्रणित आघाडी असा सामना बिहार राज्यात रंगणार आहे त्यापूर्वीच राजकीय पक्षांनी मतदाराला भुरळ पडेल अशा घोषणा करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे एरव्ही पाच वर्षापर्यंत कधी जनतेच्या सुखदुःखात सहभागी न झालेले नेते आता निवडणूक पाहून जनतेची काळजी करू लागले आहेत.

-------------------

बिहार विधानसभेमध्ये एकूण 243 विधानसभेच्या जागा आहेत. मागील विधानसभा निवडणूक कोविड 2019 नंतर 2020 मध्ये पार पडली होती.त्यात नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाला केवळ 43 जागा मिळाल्या होत्या.भाजपाने 74 जागावर विजय मिळवला होता, 125 विधानसभेच्या जागा मिळवून एनडीए सत्तेत आली होती. राष्ट्रीय जनता दलाला व त्याचे मित्र पक्षांना 110 जागावर विजय मिळाला होता. राष्ट्रीय जनता दलाने 75 जागा जिंकल्या होत्या.

कोविड महामारीनंतर झालेली ही पहिलीच निवडणूक होती त्यामुळे नितीश कुमार यांचा पराभव होईल असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज होता. मात्र नितीश कुमारांनी बाजू राखली. केवळ 43 जागावर विजय मिळाला तरी मुख्यमंत्री पद स्वतःकडे ठेवण्यात यशस्वी झाले होते. नितीश कुमार कधी कोणती खेळी करणार याचा विश्वास राहिलेला नाही. कधी एनडीए तर कधी इंडिया आघाडी सोबत त्यांनी सत्ता स्थापन केल्याचे बिहारच्या राजकारणात दिसून आले. कारण त्यांची प्रतिमा पलटूराम अशी झाली आहे.

बिहारचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले नितीश कुमार यांच्यावर राजकीय नेत्यांचा विश्वास राहिलेला नाही. सन 2015 च्या बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल व कॉंग्रेस सोबत युती केली होती, त्यावेळेला संयुक्त जनता दलाला 71 जागा व राष्ट्रीय जनता दलाला 80 जागा मिळाल्या होत्या. 243 सदस्य संख्या असलेल्या विधानसभेत 178 इतके प्रचंड बहुमत मिळाले होते.

मात्र सन 2014 ची लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचा विजय झाल्यानंतर मे 2017 मध्ये नितीश कुमार यांनी परत पलटी मारली आणि भाजप सोबत सत्ता स्थापन केली. नितीश कुमार यांनी सत्तेसाठी इकडून तिकडे पलटी मारण्याची ही पहिलीच वेळ नाही अनेकदा त्यांनी सत्तेसाठी बेडूक उडी मारली आणि सत्ता स्थानी आपले महत्व अधोरेखित केले.

प्रत्येक निवडणूक नवीन विचार घेऊन येत असते महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे चित्र बदलेल असा राजकीय निरीक्षकांचा कयास होता. निवडणुकीच्या अगदी तोंडावर महाराष्ट्राच्या शिंदे सरकारने अनेक घोषणा केल्या. अनेक परिपत्रके काढली प्रत्येक समाजाला खुश करण्यासाठी अनेक घोषणा केल्या. लाडक्या बहिणींना खुश करण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अमलात आणली.

घाई घाईत योजना आणून निकषात बसत नसलेल्या महिलांच्या खात्यातही दीड हजार रुपये टाकन्यात आले. हे सर्व केवळ निवडणुका जिंकण्यासाठीच करण्यात आले होते लाडक्या बहिणीसाठी योजना आणली खरी पण हे पैसे आणायचे कुठून याचा ताडेबंद सरकारला करता आला नाही.

परिणामतः अनेक लोक हिताच्या योजनांवर सरकारला निधी देता आला नाही कंत्राटदारांचे पैसे दिले गेले नाहीत, अनेक कंत्राटदारांनी आत्महत्या केल्या. निधी मिळत नाही म्हणून कंत्राटदारांनी कामे अर्धवट ठेवली. पूर्ण पैसा लाडक्या बहिणीकडे वळवल्यामुळे विकास कामासाठी महाराष्ट्रात निधीची कमतरता भासू लागली त्यामुळे विकास कामावर परिणाम पडू लागला.

बिहार राज्यही याला अपवाद दिसून येत नाही. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी महिलांचे मते मिळवण्यासाठी अजिविका दीदी गट स्थापन करून सदर गटांना व्यवसाय करण्यासाठी दहा हजार रुपये देण्याची योजना सुरू केली. यात महिलांच्या यशस्वीतेवर पुन्हा दोन लाख रुपये वाढीव रक्कम देण्याची पुष्टीही त्यांनी जोडली. ही योजना म्हणजे निवडणुकावर लक्ष ठेवून केलेली घोषणा असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला.

वास्तविकता जनतेने आता सतर्क राहून मतदान करण्याची आवश्यकता आहे. गेल्या पाच वर्षात जनतेच्या कोणत्या प्रश्नांची सोडवणूक झाली? हा प्रश्न सत्ताधाऱ्यांना विचारणे आवश्यक आहे. थोड्याशा लोकप्रिय घोषणेमुळे मतदारांनी विचलित होता कामा नये. गेल्या पाच वर्षाचा हिशोब जनतेनी करावा. लोकशाही राज्यासाठी हे आवश्यक आहे भविष्यात सुज्ञ व जागरूक मतदार याचा विचार करतील असा विश्वास आहे.

बिहार राज्यामध्ये आज अनेक प्रकारच्या समस्या आहेत. बिहार लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये घोटाळा झाल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. या परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमत्ता असल्याची भावना युवकामध्ये आहे. सत्ताधारी पक्षांनी याकडे जाणीवपूर्व डोळे झाक केली असा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. या अनियमित्तामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे.

सततची गरिबी, वाढती बेरोजगारी, गुंतागुंतीचे सामाजिक स्तरीकरून, असमाधानकारक पायाभूत सुविधा, कमकुवत प्रशासन, आरोग्य व शिक्षण या प्रश्नाकडे सरकारचे झालेले दुर्लक्ष, आरोग्य व शिक्षण या खात्यांना मिळालेला अपुरा निधी, स्थलांतरण यासारख्या समस्या बिहारमध्ये आ वासून उभ्या आहेत. त्या सोडवण्यात सत्ताधारी पक्षाला अपयश आल्याचे विरोधकांनी म्हटले आहे. अशा परिस्थितीत बिहारची विधानसभा निवडणूक होणार आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मत चोरीवरून संपूर्ण देशात केंद्र सरकारला धारेवर धरले आहे मतदार निरीक्षण कार्यक्रम अंतर्गत निवडणूक आयोगाने 65 लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली. ही नावे का वगळण्यात आली याचे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने दिलेले नाही.

शेवटी याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने हस्तक्षेप केल्यामुळे नागरिकांना थोडा दिलासा मिळाला. राहुल गांधींची मत चोरी विषयक पदयात्रा बिहारमध्ये मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली भविष्यकाळात या पदयात्रेचा इंडिया आघाडीला फायदा होईल का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

बिहार विधानसभेचे विरोधी पक्ष नेते तेजस्वी यादव यांनी सुद्धा मत चोरीचा मुद्दा अतिशय गांभीर्याने घेतला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच्या नुकताच संपलेला बिहार दौरा निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे सीमांचल या बिहारच्या भागात पूर्णिया या जिल्ह्यात विमानतळाचे उद्घाटन केले आणि चाळीस हजार कोटींचा विकास कामाचे उद्घाटन आणि पायाभरणी केली.

सीमांचल हा भारतीय जनता पार्टीसाठी नेहमीच अडचणीचा भाग ठरलेला आहे. सीमांचल या प्रदेशात बिहारचे चार जिल्हे येतात. त्यात कटिहार, पूर्णिया, अररिया, किशनगंज, या जिल्ह्याचा समावेश असून या भागात विधानसभेच्या 24 जागा येतात.या 24 जागा जिंकण्यासाठी पूर्णिया येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी सभा घेतली.

निवडणुकांच्या अगदी समिप अशा घोषणा व पायाभरणी केल्या गेली. हे जनतेला आता समजू लागले आहे. त्यातच बिहारमधील भागलपुर प्रस्तावित वीज प्रकल्पावर कॉंग्रेसने प्रश्न उपस्थित केला असून सत्ताधारी पक्षाने 1050 एकर जमीन अदानी समूहाला देण्याचा विचार केला आहे या सर्व बाबींचा निवडणुकीवर कसा परिणाम होतो ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

बिहारमध्ये जातीय समीकरणे आजपर्यंतच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरलेली आहेत. 2011 च्या लोकसंख्येनुसार यादव समाज 14% कुर्मी समाज 4%, कुशवाह 8%, दलित 16 %, आणि मुसलमान 16% असल्याचे दिसून येते. राजकारणात सध्या जातीला महत्त्व आलेले आहे. जो तो आपली जात शोधतो आहे.

एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवैसी यांनी बिहार विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा केली असून इंडिया आघाडीत समाविष्ट होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र राष्ट्रीय जनता दलाने याला विरोध केला आहे. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर ही आपल्या पक्षाच्या विजयासाठी प्रयत्नरत आहेत. छोटे-मोठे पक्ष निवडणुकांच्या आराखड्यात उतरणार हे निश्चित मात्र बिहारची विधानसभा निवडणूक भारतीय राजकारणाला नवी दिशा देणारी ठरेल अशी परिस्थिती आहे.

भारतीय जनता पक्षाने मोदी मित्र डिजिटल योद्धा ही मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे या मोहिमेद्वारे सरकारने केलेली विकास कामे जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे यासाठी दहा हजाराच्या वर डिजिटल योद्धे निर्माण केले जातील. या दृष्टीने राष्ट्रीय जनता दल व कॉंग्रेस आघाडीने आपला प्रचार आखावा लागणार आहे. सोशल मीडिया सोबतच संघटना बांधणी सुद्धा कॉंग्रेस व त्याच्या मित्र पक्ष्यांना योग्य पद्धतीने करून घ्यावे लागणार आहे.

# आत्महत्या करणे हे घाबरट व अविचारी माणसांचे लक्षण

आजकालचा माणूस अविचारी, असंयमी, अधीर व डरपोक वृत्तीचा बनला आहे. त्याची विचारसरणी व वैचारिक कुवत म्हणावी तेवढी प्रबळ व सक्षम झाली नाही. म्हणून तो त्याच्यावर आलेल्या संकटांना, त्याच्यावर आलेल्या अपयशांना, त्याच्यावर आलेल्या अडीअडचणींना आणि त्याच्या वाट्याला आलेल्या दुःखाला पचवण्याची क्षमता व विचारधारा डरपोक बनली आहे.

म्हणूनचे हल्ली माणसांचे विचार पोकळ झाले आहेत. आजकालचा माणूस अगदी शुल्लक गोष्टीचा सुद्धा विचार करून मानसिक ताण घेत आहे. जसे की, परीक्षेत नापास होणे, स्पर्धा परीक्षेत एक दोन गुणांनी हुकणे, वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून, घरातील अठरा विश्व दारिद्र्याचा नायनाट होत नाही म्हणून किंवा वाट्याला कायम दुःख येत आहे म्हणून आजकालची माणसे स्वतःचे मन खंबीर व धीट बनवून आलेल्या अपयशाला व दुःखाला न घाबरता व न डगमगता मन व काळीज धाडसी बनवून आणि विचारधारा परिपक्व बनवून त्याच्यावर हिंमतीने मात करून पुढील वाटचाल केली पाहिजे.

जीवनात येणारे दुःख हे काय, कायमस्वरूपी राहत नसते. कालांतराने दुःखाचा नायनाट होऊन सुख प्राप्त होत असते. दुःखानंतर सुखाची आणि सुखानंतर दुःखाची मंगलमय पहाट उगवत असते, हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून जीवनात येणाऱ्या दुःखाचे मनःपूर्वक स्वागत करा आणि हुरळून न जाता सुखाला सलाम करा. कारण जीवनात दुःख आहे म्हणून सुखाचे महत्त्व कळते. म्हणून माणसाने दुःखातून खूप काही शिकले पाहिजे. दुःखाचा हिंमतीने सामना करून जिगरबाज बनले पाहिजे. पण आजकाल तसे होताना दिसत नाही. आजकालच्या माणसांची विचारधारा घाबरट व बोथट बनली आहे.

आत्ताच्या मुलांना जीवनात आलेले दुःख व यश पचवता येत नाही. जीवनात जरासे दुःख व अपयश आले म्हणून जरा धीर व हिंमत न धरता? आत्ताची मुले निराश व दुःखी बनत आहेत. आणि भलतेच नको ते टोकाचे पाऊल उचलून नको ते अविचारी कृत्य करत आहेत. म्हणजेच टोकाचा विचार करून स्वतःचे जीवन संपवत आहेत. विद्यार्थ्यांच्या, बेरोजगारांच्या, शेतकऱ्यांच्या आणि विविध कारणांनी जसे की, वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून किंवा वेळेवर नोकरी मिळत नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या माणसांची संख्या प्रचंड वाढली आहे. मला एवढे शिकूनही नोकरी नाही म्हणून मला लोक काय म्हणत असतील? शेतकरी दुष्काळाच्या व अतिवृष्टीच्या कचाट्यात सापडल्यामुळे, डोक्यावर कर्जाचा भार व घरातील खर्च, मुला बाळांचे शिक्षण, मुलींचे लग्न डोळ्यासमोर तरळत असताना या संकटांना घाबरून आत्महत्येला सामोरे जात आहेत.

अशा अविचारी व घाबरट लोकांना मला सांगावे वाटते की, बाबांनो हे जीवन लाख मोलाचे आहे, या जगात आपण काहीही खरेदी करू शकतो. परंतु आई-वडिल, गेलेली वेळ आणि अनमोल जीवन हे माणसाला पुन्हा पुन्हा कधीच मिळू शकत नाही. म्हणून मिळालेला जन्म हा आनंदाने व सुखाने कोणते ही कार्य कर्तृत्व करून जीवनाला अखेरचा निरोप द्यावा. मेल्यानंतरही लोकांनी आपल्या नावाचा जयजयकार व उदोउदो केला पाहिजे एवढेच करा. त्यासाठी स्वतःचे मन खंबीर बनवा आणि काळीज बेडर व निर्भीड बनवून विचार परिपक्व करून येणाऱ्या संकटांना, दुःखांना व अपयशांना मोठ्या धाडसाने सामोरे जाऊन परिस्थितीला लोळवायला शिका.

सध्या मराठा समाज आरक्षण मिळत नाही म्हणून मोठमोठे मोर्चे काढत आहे. मराठा समाजाला आता आरक्षणाची नितांत गरज आहे. एकेकाळी गडगंज संपत्तीचा व भरपूर जमिनीचा मालक असणारा मराठा समाज आज एक दोन एकरावर येऊन बसला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट झाल्यामुळे आणि विद्यार्थ्यांना शिक्षणात व नोकरीत आरक्षण नसल्यामुळे विद्यार्थी वेळेवर नोकरीला लागत नाहीत म्हणून बहुतांश शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवत आहेत.

खरे तर आत्महत्या करणे हा यावर उपाय नाही हे विद्यार्थ्यांना कोण सांगणार? त्यासाठी अविरत संघर्ष करून व शासनाला न मागता कायदेशीर खेचून आणून आरक्षण मिळवले पाहिजे. आत्महत्या करून जीवन संपवणे हे खरोखरच मला तर योग्य वाटत नाही. हे डरपोक व अविचारी लोकांचे लक्षण आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. माझ्या गावातील माझा मित्र विविध सामाजिक संघटनेत काम करणारा व मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज दादा जरांगे पाटलांसोबत आरक्षण मिळावे म्हणून समाजकार्यात सक्रिय असणारा अभिजीत गोविंदराव सोळंके हा मुलगा कुणबी नोंदी सापडत नाहीत म्हणून स्वतःच्या मुलीचे भवितव्य त्याला भेडसावत होते. अखेर त्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवले आहे, शासनाने याची दखल घेऊन त्याच्या कुटुंबीयांना व मुला बाळांना आर्थिक मदत करावी आणि त्यांना आर्थिक व मानसिक आधार द्यावा..

खरे तर अभिजीत तू चुकलास तू हे करायला नाही पाहिजे होतास, तुज्यासारखा धाडसी व हिंमतबाज माणूस असे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलेल हे मला कधीच वाटले नव्हते...परंतु मराठा समाजाच्या आरक्षणासाठी तू आत्महत्या नाही केलीस तर तू बलिदान दिलास असेच म्हणावे लागेल...

सगळ्या विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांना व गरजवंत मराठ्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, बाबांनो स्वतःचे जीवन संपवून घरच्यांना दुःख सागरात लोटू नका, काही दिवस शांत व निशिंत रहा...कोणाचीच परस्थिती कायम एकसारखी राहत नसते. एक दिवस तुमची ही परिस्थिती बदलेल आणि तुमच्याही जीवनात सुखाचे व आनंदाचे क्षण येतील एवढे मात्र नक्की...

त्यासाठी जिगरबाज म्हणून आलेल्या संकटाला, अपयशाला व दुःखाला घाबरून न जाता कठोर काळीज करून त्याचा हिंमतीने व धाडसाने सामना करा पण आत्महत्या करण्याच्या भानगडीत पडू नका कारण आत्महत्या करणे हे अविचारी व डरपोक लोकांचे लक्षण आहे हे ओळखा...

-------------------

■ बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता. अहमदपूर, जि. लातूर
7498715661

■ ■ ■

# कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे. श्रीलंका व बांगलादेशांत जे घडले तेच नेपाळमध्ये घडले. नेपाळच्या के पी शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यावर तेथील तरुणाईने ( जेन झी ) मोठा उठाव केला. हा उठाव इतका मोठा होता की नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली यांना पदावरून पाय उतार व्हावे लागले.

त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळू पळू मारले. त्यांची धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले. राजकीय नेत्यांची घरे जाळली. सरकारी कार्यालयाला आगी लावल्या. नेपाळची संसद आणि सर्वोच्च न्यायालय जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मरण पावले तर १३०० हून अधिक नागरिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच श्रीलंकेमध्ये तीन वर्षापूर्वी घडले. बांग्लादेशातही मागील वर्षी तेच घडले. श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला. त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली.

नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी नेपाळच्या हंगामी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात आश्रय घेतल्यावर तिथे राजकारणाबाहेरील व्यक्ती असलेल्या मोहम्मद युनूस यांच्याकडे बांगलादेशचे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. त्यांनी बांगलादेशची सूत्रे स्वीकारल्यानंतर भारतानेही त्याचे स्वागत केले त्यांच्या कार्यकाळात बांगलादेश आणि भारताचे संबंध दृढ होतील असा विश्वास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता मात्र झाले उलटेच.

मोहम्मद युनूस बांगलादेशचे लष्कर आणि मुलतत्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले. चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपी लागून ते भारताला शत्रू मानून भारताच्या खोड्या काढू लागले. आता नेपाळची सूत्रेही राजकारणाबाहेरील व्यक्तीकडे गेली आहेत त्यामुळे नेपाळमध्येही बांगलादेशची पुनरावृत्ती होते की काय अशी शंका येते. राजकीय छक्के पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहीत नसलेल्या नेपाळच्या या नव्या पंतप्रधानांना तेथील लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून? बांग्लादेशात आपण हे पाहिले आहे.

नेपाळमधील या अराजकतेमागे बाह्य शक्तीचा हात आहे हे लपून राहिले नाही. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर कोण ? असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काही जण याचे उत्तर भारत असे देत आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ प्रमाणे भारत ही अराजकतेच्या वाटेवर आहे असे बिंबवण्याचे प्रयत्न चालू आहे.

जे श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळमध्ये घडले तेच भारततही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी, अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. जागतिक पटलावर भारताचे वाढते वर्चस्व सहन न होणाऱ्या हित शत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे. मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही, कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत.

भारतीय लोकशाही जगातील सुदृढ लोकशाही आहे. कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजत आहे. भारताची लोकशाही कमकुवत नाही तर ती सुदृढ आहे. भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही. संविधान हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही आपला देश एकसंध आहे तो केवळ आपल्या संविधानामुळे.

बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपला देश एकसंध आहे. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या शेजारील देशात अनेकदा उठाव, बंड झाले. काही देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही आली. काही देशावर लष्कराने ताबा मिळवला आपल्या देशात मात्र अजूनही लोकशाही आहे म्हणजेच लोकांचे राज्य आहे. जोवर या देशात बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान आहे आणि जोवर आपल्या देशात लोकशाही आहे. जोवर देशात लोकशाही आहे तोवर या देशात अराजकता मानणार नाही.

-------------------

■ श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

# नवरात्रातील नऊ रंग : शास्त्र, अपसमज की मार्केटिंग फंडे!

**वाचक लिहितात**

आई जगदंबेचे नवरात्र पुढच्या आठवड्यापासून सुरू होते आहे. नवरात्रात भावभक्तीचा जागर, घरोघरी, मंदिरात घटस्थापना, पूजा -अर्चना, सप्तशती पाठ, भजन, कुमारिका पूजन, गोंधळ, घागरी फुंकणे आणि हल्ली मोठ्या प्रमाणात होत असलेले गरबे आणि दांडिया असे या नवरात्राचे स्वरूप असते.

शक्तीचे रूप असलेल्या महिलांचा भक्तिभाव आणि उत्साह यावेळी बघण्यासारखा असतो. पण याच भक्तिभावाचा, उत्साहाचा फायदा काही मार्केटिंग कंपन्या कशा करून घेतात याची प्रचिती याच उत्साहात जाणवते. गेल्या काही वर्षांपासून एक वेगळीच परंपरा किंवा वेगळाच विचार प्रवाह या नवरात्रात आढळून येतो. तो म्हणजे नवरात्रात नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या परिधान करणे, प्रत्येक दिवशीचा रंग हा ठरलेला असतो. महिला वर्गाला याचे प्रचंड आकर्षण आहे. अगदी विशिष्ट रंगाची साडी नसेल तर ती आवर्जून विकत घेतली जाते. त्याच बरोबर त्यावरील अलंकारही मॅचिंग घेतले जातात. त्यासाठी इतरही स्त्रियांना प्रवृत्त केले जाते. गेल्या दोन-तीन वर्षापासून तर पुरुष सुद्धा त्या रंगाचे वस्त्र प्रधान करू लागले आहे.

पण देवीच्या नवरात्रात नऊ रंगांच्या साडी नेसण्याला काहीही शास्त्रीय आधार नाही. देवीच्या साड्यांचे रंग काही ठिकाणी वारानुसार, काही तिथीनुसार ठरलेले असतात. परंतु त्या रंगाचे वस्त्र भक्तांनी परिधान करावे असे कुठेही वेद, उपवेद, शास्त्रे, अठरा पुराणे, रामायण, महाभारत यापैकी कुठल्याही ग्रंथात असे दिलेले नाही. मग हे रंगांचे खूळ नवरात्रात आले कसे?

आपल्या सणांमध्ये काहीतरी नाविन्यपूर्ण भन्नाट कल्पना आणून त्याद्वारे आपले आर्थिक उद्योग, व्यवसाय वाढवायचे अशी जणू स्पर्धाच आता मार्केटिंग कंपन्यांमध्ये सुरू झाली आहे. त्यातूनच हे नऊ रंगांचे खूळ जन्माला आले. परिणामी नवरात्रात , शाळा- कॉलेजात, मंदिरात, भजनात नऊ रंगांच्या साड्या दिसू लागल्या. यापेक्षा नवविधा भक्ती करणे, आपल्यातील नऊ दोष दूर करून, नऊ गुणांची वृद्धी करणे. असे प्रयत्न केले तर केवळ नऊ दिवसांच्या या उपासनेने आपले आणि आपल्या कुटुंबाचे नक्कीच कल्याण होईल.

नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे हे पुढच्या पिढ्यांवर बिंबवण्यासाठी पारंपारिक पद्धतीने, भक्ती भावाने तो साजरा केला पाहिजे. अन्यथा पुढच्या पिढ्यांना तो मनोरंजनात्मक फॅशन शो वाटेल. आणि त्याच पद्धतीने ते साजरा करतील. हा धोका टाळायचा असेल तर आत्ताच आपण याबाबतीत जागृत झालं पाहिजे. या सगळ्या प्रकाराला कुठलाही शास्त्रीय आधार नाही. तेव्हा महिलांनी त्याच्या आहारी न जाता सुज्ञपणे, भावभक्तीने नवरात्र उत्सव साजरा करावा.

देवीने चंड- मुंड, शुंभनिशुंभ, रक्तबीज अशा राक्षसांना मारून जगदंबेने जी विश्रांती घेतली तो काळ म्हणजे नवरात्र. नवरात्रात महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या तिन्ही रूपातील देवींची उपासना करावी. धनधान्य, सुबत्ते करिता महालक्ष्मीची उपासना करावी, शत्रु संहार करण्यासाठी, सामर्थ्य प्राप्तीसाठी महाकालीची उपासना करावी. तसेच मुलांकडून सरस्वती देवीची, विद्या आणि बुद्धी याकरता उपासना करून घ्यावी. नवरात्र काळात सप्तशती पाठ करणे, आपल्या कुलदेवतेचा जास्तीत जास्त नामजप करणे, ओटी भरणे, भावपूर्ण भजन पूजन करणे यामुळे निश्चितच जगदंबेचे आशीर्वाद सर्वांना मिळतील.

---------------

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

# मराठवाडा ऐतिहासिक पार्श्वभूमी

**उत्तरार्ध**

(कालच्या अंकावरून पुढे)

-------------------

मुख्य लढाई पहिल्या आर्म्ड डिव्हिजनने सोलापूर येथे सुरू केली. सोलापूर ते हैदराबाद असा लढाईचा मार्ग होता. या मुख्य लढाईचे नेतृत्व मेजर जनरल जयंत चौधरी यांनी केले. दुसरी आघाडी विजयवाडा मार्गे होती. तिचे नेतृत्व मेजर जनरल ए. ए. रुद्र हे करत होते.

त्याशिवाय कर्नुल, आदिलाबाद, चाळीसगावमार्गे, औरंगाबादकडून वाशीम मार्गे, हिंगोलीतून बुलढाणामार्गे, जालन्यातून, सोलापूरमार्गे उस्मानाबाद लातूरकडून, गदग - रायपूरकडून अशा निरनिराळ्या ठिकाणांहून भारतीय फौजा हैदराबाद संस्थानात घुसल्या.

१३ सप्टेंबरच्या पहाटेपासून भारतीय फौजांनी आत्मविश्वासाने कारवाई सुरू केली. पोलिस अॅक्शनमुळे जनरल अल इद्रिस यांच्या नेतृत्वाखाली निजामी सैन्याची अक्षरशः वाताहत झाली. पोलिस अॅक्शनची कार्यवाही १७ सप्टेंबर, १९४८ पर्यंत चालू राहिली. पोलिस अॅक्शननंतर हैदराबाद मुक्तिसंग्रामाची सांगता झाली.

हैदराबाद मुक्तीसंग्राम हा जनतेच्या सामर्थ्यांचा अभूतपूर्व असामान्य विजय समजला जातो. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मीर उस्मान अली याने भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली. म्हणून हा दिवस खऱ्या अर्थाने मराठवाड्याचा मुक्तीदिन आणि भारतीय संघराज्यात सामिल होण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो.



*ऑपरेशन पोलोनंतर शेवटचा निजाम मीर उस्मान अली याने भारतासमोर शरणागती पत्करली.*

# सकाळी रिकाम्या पोटी दुधासोबत शिळी चपाती खाणे लाभदायी



जेवण बनवता सहसा प्रत्येकजण जरा जास्तच जेवण बनवतो. जसं की चपात्या किंवा रोट्या या शिल्लक राहतातच. पण हे अनेकांना माहित नसेल की या शिळ्या रोट्या किंवा चपाती खाणे अनेकांना आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. सकाळी रिकाम्या पोटी दुधासोबत शिळ्या रोटीचे किंवा चपातीचे सेवन केल्याने नक्कीच त्याचे अनेक फायदे आपल्या शरीराला मिळू शकतात.

शिळ्या चपातीमध्ये असे घटक आढळतात जे तुमचे पोट थंड ठेवण्यास मदत करतात. सकाळी दुधासोबत शिळी चपाती सेवन केल्याने पोट शांत राहते आणि अॅसिडिटीपासूनही आराम मिळतो. शिवाय पोटही भरतं.

**मधुमेहाच्या रुग्णांना फायदा मिळतो**

मधुमेहाच्या रुग्णांसाठी तर शिळी चपाती आणि दूध खाणे फार फायदेशीर ठरू शकते. त्याच्या सेवनाने मधुमेहावर नियंत्रण राहण्यास मदत होते. दुधासोबत शिळी चपाती खाल्ल्याने शरीराला ऊर्जा तर मिळतेच पण सोबतच साखरेची पातळी देखील अचानक वाढत नाही.

**बद्धकोष्ठतेपासून आराम**

सकाळी रिकाम्या पोटी दुधासोबत शिळी चपाती खाल्ल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. त्यात भरपूर फायबर असते जे पचन प्रक्रिया सुधारण्यास मदत करू शकते.

**वजन नियंत्रित राहते**

सकाळी रिकाम्या पोटी दुधासोबत शिळी चपाती खाल्ल्याने तुमचे पोट बराच वेळ भरलेले राहते. ज्यामुळे भूक लागत नाही आणि तुम्ही जास्त खाण्यापासून वाचता. ज्यामुळे तुमचे वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.

**मजबूत हाडे**

दुधात कॅल्शियम आढळते आणि रोटीमध्येही भरपूर पोषक तत्वे असतात. अशा परिस्थितीत या दोन्हींचे सेवन हाडे मजबूत करण्यास मदत करू शकते.

**ऊर्जा मिळते**

सकाळी रिकाम्या पोटी दुधासोबत शिळी चपाती खाल्ल्याने तुमच्या शरीराला संपूर्ण दिवसासाठी ऊर्जा मिळते

**या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवा**

चपाती एक दिवस आधीची शिळी असावी. आणि जर चपातीची चव आंबट लागत असेल किंवा वास येत असेल किंवा कधी कधी चपाती वातावरणामुळे एका दिवसातही खराब होण्याची शक्यता असते. त्यावर बुरशी चढली असेल तरी देखील ती चपाती किंवा रोटी खाऊ नये.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### प्लॅस्टिक हटाव

प्रत्येक कुटूंबाने ठेवावे
सामाजिक भान
प्लॅस्टीक हटाव योजनेत
द्यावे आपले योगदान ..

ओला - सुका कचऱ्याचे
घरी करावे वर्गीकरण
घंटा गाडी येता द्वारी
रितसर करावे विसर्जन ..

कापडी पिशव्यांचा वापर
खरेदीसाठी ग्राहकांनी करावा
पॉलीथीयन पिशव्यांचा
खरेच वापर टाळावा ..!

## सोनप्रयाग ते केदारनाथ या प्रसिद्ध रोपवे प्रकल्पासाठी अदाणी एंटरप्रायझेसला मिळाला एलओए

**अहमदाबाद, १८ सप्टेंबर :** अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) ला नॅशनल हायवे लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड (एनएचएलएमएल) कडून सोनप्रयागला केदारनाथशी जोडणाऱ्या प्रसिद्ध रोपवे प्रकल्पासाठी लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) मिळाला आहे. हा प्रकल्प अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडच्या रस्ते, मेट्रो, रेल्वे आणि पाणी (आरएमआरडब्ल्यू) विभागामार्फत पूर्ण केला जाणार आहे.

अदाणी ग्रुपचे चेअरमन गौतम अदाणी म्हणाले, केदारनाथ रोपवे हा फक्त एक इंजीनियरिंग प्रकल्प नाही, तर तो भक्ती आणि आधुनिक पायाभूत सुविधांमधील एक दुवा आहे. या पवित्र यात्रेला सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर बनवून आम्ही लाखो भाविकांचा विश्वास जपतो आहोत आणि नॅशनल हायवे लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड तसेच उत्तराखंड सरकारसोबत भागीदारी करून उत्तराखंडमधील लोकांसाठी नवीन संधी निर्माण करत आहोत. हा महत्वाचा प्रकल्प आमच्या त्या संकल्पाचे प्रतीक आहे, जो फक्त राष्ट्रसेवाच करत नाही तर लोकांचे जीवनही अधिक चांगले बनवतो.

१२.९ किलोमीटर लांबीचा हा रोपवे प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर, प्रवासाचा वेळ ९ तासांच्या चढाईवरून फक्त ३६ मिनिटांपर्यंत कमी होईल. ज्यामुळे केदारनाथला जाणे खूप सोपे आणि सुरक्षित होईल. ही रोपवे एका तासात प्रत्येक दिशेला १,८०० प्रवाशांना नेऊ शकेल, ज्यामुळे दरवर्षी लाखो भाविकांना मोठी सुविधा मिळेल. केदारनाथमध्ये दरवर्षी सुमारे २० लाख भाविक येतात, यावरून या प्रकल्पाचे महत्व दिसून येते.

हा प्रकल्प राष्ट्रीय रोपवे विकास कार्यक्रम पर्वतमाला प्रकल्पाचा एक भाग आहे. पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) मॉडेलवर तयार होणाऱ्या या प्रकल्पाला पूर्ण होण्यासाठी सहा वर्षे लागतील. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर एईएल हा प्रकल्प २९ वर्षे चालवेल. कनेक्टिव्हिटी सुधारण्याबरोबरच, या प्रकल्पामुळे रोजगारनिर्मिती होईल आणि पर्यटनाला मोठा चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

## इन्स्युरटेक कंपनी टर्टलमिंटकडून आयपीओसाठी गोपनीय कागदपत्रे सेबीकडे सादर

**मुंबई, १८ सप्टेंबर :** टर्टलमिंट फिनटेक सोल्यूशन्स लिमिटेड या इन्स्युरटेक कंपनीने प्रस्तावित प्राथमिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) सेबीकडे गोपनीय प्री-फाइलिंग पद्धतीने कागदपत्रे दाखल केली आहेत.

या कंपनीने प्रस्तावित प्राथमिक समभाग विक्रीसंदर्भात प्री-फाइल केलेला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस सेबीकडे व स्टॉक एक्सचेंजेसमध्ये सादर केला आहे. कंपनीचे इक्विटी समभाग या संस्थांमध्ये सूचीबद्ध होणार आहेत, असे विमा सल्लागारांवर केंद्रित असलेल्या या मुंबईस्थित स्टार्टअपने घोषित केले आहे.

या आयपीओच्या प्रक्रियेसाठी कंपनीने आयसीआयसीआय सिक्युरिटीज, जेफ्रीज इंडिया, जेएम फायनान्शियल आणि मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायजर्स या आघाडीच्या व्यापारी बँकर्सची नेमणूक केली आहे, असे बाजारातील सूत्रांनी सांगितले.

धीरेंद्र मह्यावंशी आणि आनंद प्रभुदेसाई यांनी २०१५ मध्ये स्थापन केलेली टर्टलमिंट कंपनी ही विमा पॉलिसींची खरेदी व तिचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी उभारण्यात आली आहे. या कंपनीने आपल्या पाच लाखांहून अधिक सल्लागारांच्या जाळ्यातून १.६ कोटी पॉलिसी विकल्या आहेत.

कंपनीच्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वित्तीय सल्लागार ग्राहकांच्या गरजेनुसार त्वरित योग्य त्या विमा योजना उपलब्ध करून देऊ शकतात. त्यामुळे त्यांचा व्यवसाय अधिक कार्यक्षम होतो. टर्टलमिंटला अमांसा कॅपिटल, जंगल व्हेंचर्स आणि नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांचे साह्य आहे.

## विप्रो कन्झ्युमर केअर सादर करत आहे मॅक्सक्लीन २-इन-१ फ्लोअर क्लीनर

**मुंबई, १८ सप्टेंबर :** विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंग यांचा एक आघाडीचा ब्रँड मॅक्सक्लीन फ्लोअर क्लीनर यांनी आपले एक नावीन्यपूर्ण उत्पादन मॅक्सक्लीन २-इन-१ फ्लोअर क्लीनर सादर केले आहे. हे एक वैज्ञानिक पद्धतीने बनवलेले जंतूनाशक असून ते केवळ इतर सर्वसामान्य फ्लोअर क्लीनर्सप्रमाणे जंतूनाशकाचे काम करून साचलेली घाण आणि काजळी काढत नाही, तर कीटकनाशक म्हणून देखील काम करते. एक आकर्षक टीव्हीसी अभियानाद्वारे या उत्पादनाची जाहिरात करण्यात आली आहे आणि प्रामुख्याने भारतीय घरांसाठी ते बनवण्यात आले आहे. एकाच सोयिस्कर क्रियेने स्वच्छता आणि निर्जंतुक करण्याचे काम करून दैनंदिन देखभालीकडे बघण्याचा सर्वांगीण दृष्टिकोन देणारे हे उत्पादन आहे.

मॅक्सक्लीनचा दुहेरी फॉर्म्युला उपभोक्त्यांना जंतूपासून सर्वसामान्य संरक्षण तर देतोच, शिवाय कीटकनाशकाचे काम करून अतिरिक्त स्वच्छता, वेळ आणि पैशाची बचत आणि किटकांच्या उपस्थितीत लक्षणीय घट देखील प्रदान करते आणि घरातील वातावरण अधिक शुद्ध आणि स्वच्छ बनवतो. लेमनग्रास, देवदार आणि पाइन तेलासारख्या नैसर्गिक तत्वांचा वापर करून बनवलेले मॅक्सक्लीन २-इन-१ फ्लोअर क्लीनर जंतूंपासून ९९.९% संरक्षण देते तसेच मुंग्या आणि माशा यांच्यासारख्या घरात प्रादुर्भाव करणाऱ्या कीटकांना देखील दूर करते. त्याचा चिकटपणा नसलेला फॉर्म्युला, त्याची सखोल सफाई करणारी ॲक्शन आणि त्यातील टवटवीत लेमनग्रास सुगंध यांच्यामुळे घर केवळ नजरेला स्वच्छ दिसत नाही, तर निर्जंतुक होऊन सुरक्षित होते आणि प्रसन्न सुगंधाने घमघमते देखील!

विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगचे जीएम बिझनेस डेव्हलपमेंट उपासिस साहा म्हणाले, आजच्या उपभोक्त्यांना अशी फ्लोअर क्लीनर्स हवी असतात, जी उत्कृष्ट सुरक्षा प्रदान करतात आणि सहज सोयिस्कर असतात. विप्रो मॅक्सक्लीनमध्ये सखोल फ्लोअर क्लीनिंग आणि कीटक प्रतिबंधकाचे मिश्रण आहे. त्यामुळे एकाच उपायात संपूर्ण देखभाल मिळते. विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंग मध्ये आम्ही आम्ही अशी होम केअर सोल्यूशन्स बनवतो, जी आधुनिक जीवनशैलीस अनुरूप आहेत आणि ज्यांच्यात सुविधा आणि दमदार परिणाम यांचे मिश्रण आहे. मॅक्सक्लीन २-इन-१फ्लोअर क्लीनर अत्यंत प्रभावीपणे फरशी निर्जंतुक करते तसेच कीटकांना दूर ठेवून घर सुरक्षित आणि टवटवीत ठेवते.

## मेकमायट्रिप ट्रेन बुकिंग्जसह प्रवास करताना आता झोमॅटोवर सूचीबद्ध ३०,००० हून अधिक रेस्टॉरंट सहयोगींकडे फूड ऑर्डर करा

**मुंबई, १८ सप्टेंबर :** भारतातील आघाडीची ऑनलाइन ट्रॅव्हल कंपनी मेकमायट्रिपने भारतातील फूड ऑर्डरिंग व डिलिव्हरी प्लॅटफॉर्म झोमॅटोसोबत सहयोग केला आहे. या सहयोगांतर्गत ट्रेन प्रवाशांना प्रत्यक्ष त्यांच्या आसनांपर्यंत फूड डिलिव्हरीची सुविधा देण्यात आली आहे. मेकमायट्रिप ॲपवर ट्रेन तिकीटे बुक करणारे प्रवासी आता १३० हून अधिक स्टेशन्सवर झोमॅटोवर सूचीबद्ध असलेल्या ३०,००० हून अधिक रेस्टॉरंट सहयोगींकडे फूड ऑर्डर करू शकतात.

झोमॅटोसह या सॉफ्ट लॉन्चला सुरुवातीचा प्रतिसाद प्रेरणादायी राहिला आहे आणि प्रवाशांमध्ये फूडचा आस्वाद घेण्याप्रती वाढती पसंती दिसून येते. या गतीला अधिक दृढ करत मेकमायट्रिप त्यांच्या ऑन-ट्रेन फूड डिलिव्हरीबाबत अधिक जागरूकतेचा प्रसार करण्यासाठी लक्षित मोहिमा सुरू करेल.

या विकासाबाबत मत व्यक्त करत मेकमायट्रिपचे मुख्य व्यवसाय अधिकारी (फ्लाइट्स, जीसीसी, कॉर्पोरेट ट्रॅव्हल) आणि मुख्य विपणन अधिकारी राज रिषी सिंग म्हणाले, गेल्या काही वर्षांमध्ये आम्ही ट्रेन बुकिंग क्षेत्रात एकूण उद्योगाच्या तुलनेत झपाट्याने वाढ केली आहे, ज्याचे श्रेय ग्राहक-केंद्रित नाविन्यतांवरील सातत्याच्या फोकसला जाते. आमच्या फूड ऑन ट्रेन मार्केटप्लेसच्या लाँचसह आम्ही प्रवास अनुभव अधिक उत्साहित करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलत आहोत, जेथे प्रवाशांना अधिक निवड व सोयीसुविधा मिळतील. झोमॅटोसोबतचा सहयोग त्या गतीला अधिक दृढ करतो आणि भारतातील गतीशीलता परिसंस्थेत झपाट्याने विकसित होणाऱ्या वापर संधी संपादित करण्यामध्ये धोरणात्मकरित्या योगदान देईल.''

या विकासाबाबत मत व्यक्त करत झोमॅटोच्या उत्पादन विभागाचे उपाध्यक्ष राहुल गुप्ता म्हणाले, आमची सर्व्हिंग इंडिया'प्रती कटिबद्धता आम्हाला आम्ही करणाऱ्या गोष्टींसाठी प्रेरित करते आणि आमच्या ग्राहकांना विनासायास व आनंददायी अनुभव देण्यासाठी आम्ही सतत नवीन मार्गांचा शोध घेतो. मेकमायट्रिपसोबतचा हा सहयोग रेल्वे प्रवाशांना मेकमायट्रिप प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून त्यांच्या आवडत्या रेस्टॉरंट्समधून सोईस्करपणे फूड ऑर्डर करण्याची सुविधा देतो, जेथे थेट त्यांच्या आसनांपर्यंत फूड डिलिव्हरी करण्यात येईल. आम्हाला हा सहयोग ग्राहकांना देणाऱ्या मूल्याबाबत आनंद होत आहे.''

## इक्कविसाव्या शतकातील आयुर्वेद, आधुनिक जीवनशैलीसाठी प्राचीन शहाणपण

**नागपूर, १८ सप्टेंबर :** प्रत्येक वर्षी २३ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय आयुर्वेद दिन' साजरा केला जातो, ज्याचा उद्देश आयुष्याच्या या प्राचीन शास्त्राची ओळख पटवणे आणि त्याचा प्रचार व प्रसार करणे आहे, जे आजच्या आधुनिक युगातही तितकेच महत्त्वाचे आहे.



आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमध्ये तणाव, झोपेचा अभाव, चिंता, वजन वाढ, आणि हार्मोनल अडचणी सामान्य झाल्या आहेत. यामुळे बरेच जण आयुर्वेदाकडे नैसर्गिक आणि संपूर्ण आरोग्यासाठी उपाय शोधत आहेत. आयुर्वेद मन, शरीर आणि आत्मा यांच्या संतुलनावर आधारित आहे. त्यामुळे तो लवकर उठणे, योगा, ध्यान, सात्विक आहार, आणि बदामांसारख्या पोषक गोष्टींचा अवलंब करण्याचा सल्ला देतो. हे सगळे आजच्या वेगवान जीवनात शरीराला ताकद देण्यासाठी खूप उपयुक्त ठरतं. आयुर्वेद तज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन यांच्यामते, हे उपाय आजच्या काळातही खूप फायदेशीर ठरतात आणि म्हणूनच २३ सप्टेंबर रोजी आपण राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करून त्याचे महत्त्व अधोरेखित करतो.

लवकर उठणे : आयुर्वेदानुसार आपली दिनचर्या निसर्गाच्या तीशी सुसंगत असावी, यावर भर दिला जातो. ब्रह्म मुहूर्त (सूर्योदयाच्या सुमारे एक तास आधीचा कालावधी) मध्ये उठल्याने आयुष्य वाढते आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, असे मानले जाते. ही सवय मनःस्वास्थ्य, शिस्त आणि दिवसभरासाठी ताजेपणा निर्माण करण्यास मदत करते.

आहाराचे महत्त्व : आयुर्वेदात अन्नाला औषध मानले जाते. आयुर्वेद ताजी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, डाळी आणि बदाम यासारख्या जीवनशक्तीने समृद्ध असलेल्या (प्राण) पदार्थांच्या सेवनावर भर देतो. याउलट, आधुनिक जीवनशैलीत वाढलेले प्रक्रिया केलेले आणि खाण्यास तयार अन्न आरोग्यासाठी हानिकारक मानले जाते. पौष्टिक, तरीही तयार करण्यास सोपे अन्न नियमितपणे खाणे - जसे की आधीच सोललेली फळे किंवा मूठभर बदाम - शरीराच्या सर्व ऊतींचे पोषण करते आणि मानसिक समाधान देखील देते. विशेषतः रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी खाल्ल्यास, बदाम शरीराला बळकटी देतात, त्वचेचे आरोग्य सुधारतात आणि दोष संतुलित करण्यास मदत करतात.

## सात्विक ग्रीन एनर्जी लिमिटेडची ९०० कोटी रु.ची प्राथमिक समभाग विक्री आजपासून होणार सुरू



**मुंबई, १८ सप्टेंबर :** सात्विक ग्रीन एनर्जी लिमिटेड (कंपनी) ची इक्विटी शेअरसाठी प्राथमिक समभाग विक्री शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी खुली करण्याचा प्रस्ताव आहे.

इक्विटी शेअरच्या ९००० दशलक्ष रु. पर्यंतच्या (९०० कोटी रु.) एकूण ऑफर साईज मध्ये ७००० दशलक्ष रु. पर्यंतचे (७०० कोटी रु.) फ्रेश इश्यू आणि विक्री समभागधारकांकडून २,००० दशलक्ष रु. पर्यंतची (२०० कोटी रु.) ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे.

प्रमुख गुंतवणूकदारांच्या बोलीचा दिनांक गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ आहे. बोली/ऑफर शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी खुली होईल आणि मंगळवार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल.

प्रति इक्विटी शेअरसाठी (इक्विटी शेअर) ४४२ रुपये ते ४६५ रुपये प्रति शेअर्सच्या किंमतपट्टा (कर्मचारी राखीव भागातील बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअरसाठी ४४ रु. ची सवलत मिळणार आहे.) निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ३२ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३२ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

कंपनी इक्विटी शेअरच्या फ्रेश इश्यूमधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा उपयोग कंपनीने घेतलेल्या काही प्रलंबित कर्जाचे पूर्ण किंवा काही प्रमाणात आगाऊ परतफेड/नियोजित परतफेड करण्यासाठी, आमची पूर्णपणे मालकीची उपकंपनी सात्विक सोलर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड मध्ये कर्ज किंवा इक्विटीच्या स्वरूपात गुंतवणूक करून त्या उपकंपनीने घेतलेल्या काही प्रलंबित कर्जाची पूर्ण किंवा आंशिक परतफेड/आगाऊ परतफेड करण्यासाठी, आमची पूर्णपणे मालकीची उपकंपनी सात्विक सोलर इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड मध्ये नॅशनल हायवे १६, चमकहंडी, गोपालपूर इंडस्ट्रियल पार्क, गोपालपूर, गंजम ७६१ ०२०, ओडिशा (प्रोजेक्ट साइट) येथे ४ जीडब्ल्यू सोलर पीव्ही मॉड्यूल उत्पादन सुविधा गुंतवणूकीसाठी आणि उर्वरित रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरणार आहे.

## डालमिया भारत फाउंडेशनतर्फे अंतरगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप



**चंद्रपूर, १८ सप्टेंबर :** शिक्षण आणि ग्रामीण विकासासाठी आपली वचनबद्धता अधोरेखित करत, डालमिया भारत लिमिटेडची कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) शाखा असलेल्या डालमिया भारत फाउंडेशन (डीबीएफ) ने चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपणा ब्लॉकमधील अंतरगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूलमधील ७५ विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप केले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणे आणि त्यांना आत्मविश्वास आणि उत्साहाने शिक्षण सुरू ठेवण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता. या कार्यक्रमाला सखी लेडीज क्लबच्या अध्यक्षा श्रीमती बेबीलता नायक आणि क्लबचे सदस्य, एचआर प्रमुख श्री. अरविंद बरुआ, मुख्याध्यापिका श्रीमती ललिता उपरकर, सरपंच श्रीमती नीता वाघमारे आणि उपसरपंच श्री. अंकित वडस्कर यांच्यासह अनेक मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करताना डालमिया भारत फाउंडेशनचे सीईओ श्री. अशोक गुप्ता म्हणाले, प्रत्येक मुलाला शिकण्याची, प्रगती करण्याची आणि स्वतःची पूर्ण क्षमता ओळखण्याची संधी मिळाली पाहिजे. अशा उपक्रमांद्वारे डालमिया भारत विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणासाठी लागणाऱ्या वस्तूच नाही, तर मार्गदर्शन आणि प्रोत्साहनही देण्याचा प्रयत्न करत आहे, जेणेकरून ते उत्साहाने शिक्षण घेऊ शकतील. यामुळे त्यांचा वैयक्तिक विकास होईल आणि त्यांच्या समुदायांच्या सर्वांगीण विकासातही हातभार लागेल. अशा उपक्रमांद्वारे, डीबीएफ शिक्षण आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपली बांधिलकी आणखी मजबूत करत आहे. मुलांना शिकण्यासाठी आवश्यक साधने, मदत आणि प्रोत्साहन देऊन फाऊंडेशन त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यास मदत करत आहे. अशा प्रकारे, या लहान मुलांच्या भविष्यात गुंतवणूक करून, फाउंडेशन सक्षम आणि स्वावलंबी समुदाय तयार करण्याचे ध्येय ठेवते, जे शाश्वतपणे प्रगती करतील आणि स्थानिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतील.

## कृषी-एआय स्टार्टअप सुइंड बंबलबी ड्रोन शेतकऱ्यांचा खर्च ५०% पर्यंत कमी करते

**सावदा, (महाराष्ट्र) :** अन्नसुरक्षेची वाढती चिंता लक्षात घेऊन सुइंड या कृषी-एआय स्टार्टअपने एक अत्याधुनिक ड्रोन बंबलबी तयार केला आहे. स्वित्झर्लंडमध्ये डिझाईन आणि भारतात तयार केलेला हा ड्रोन महाराष्ट्रातील ऊसशेती व केरळमधील रबर शेतीसाठी उपयुक्त ठरत असून, उत्पादन वाढवताना शेतकऱ्यांचा खर्च ५०% पर्यंत कमी करत आहे.

सुइंड प्रगत बंबलबी ड्रोनची अचूक नॅनो पार्टिकल फवारणी तंत्रज्ञानामुळे उंच ऊस शेतीसह डोंगराळ भागातील प्रत्येक पिकावर सहज पोहोचता येते. हा ड्रोन अडथळे टाळतो, कठीण भूभागावर सहज उडतो, रासायनिक वाया जाणे कमी करतो आणि मोठ्या शेतकऱ्यांचा मजुरी खर्च वाचवतो. त्यामुळे पीक अधिक निरोगी व सुपीक होते. २३.६३ किलो कमाल वजन घेऊन उड्डाण करण्याची क्षमता असलेला हा ड्रोन उच्च कार्यक्षमतेसाठी डिझाईन केला आहे. झटपट बॅटरी व टाकी बदलून हा ड्रोन एका दिवसात ३०-३० एकरांवर सलग फवारणी करू शकतो.

सुइंड बंबलबी ड्रोनमुळे उत्पादनात ३०-३०% वाढ झाली आहे, असे बारामतीचे शेतकरी रणजित गायकवाड यांनी सांगितले. माजी सरपंच विद्याधर काटे यांनीही अनुभव शेअर करताना सांगितले, रसायन संपल्यावर बंबलबी



ड्रोन आपोआप परततो. टीम सेकंदात टाकी आणि बॅटरी बदलते व ड्रोन अगदी जिथे थांबला होता तिथूनच फवारणी पुन्हा सुरू करतो. हे मी स्वतः पाहिले आहे.

ऊस शेतीत जिथे हा ड्रोन वापरला गेला, तिथे उत्पादन ३०-३५ टनांवरून काही ठिकाणी जवळपास १०० टनांपर्यंत गेले आहे. अचूक फवारणीमुळे उसाची एकसंधता वाढली असून, शेतकऱ्यांना प्रति एकर २०-२५ क्विंटल अतिरिक्त उत्पादन मिळाले आहे. यामुळे कीडनाशक व खताचा वापर ३०-३५% नी कमी झाला असून, एकूण खर्चही साधारण ३५% नी घटला आहे.

रबर शेतीतही बंबलबी उंच झाडांच्या कॅनोपीखालील भागात संपूर्ण फवारणी साधली आहे. पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत जमिनीवर रसायन वाया जाणे ३३% नी कमी झाले आहे.

जळगावसारख्या भागातील केळीच्या शेतीत या ड्रोनने मोठी समस्या सोडवली आहे. मोठ्या पानांच्या खालच्या बाजूस लपलेल्या कीटक व रोगांवर पारंपरिक फवारणी पोहोचत नसे. शेतकऱ्यांना ३०-३५ किलो वजनाची पाठीवरील पंप फवारणी साधने घेऊन ओलसर शेतातून चालावे लागत होते, ज्यामुळे आरोग्यावरही परिणाम होत असे. परंतु बंबलबी ड्रोन पिकांच्या रांगेवर अचूक उडून सूक्ष्म थेंब थेट पोहोचवतो. त्यामुळे धोका व अकार्यक्षमता संपुष्टात येते. क्षेत्रीय चाचण्यांमध्ये पानांचे आरोग्य सुधारले, रोगराई कमी झाली, रसायनांचा वापर ३५% नी कमी झाला आणि मजुरीचा खर्च ७०-८०% पर्यंत वाचला.

सेवा वापरून पाहण्यासाठी कॉल करा : ८७८८७२३८६२

## शब्दकोडे क्रमांक २२२१



**आडवे शब्द :-**
१) मधुन मधुन तुटलेला
४) तसराळे
८) गाढव
१०) पातळ खांब
१२) जीवनावश्यक
१४) कमीज बरोबरचे वस्त्र
१७) एक उभयचर प्राणी
१९) बारीक तांदूळ
२०) धष्टपुष्ट मेंढा
२२) वाळा
२३) हात
२५) मेहेरबानी
२६) मंत्रीमंडळ
२८) श्वशुर
३१) गुणाकार
३२) आश्चर्याची गोष्ट
३३) उद्देशावाचून
३५) अवस्था
३६) कशा प्रकारचा
३८) पलंग
४०) जाणे, प्रस्थान करणे
४२) छाती
४३) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
४४) पार ओटा
४५) दाढीवा प्राणी
४६) मनाचा ओढा
४७) प्रजा
४९) ओलसर हवा
५१) समुद्राच्या लाटांचा आवाज
५३) ढाक्याचे तलम कापड
५५) गाय
५६) हार, सर
५८) नीच, दुष्ट
६० ) बारा महिने
६२) हलणारी (संपत्ती)
६४) मोठी जाड सुई
६५) ध्वनी
६७) जमलेले सैन्य, एक शहर
६९) मोठी टोपली
७०) वर्ष, साल
७१) दौतीतील द्रव
७२) शंकर
७३) दिल्लीचे विमानतळ
७४) आजच्या आधीचा दिवस
७५) छोटे कुबड
७७) कंटाळवाणी बडबड
७८) तपस्या
७९) एक रंग
८०) परभारे

**उभे शब्द :-**
१) एक पवित्र वनस्पती
२) कट्टर ठाम मताचा
३) केव्हा
५) कमळ
६) तुझा (क.)
७) जमीन चोपण्याचे लाकूड प्राण
८) संतापी
९) उपवासाचे तांदूळ
११) गाळसाळ
१३) चाकर
१५) गडबडगुंडा
१६) रुक्ष
१८) युद्ध
२१) नदीचे वाढलेले प्रचंड पाणी
२३) लाकूड कापण्याचे हत्यार
२४) बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२५) वापर
२६) बेचव, पचपचीत
२७) कर्णेंद्रिय
२८) शिर्डीचे संत
२९) द्रवपदार्थ
३०) पराग
३४) विरोध
३५) छोटी युद्धनौका
३७) सावली
३९) प्रचंड, मोठा
४१) सोटा
४३) लेखणी
४६) लेखणी वगैरे ठेवण्याची लहानशी डबी
४८) कुबेराचा सेवक
४९) एक श्वासरोग
५०) मळलेला
५२) लोक
५३) पुष्परस
५४) लोणचे
५७) नृत्य
५९) मुंबईचा घरगडी
६१) लग्न
६३) छोटासा
६६) करारातील दोन जोडशब्द
६७) वाळवी
६८) ललाट
७०) मनाला टोचणारे दुःख
७४) अक्षरापुढची उभी रेघ
७५) बैलाचा सण
७६) घाव, प्रहार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## अन्विताचा विश्वास ठाम राहणार का?

**मुंबई, १८ सप्टेंबर :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि तिच्या लहान भावंडांचा प्रवास चित्रित केला आहे. जीवनातील संघर्षाला ते सर्व जण मिळून, हिंमतीने आणि आशेने तोंड देत आहेत. त्यांच्या वडिलांनी म्हणजे सुहास (वरुण बडोला)ने समस्त कुटुंबाला कर्जात बुडवले आहे आणि आपल्या वडीलकीच्या जबाबदारीतून अंग काढून घेतले आहे. अन्वितावर लहान वयातच कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, सुहासच्या कृत्यामुळे कुटुंब धोक्यात येते. गुंडांपासून सुटका करून घेण्यासाठी या भावंडांना आपल्या वडीलांचा स्वर्गवास झाल्याचे नाटक करावे लागते. हा खटाटोप करताना त्यांची दमछाक होते. अन्विताचा भाऊ बंड्या (अथर्व पाध्ये) कुटुंबाला मदत करण्याच्या हेतूने कोणालाही न सांगता एक काम स्वीकारतो. या सगळ्या संघर्षात अन्विताचे विराट (रजत वर्मा)शी वाढते जवळकीचे संबंध हे तिच्यासाठी सुखाचे आश्वासन आहे. पण विराटचे देखील एक गुपित आहे, जे उघड झाले तर सारे काही पार बदलून जाऊ शकते.

आगामी भागांमध्ये, विराटची अन्विता आणि तिच्या भावंडांशी जवळीक वाढताना दिसेल. पण अन्विताच्या धाकट्या बहिणीला, चिडियाला (आयेशा विंधारा) जेव्हा विराटच्या फोनमध्ये उर्वशी हे नाव दिसते, तेव्हा तिच्या मनात संशयाची पाल चुकचुकते. सत्य शोधण्याच्या निर्धाराने ती त्याचा पाठलाग करत करत बांद्रा गाठते. इथे तिला एक धक्कादायक गोष्ट समजते. विराटचे खरे नाव रोहित असल्याचे आणि उर्वशी परीख म्हणजे त्याच्या आईशी असलेले त्याचे नाते तिला समजते. पण हे सत्य अन्विताला समजण्यापूर्वी अन्विता चिडिया आणि विराट यांचे संभाषण ऐकते. या प्रसंगानंतर तिचा विराटवरील विश्वास कोसळून पडेल का? की विराट आपले सत्य आणखी काही काळ लपवून ठेवू शकेल?

## आज का अंदाज

शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १२० | १६७ | ११३ | २५० | ३९० | २५७ | ७०० | ३५० |
| ३०० | ३५६ | २६७ | ३६८ | २४६ | ३३८ | २५० | ५५८ |
| २२१ | २२० | ३६६ | १३३ | १४७ | ४०० | ८९० | ४६८ |
| ३१ | ४१ | ५६ | ७६ | २९ | ४९ | ७३ | ८३ |
| ३९ | ४९ | ५० | ७० | २० | ४० | ७५ | ८६ |
| ३८ | ४८ | ५२ | ७२ | २१ | ४१ | ७६ | ८५ |

**१९ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २० | ५० | ८१ | ९१ |
| २६ | ५६ | ८३ | ९३ |
| २७ | ५७ | ८४ | ९४ |
| ४८० | १६८ | १८९ | २३४ |
| २२८ | ३४८ | ३७८ | ३६० |
| १५६ | ७८० | २२४ | ४५० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ २ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज नियोजित कामात अडथळा येऊ शकतो. तुमच्या बुद्धीचा आणि विवेकाचा वापर करा. कामाच्या ठिकाणी वाद होऊ शकतो. राग आणि अहंकारावर नियंत्रण ठेवा. प्रवासात मौल्यवान वस्तूंकडे लक्ष ठेवा.

**वृषभ :** नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार मनात येईल. साहित्य, संगीत, गायनात रस वाढेल. बचत वाढेल. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. पैसे हुशारीने खर्च करा.

**मिथुन :** नोकरीत पगार आणि व्यवसायात उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. जमिनीशी संबंधित कामांशी संबंधित लोकांना अचानक आर्थिक फायदा होऊ शकतो. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम केल्यास अनुकूल परिणाम मिळतील. नकारात्मक विचार मनात येऊ देऊ नका. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कोणाशीही कठोर शब्द बोलू नका.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी तुमचे बौद्धिक कौशल्य सर्वांना आश्चर्यचकित करेल. तुमच्या कनिष्ठ व्यक्तीशी जवळीक वाढेल. व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील. तुमच्या महत्त्वाकांक्षा नियंत्रणात ठेवा.

**कन्या :** तुमच्या मनाप्रमाणे आर्थिक लाभ मिळाल्याने तुमचे मन आनंदी राहील. कला आणि अभिनयाशी संबंधित लोकांना मोठा सन्मान मिळू शकतो. व्यवसायात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल.

**तुळ :** आज अनावश्यक धावपळ होईल. राजकारणातील विरोधक तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करू शकतात. वाहनाची समस्या असू शकते. चिंतेमुळे झोपेचा त्रास होईल.

**वृश्चिक :** कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी नवीन व्यक्तीवर देऊ नका. प्रवास करताना काळजीपूर्वक आणि हळू गाडी चालवा. दारू पिऊन गाडी चालवू नका. कोर्ट केसेसमध्ये सावधगिरी बाळगा.

**धनु :** महत्त्वाच्या बाबींमध्ये काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. विरोधक तुमच्या प्रगतीचा हेवा करतील. कामाच्या ठिकाणी समन्वय राखण्याची गरज भासेल.

**मकर :** नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामासाठी घराबाहेर जावे लागू शकते. नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी दिवस चांगला आहे.

**कुंभ :** आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होतील. उत्पन्नासोबतच खर्चही वाढतील. प्रेमसंबंध अनिर्णीत राहतील. तणाव टाळण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये समान सुसंवाद राहील.

**मीन :** जे काम पूर्ण होण्याची अपेक्षा नव्हती ते पूर्ण होईल. बुद्धिमत्ता आणि विवेकबुद्धीमुळे व्यवसायात आर्थिक लाभ होईल. लेखन आणि पत्रकारिता क्षेत्राशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल.

# नव्या प्रवर्गाचा समावेश नको ओबीसी बांधवांचा मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. १८ :



हैद्राबाद व सातारा गॅझेटीयनच्या आधारे शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजाचे आरक्षण धोक्यात आले आहे. आरक्षणातील जागांवर सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि संपन्न समाजाचा समावेश झाल्यास मूळ ओबीसींना मोठा फटका बसेल. मूळ ओबीसींना २७ टक्के राजकीय आणि १९ टक्के शैक्षणिक व इतर क्षेत्रातील आरक्षण मिळाले आहे. हे आरक्षण त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय मागासलेपणामुळे देण्यात आले आहे. त्यात कुठल्याही नव्या जाती अथवा प्रवर्गाचा समावेश होऊ नये, मूळ ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत शेकडो ओबीसी बांधव बुधवार दि. १७ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकले. अधिकाऱ्यांमार्फत विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आले. महाराष्ट्रात तत्काळ जातीनिहाय जनगणना करून ओबीसींची खरी संख्या निश्चित करून त्याचा डेटा जाहीर करण्यात यावा. तामिळनाडूच्या धर्तीवर आरक्षणाची मर्यादा ७५ टक्के पर्यंत वाढवून लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची अंमलबजावणी करावी. ओबीसींना लोकसभा व विधानसभा मतदारसंघात लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे. मंडल आयोगाची काटेकोर अंमलबजावणी करून ओबीसींना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय न्याय द्यावा. अर्थसंकल्पात ओबीसींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करून ती वेळेवर खर्च करावी. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी महाज्योती निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती, मोफत शैक्षणिक साहित्य आणि तालुका स्तरावर उच्च प्रतीची शासकीय वसतिगृहे उभारण्यात यावीत. ओबीसी कर्मचाऱ्यांना वेळेवर पदोन्नती मिळावी. ओबीसी समाजातील असंतोष स्पष्ट झाला असून, शासनाने तत्काळ सकारात्मक भूमिका घेतली नाही तर आगामी काळात तीव्र संघर्ष उभारण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी उमरखेड तालुक्यातील शेकडोच्या संख्येने सकल ओबीसी महिला व पुरुष बांधव उपस्थित होते. २०२४-९ मध्ये निर्गमित नव्या जात प्रमाणपत्रांची सेवा निवृत्त न्यायाधीशांच्या समितीमार्फत चौकशी करून खोटी प्रमाणपत्रे रद्द करावीत व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. मूळ ओबीसींच्या आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्या किंवा अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांना २५ लाखांची मदत व एक शासकीय नोकरी देऊन पुनर्वसन करावे, या सर्व मागण्या तातडीने मान्य करून अन्याय होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप करावा, अशी मूळ ओबीसी समाजाची एकमुखी मागणी आहे.

# महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्या बैठकीमध्ये विचारमंथन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १८ :



महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाने तयारीला गती दिली आहे. अमरावती विधानसभा आणि बडनेरा विधानसभा प्रभारी डॉ. झिशान हुसैन यांच्या उपस्थितीत शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत काँग्रेस पक्षाला महापालिका निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी रणनीती आखण्यात आली. या बैठकीला खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भय्या पवार, प्रदेश महासचिव किशोर बोरकर, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, स्थायी समितीचे माजी सभापती बाळासाहेब भुयार, प्रदेश सचिव नजीर खान, महिला काँग्रेस अध्यक्ष जयश्री वानखडे, अल्पसंख्याक सेल अध्यक्ष अब्दुल रफीक, नसीम खान, युवक काँग्रेस प्रदेश महासचिव फिरोज शाह, अमरावती युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. अमरावती विधानसभा आणि बडनेरा विधानसभा अंतर्गत प्रत्येक प्रभागात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांची प्रभाग निहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. या निरीक्षकांना प्रभाग स्तरावर पक्ष कार्यकर्त्यांसह समन्वय साधून स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, पक्षाच्या ध्येय धोरणांचा प्रचार करणे आणि निवडणूक प्रचाराची रणनीती आखण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या बैठकीत शहरातील नागरिकांचा काँग्रेस पक्षात मोठ्या संख्येने प्रवेश झाला. यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून अमरावती महानगरपालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्याचा संकल्प घेतला. बैठकीत उपस्थित प्रमुख नेत्यांनी महानगरपालिकेत काँग्रेस पक्षाची सत्ता स्थापन करण्यासाठी उपस्थित कार्यकर्त्यांना गुरुमंत्र दिला. अमरावती विधानसभा आणि बडनेरा विधानसभा प्रभारी डॉ. झिशान हुसैन यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष हा सामान्य माणसाचा पक्ष आहे. स्थानिक नागरिकांच्या हितासाठी आणि अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहोत. येणाऱ्या निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्याने प्रभाग स्तरावर सक्रिय सहभाग घेऊन पक्षाला बळ मिळवून द्यावे. यावेळी व्यासपीठावर उपस्थितांनी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देताना एकजुटीने आणि नियोजनबद्ध रीतीने निवडणुकीची तयारी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन सलीम मिरावाले आणि आभार बिनोद मोदी यांनी मानले. बैठकीला वंदना कंगाले, सुजाता झाडे, देवयानी कुर्वे, वंदना थोरात, अनिला काझी, अर्पणा मकेश्वर, प्रदीप हिवसे, भैय्यासाहेब निचळ, विजय बर्वे, अब्दुल रऊफ, सतीश मेटांगे, प्रकाश वानखडे, पंकज मेश्राम, संजय शिरभाते, माणिक लोखंडे, सुरेश कनोजिया, प्रशांत महल्ले, सौरभ तायडे, विजय राठोड, मनोज भेले, अमर भेरडे, विजय वानखडे, जुबेर भाई, प्रा. अनिल देशमुख आदी उपस्थित होते.

# दर्यापूर तालुक्यात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
दर्यापूर, दि. १८ :



मुंबई येथील नितीन दळवी यांच्या सहयोगातून व गाडगे महाराज आदिवासी आश्रम शाळा श्री क्षेत्र नागरवाडीचे प्रमुख बापूसाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून दर्यापूर तालुक्यातील विविध गावातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून दिवशी करण्यात आले. सर्वप्रथम सुरवातीला सकाळी कान्होली येथील शाळेत शालेय साहित्य वाटपाचा शुभारंभ गाडगे महाराज मिशनचे बापूसाहेब देशमुख यांच्या हस्ते तर गजानन देशमुख, ढोरे, सागर देशमुख आदींच्या प्रमुख उपस्थितीत केला. या वेळी शंभर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य त्यामध्ये नोटबुक, ड्रॉइंग बुक, पाच पेन, पेन्सिल, खोडरबर, बिस्किट पुडा, चॉकलेट वितरीत केले. विशेषतः खिचडी शिजवण्याच्या महिलेचा सन्मान म्हणून तिला साडीचोळी देण्यात आली. दरम्यान दुपारी थीलोरी येथील स्वर्गीय झामाजी वाकपांजर विद्यालयातील मुलांना वाटप करून त्याच ठिकाणी संस्थेतर्फे भोजन दिले. गायवाडी, पनोरा, रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथील शिक्षक मुख्याध्यापक शिक्षिका कर्मचारी यांच्यावतीने बापूसाहेब देशमुखांचा सत्कार गाडगे महाराज मिशनच्या सर्व लोकांचा सत्कार मुख्याध्यापक हेमंत रेखे यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. याप्रसंगी श्री क्षेत्र नागरवाडीचे शिक्षक अतुल रेडे यांनी पंजाबराव देशमुख व गाडगे महाराजांचं अतूट नातं असलेले गीत सादर केले. त्यानंतर श्री संत गाडगे महाराज बालगृह बनोसा येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा समारोपीय कार्यक्रम झाला. संत गाडगेबाबांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकाना गाडगेबाबांची आकर्षक व सुंदर अशी मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. दर्यापूर तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. मुंबईतील नितीन दळवी यांचे सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले.

# आधुनिक शेतीतून एकरी ५० क्विंटल कापूस उत्पन्न शक्य

■ महासागर प्रतिनिधी, मारेगाव, दि. १८ :



शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करून आणि योग्य नियोजन आखून उत्पादन खर्च कमी केला तर एकरी ४० ते ५० क्विंटल कापूस उत्पादन घेणे शक्य आहे, असा विश्वास अमृत पॅटर्नचे जनक अमृतराव देशमुख यांनी व्यक्त केला. खर्चावर नियंत्रण ठेवत वैज्ञानिक आणि सुयोग्य पद्धतीने शेती केली तर उत्पादनात वाढ होऊन चांगला नफा मिळू शकतो, असे मार्गदर्शन त्यांनी शेतकऱ्यांना केले. स्थानिक शेतकरी सुविधा केंद्रात शेतकरी उत्पादक कंपनीच्या चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. विठ्ठल मालेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत दिनेश देशमुख, मंडळ कृषी अधिकारी डोंगरकर, कृषी अधिकारी बाघमारे, फलटणकर, अमित गाडबैल, इंदू कोल्हेकर यांच्यासह अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित होते. पुढे बोलताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी खर्च कमी करण्याचे, उत्पादन वाढवण्याचे आणि बाजारपेठेतील संधींचा फायदा घेण्याचे उपाय स्पष्ट केले. तसेच शासनाच्या विविध योजना, अनुदान आणि तांत्रिक मदतीबाबत माहिती व सहाय्य उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला. जेणेकरून शेतकरी अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर बनतील. ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि शेती व्यवसायाला नवी दिशा मिळावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे. अमृतराव देशमुख आणि दिनेश देशमुख यांनी कापूस लागवड, रब्बी हंगामातील गहू व चणा लागवड याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी खर्च कमी करून अधिक उत्पादन घेण्याचा 'गुरुमंत्र' शेतकऱ्यांना दिला आणि "अशक्य काही नाही" हे प्रत्यक्ष उदाहरणासह दाखवून दिले.

विकास गंगा संस्था सचिव अमित गाडतील आणि योगेश यांनी कंपनीचे महत्त्व पटवून दिले व प्रगती अहवालवाचन करून पुढील दिशा स्पष्ट केली. आभार डिमन टोंगे आणि इंदू कोल्हेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी शशिकांत ताबाडे, वैभव मेश्राम, सपना अवताडे, छकुली अवताडे, सुमंत ठाकरे, दिनेश आवारी, गणेश पांगुळ, चंद्रप्रकाश बोढे, माया वनकर, शामल राऊत यांनी पुढाकार घेतला.

# युवा महोत्सव प्रवेश अर्ज व योजनांची आवेदनपत्र भरण्यास २४ सप्टें.पर्यंत मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १८ :




संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवासाठी प्रवेश अर्ज तसेच विविध योजनांची आवेदनपत्रे भरण्यास कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मुदतवाढ दिली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत आपले आवेदनपत्रे विद्यार्थी विकास विभागाकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरीता आवेदनपत्रे तसेच संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, शुध्द पेयजल योजना, आणि संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनांची आवेदनपत्रे सादर करण्यास यापूर्वी ११ सप्टेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु काही महाविद्यालयांच्या मागणीनुसार सदर योजनांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून, ती आता २४ सप्टेंबर, २०२५ पर्यंत करण्यात आली आहे.

यासंदर्भात विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, अधिकारी, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, विभागाचे प्रशासकीय केंद्र यांना पत्राव्दारे कळिवण्यात आले असून, सर्वसंबंधितांनी याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. अधिक माहितीकरिता विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांचेशी ८८५५०८३९६४ यावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळिवण्यात येत आहे.

## जिल्हा स्पर्धेतील पदक विजेत्या युवा नेमबाजांची




**बुलडाणा :** बुलडाणा जिल्हास्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनाय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलडाणा व जिल्हा क्रीडा परिषद बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने व हालेलुया शूटिंग रेंज यांच्या तांत्रिक सहकार्याने पार पडल्या. या स्पर्धा बुलडाणा येथे ११ ते १३ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आल्या होत्या. शूटिंग कोच संजीव अरविंद यंगड यांनी व सहकारी कोच प्रज्ञा लहाने यांनी पंच म्हणून काम पाहिले. १३ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता बक्षीस वितरण समारंभ लगेच पार पडला. आंतरराष्ट्रीय पदक विजेता मिहिर नितीन अपार यांना बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी गुळवे , काचवाल , भारत चीरखे , कोल्हे आदी मान्यवर व क्रीडा शिक्षक तसेच पालक उपस्थित होते. या सर्व विद्यार्थ्यांनी प्रावीण्य प्राप्त करून विभागीय स्तरावर मुसंडी मारलेली आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाने यावर्षी सर्वांना पदक देऊन सन्मानित केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी महानगर व क्रीडा अधिकारी संदीप केळे यांचे विशेष आभार बक्षीस वितरण समारंभात कोच संजीव यंगड यांनी मानले. हालेलुया इंग्लिश स्कूल चिखली यांची प्राचार्य मोनालिसा संजीव यंगड यांनी शाळेची शूटिंग रेंज उपलब्ध करून दिली जिल्हा स्पर्धेसाठी त्यांचे विशेष आभार क्रीडा अधिकारी संदीप केळे यांनी मानले. सर्व विजेते पुढील शालेय स्पर्धेची तयारी संजीव यंगड यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# वुमेन्स स्टडीज सेंटर येथे जेंडर, मीडिया अँड कल्चर यावर विद्यार्थ्यांशी चर्चा व संवाद संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १८ :



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर येथे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांनी भेट दिली. या दरम्यान जेंडर, मीडिया अँड कल्चर यांतील आंतरसंबंधावर विद्यार्थ्यांशी चर्चा व संवाद साधण्यात आला. यावेळी वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, सेंटरमधील डॉ. भगवान फाळके, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील ग्रंथपाल डॉ. महेंद्र मेटे, यांसह महाविद्यालयातील जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमाचे प्रा. मनीष भंकाळे आणि प्रा. रुपेश फसाटे उपस्थित होते. सुरुवातीला प्रा. मनीष भंकाळे यांनी महाविद्यालय, अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांचा परिचय उपस्थितांना करून दिला. तसेच विद्यार्थ्यांच्या भेटीचे प्रयोजन स्पष्ट केले. वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे यांनी प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप आणि स्त्रियांच्या प्रश्नांचे वार्तांकन यावर विचार मांडले. तसेच मागील पंधरा वर्षातील वुमेन्स स्टडीज सेंटरमधील महत्त्वपूर्ण कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देखील दिली. सेंटर अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज या अभ्यासक्रमातील एक पेपर 'जेंडर, मीडिया अँड कल्चर' हा असून त्यातील घटकांची माहिती त्यांनी यावेळी दिली. तर डॉ. भगवान फाळके यांनी सेंटरची पार्श्वभूमी, प्रगती आणि महत्त्वपूर्णता याविषयी माहिती दिली. डॉ. महेंद्र मेटे यांनी क्षेत्र भेटीची आवश्यकता स्पष्ट करून वुमेन्स स्टडीज सेंटरला दिलेल्या भेटीची मौलिकता आपल्या मांडणीतून व्यक्त केली. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तरे, चर्चा व संवाद संपन्न झाला. समाजातील लैंगिक असमानता नष्ट करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. आजवर विविध वृत्तपत्रे, नियतकालिके आणि वाहिन्यांवरून स्त्रियांच्या समस्यांवर बातम्या, मुलाखती, विविध कार्यक्रम प्रसारित/प्रकाशित करून माध्यमांनी महिला सक्षमीकरण व लिंगभाव संवेदनशीलता विकासात योगदान मौलिक दिले आहे. चित्रपट व मालिकांमधून स्त्रियांचे होणारे चित्रण संमिश्र असले तरी त्यांतील काहींनी स्त्रियांच्या प्रश्नांना आवश्यकता यथार्थपणे अभिव्यक्त केले आहे. जेंडर, मिडिया आणि कल्चर हे एकमेकांवर प्रभाव टाकणारे घटक असून त्यातील आंतरसंबंधाचा अभ्यास लिंगभाव दृष्टीकोनातून अधिक होण्याची आवश्यकता आहे, अशी विविध मते या संवादातून व्यक्त झाली. या दरम्यान सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे प्रा. रुपेश फसाटे यांनी केले.

## भारतीय बौद्ध महासभा, वंचितचा मोर्चा

**बुलडाणा :** गया येथील महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, महु येथील जन्मभुमी स्मारक व नागपूर येथील दिक्षा भुमी भारतीय बौध्द महासभेच्या ताब्यात देण्यात यावी, या मागणीसाठी भारतीय बौध्द महासभा व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

शहरातील जयस्तंभ चौकातून दुपारी एक वाजेच्या सुमारास मोर्चाला सुरुवात करण्यात आली. या मोर्चात जिल्हाभरातील शेकडो समाज बांधव सहभागी झाले होते.

हा मोर्चा जिल्हा परिषद, स्टेट बँक चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. त्यानंतर शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये तथागत भगवान बुद्धाला गया येथे ज्ञान प्राप्ती झाली. त्यामुळे जगभरातील बौध्द बांधवाचे हे श्रद्धास्थान आहे. दररोज हजारो समाज बांधव गया येथे दर्शनासाठी जातात.

### कोर्ट विद्यमान तहसीलदार, नरखेड यांचे कार्यालय

रा.मा.क्र. ११७/एम.आर.सी.८१/२०२५-२६
तहसीलदार नरखेड यांचे कार्यालय,
ता. नरखेड, जि. नागपूर

**जाहीरनामा**

(दिनांक १५/०९/२०२५)

याद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार राजेश महादेवराव दळवी रा. उमरी शिंदी ता. नरखेड, जि. नागपूर यांनी त्यांच्या मुलाचा जन्म मौजा उमरी शिंदी तह. नरखेड, जि. नागपूर येथे दिनांक २०/०९/२०११ रोजी झाला असून कु. कार्तिक राजेश दळवी ह्या नावाने जन्माची नोंद ग्राम पंचायत उमरी शिंदी तह. नरखेड, जि. नागपूर येथे घेण्यात आली आहे. करीता अर्जदाराने जन्माची नोंद होण्याबाबत आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

तरी नमूद व्यक्तीचा जन्माच्या नोंदणीबाबत ज्यांना आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक ३०/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावे.

उपरोक्त तारखेपूर्वी कोणाच्याही कोणताही आक्षेप उजर प्राप्त झाला नाही तर सदर जन्मनोंद आदेश मंजूर करून निबंधक जन्म व मृत्यु ग्राम पंचायत, उमरी शिंदी तह. नरखेड, जि. नागपूर यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जाहीरनामा आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझे सही व या कार्यालयाचे शिक्यानिशी प्रसिद्ध करण्यात आला-

तहसीलदार, नरखेड

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११८४

क्र.न.प.अ./जन्म/(शहर)/कावि-९८७/२०२५ दिनांक ०८/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उ.प. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अब्दुल रफीक अब्दुल करीम, रा. प्लॉट नं. १८५०, यशोधरा नगर, पिली नदी, नागपूर यांचा अर्ज दिनांक २१/०७/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल रफीक अब्दुल करीम, रा. प्लॉट नं. १८५०, यशोधरा नगर, पिली नदी, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अब्दुल रफीक अब्दुल करीम यांच्या जन्म दिनांक ०१/०७/१९६२ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११८४

क्र.न.प.अ./जन्म/(शहर)/कावि-१५६/२०२५ दिनांक १७/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उ.प. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अंसारी ताहेरा बेगम मोहम्मद मुख्तार, रा. १८५०, यशोधरा नगर, नागपूर यांच्या अर्ज दिनांक १७/०३/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अंसारी तोहरा बेगम मोहम्मद मुख्तार, रा. यशोधरा नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अंसारी तोहरा बेगम मोहम्मद मुख्तार यांच्या जन्म दिनांक ०१/०७/१९६४ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११८४

क्र.न.प.अ./जन्म/(शहर)/कावि-१३७/२०२५ दिनांक १७/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उ.प. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. सलीम जमाल खान, मावर हाऊस, ३६, अयोध्या नगर, गौसिया कॉलोनी, नागपूर यांचा अर्ज दिनांक २१/०७/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार सलीम जमाल खान, रा. गौसिया कॉलोनी, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू सलीम जमाल खान यांच्या जन्म दिनांक ०१/०६/१९६४ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११८४

क्र.न.प.अ./जन्म/(शहर)/कावि-१३८/२०२५ दिनांक १७/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उ.प. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. जरीना बेगम अब्दुल करीम, रा. यशोधरा नगर, नागपूर यांच्या अर्ज दिनांक २१/०७/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार जरीना बेगम अब्दुल करीम, रा. यशोधरा नगर, नागपूर यांनी त्यांच्या मुलाचा जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू जरीना बेगम अब्दुल करीम यांच्या जन्म दिनांक ०४/०७/१९६७ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड- ४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११८४

क्र./जन्म/(शहर)/कावि-१४/२०२५ दिनांक ११/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उ.प. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. श्री. मुकेश कुमार त्रिपाठी, रा. सुरेन्द्रगढ बजरंग चौक, नागपूर यांचा अर्ज दिनांक २९/०८/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री. मुकेश कुमार त्रिपाठी, रा. सुरेन्द्रगढ बजरंग चौक, नागपूर यांनी मुलीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू पुजा मुकेशकुमार त्रिपाठी यांचा जन्म दिनांक २५/११/२०१० रोजी सुरेन्द्रगढ बजरंग चौक, नागपूर राहत्या घरी येथे झाला, असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

### Change Of Name

MY OLD NAME WAS **SHAIKH RIZWANA KAUSAR**. NOW MY NEW NAME IS **RIZWANA KAUSAR SHEIKH ASLAM.**
**ADD :** BADA TAJBAGH NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **MAHENDRA KR THEPEY**. NOW MY NEW NAME IS **MAHENDRA KUMAR THEPEY.**
**ADD :** WARD NO. 12, RAILWAY COLONY, AMLA, BETUL, 460551, MP

MY OLD NAME WAS **SHRADDHA MIKESH CHANDARANA**. NOW MY NEW NAME IS **SHRADHA MIKESH CHANDARANA.**
**ADD :** FLAT NO 603, D-WING PRITAM COMPLEX, OLD BHANDARA ROAD, NEAR MATA MANDIR, LAKADGANJ, NAGPUR 440008, MAHARASHTRA

MY OLD NAME WAS **GAYASUDDIN ANSARI**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD GAYASUDDIN ANSARI.**
**ADD :** P.NO. 42, RAMBHUMI SOCIETY, GALLI NO.13/7, NEAR PARDI POLICE STATION, PARDI, NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **MUMTAJ ANSARI**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD MUMTAJ ANSARI.**
**ADD :** P.NO.42, RAMBHUMI SOCIETY, GALLI NO.13/7, PARDI POLICE CHOWKI, NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **SOHEB AKTAR SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **SHOEB AKHTER SHEIKH SULTAN SHEIKH.**
**ADD :** CHANDRA SHEKHAR AZAD CHOWK,BEHIND AL ZAM ZAM HOTEL,ITWARI, NAGPUR-440002

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

## घरीच बनवा नैसर्गिक किटकनाशक

आपण अगदी हौसेने बाग तयार करतो. वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडं, भाज्या, शोभेची झाडं लावतो. ही झाडं वाढवताना बरीच मेहनत घेतो. पण या झाडांना अचानक कीड लागते आणि सगळी मेहनत वाया जाते. पण तुम्ही या बागेचं रक्षण अगदी सोप्या पद्धतीने करू शकता. घरातल्या उपलब्ध घटकांचा वापर नैसर्गिक किटकनाशक म्हणून करू शकता. चला तर मग, याबाबत माहिती घेऊ.

- कडवट चवीचं आणि वेगळ्या वासाचं कडुनिंबांचं तेल झाडावरच्या किडे, किटकांना लांब ठेवतं. १० ते १५ मिली कडुनिंबांच्या तेलात लिक्विड सोपचे काही थेंब घाला. थोडं गरम पाणी घाला. हे मिश्रण झाडांवर आणि रोपट्यांवर फवारा. या मिश्रणाचा प्रभाव आठवडाभर टिकून राहतो.
- थोडी शिकेकाई रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा. त्यानंतर एकास वीस अशा प्रमाणात शिकेकाई आणि पाणी यांचं मिश्रण तयार करा. हे मिश्रण दर चार दिवसांनी झाडांवर फवारा.
- प्रत्येकी एक मिरची, लसूण पाकळी घ्या. आल्याचा छोटा तुकडा घ्या. यांची पेस्ट बनवा. पेस्टमधून रस काढून एक लिटर पाण्यात मिसळा. हे मिश्रण रोपट्यांवर फवारा. रसाचे चार–पाच थेंब एक लिटर पाण्यात टाका.
- लसूण, मिरपूड आणि ऑलिव्ह ऑईल एकत्र करा. हे मिश्रण एकास दहा या प्रमाणात पाण्यात मिसळा. हे किटकनाशक रोपट्यांवर फरावा.
- हळद खूप लाभदायी आहे. थोडी हळद रोपट्यांवर टाका. यामुळे किड्यांपासून रोपट्यांचं रक्षण होईल.
- कंपोस्ट खत किंवा मातीत थोडी कॉफी मिसळा. मातीतले रोगजंतू, फंगस नष्ट होतील.

परसबाग



## मोबाईल हरवला तर घाबरू नका

मोबाईल हरवणे म्हणजे मोठे संकटच! कारण त्यात फोटो, संपर्क, सोशल मीडिया, बँकेचे ॲप्स सगळे असते. मोबाईल हरवण्याचे दु:ख तर असतेच, त्यातही सगळी महत्वाची माहिती चोराच्या हाती पडेल या कल्पनेनेच भीती वाटू लागते. पण आजकालच्या नव्या स्मार्टफोन्समध्ये 'फाइंड माय डिवाईस' ही सुविधा असते. या सुविधेमुळे हरवलेला मोबाईल शोधता येतो. अँन्ड्रोइडमोबाईल वापरणाऱ्या महिलांनी'सेसश्रश.लो/रपवीळव/षळपव'या लिंकवर आपल्या जीमेलखात्याने लॉगिन करायचे. तिथे मोबाईलचे शेवटचे लोकेशन दिसेल.तसेच फोन त्या वेळी सायलेंटवर असेल तरी'प्ले साऊंड' ही सूचना वापरुन फोन वाजवता येईल.गरज पडल्यास फोन 'लॉक' करून इतरांना वापरता येणार नाही असे करता येते. आणि फारच मोठा प्रॉब्लेम आहे असेलक्षात आले, तर 'इरेझ डिवाईस'करून मोबाईलमधला सगळा डेटा डिलीट करता येतो. आयफोनमध्येही अशी सुविधा आहे. फक्त तेव्हा'फाइंड माय फोन' असे म्हणायचे. त्यामुळे मोबाईल हरवला तरी घाबरायचेमुळीच कारण नाही. फक्त लक्षात ठेवा, की ही सुविधा आधी सेट करून ठेवावी लागते. घरातील ज्येष्ठ स्त्रियांना किंवा टेक्नॉलॉजी कमी वापरणाऱ्या महिलांना हे एकदा शिकवून ठेवले तर त्यांनाही मोठा दिलासा मिळेल. हा उपाय छोटा साधा आणि सोपा आहे.पण त्याचा फायदा मोठा आहे. मुख्य म्हणजे' नवीन फोनवर सगळा डेटा पुन्हा गूगल किंवा क्लाऊड वरून घेता येतोच.




टेक्नो टिप्स

## लो कार्ब डाएटचा अवलंब करताना...

सध्या विविध प्रकारची डाएट्स प्रचलित आहेत. त्यापैकी एक म्हणजे लो कार्ब डाएट. यामध्ये आहारातल्या कर्बोदकांच्या प्रमाणावर नियंत्रण येतं. लो कार्ब डाएट घेणाऱ्या आहारात प्रथिनं तसंच चांगल्या फॅट्सचं प्रमाण अधिक असतं. मात्र लो कार्ब डाएट डॉक्टरांच्या सल्ल्याने सुरू करावं तसंच काही गोष्टींची काळजी घ्यावी. या डाएटचा अवलंब करणाऱ्यांना या टिप्स नक्कीच उपयोगी पडतील.



- लो कार्ब डाएट घेणाऱ्या शाकाहारी लोकांनी प्रथिनांचे स्रोत शोधणं गरजेचं आहे. फ्लॉवर, ब्रोकोली, दूध, पनीर, दही, सुका मेवा तसंच विविध बियांमधून प्रथिनं मिळवू शकता. मांसाहारी लोक चिकन, मासे, अंडी यातून प्रथिनं मिळवू शकता.
- कोणत्याही डाएटचा अवलंब करताना आठवड्याभराच्या आहाराचं नियोजन करावं. यामुळे तुम्ही कर्बोदकं टाळालच शिवाय शक्य तितके पोषक घटक, जीवनसत्त्व घेणं तुम्हाला शक्य होईल.
- कर्बोदकांचं प्रमाण कमी झाल्यामुळे भूक लागू शकते. अशा वेळी लो कार्ब स्नॅक्स सोबत ठेवा. यात उकडलेली अंडी, सुका मेवा, विविध प्रकारच्या बियांचा समावेश करता येईल.
- तुमच्या आहारात कर्बोदकांचं प्रमाण कमी असेल तर तीव्र स्वरूपाचा व्यायाम करू नका.

डाएट अँड न्यूट्रिशन

## जमाना ट्रेंडी पॅंट्सचा



स्मार्ट ड्रेसिंग हा फॅशन जगतातला मंत्र आहे. कॅज्युअल आणि फॉर्मल कपड्यांमधल्या रेषा आता पुसट होत चालल्या आहेत. म्हणूनच आरामदायी आणि ॲथलेजर प्रकारच्या पॅंट्सची सध्या चलती आहे. पॅंट म्हटली की आपल्याला जीन्स किंवा ट्राउझर आठवते. पण आता पॅंटमध्ये प्रचंड व्हरायटी पहायला मिळते. तुमच्या वॉर्डरॉबमध्येही यापैकी काही पॅंट्स असायला हव्यात.

- बॅगी ट्राउझर्स हा प्रकार सध्या इन आहे. बेज तसंच पांढऱ्या रंगाच्या ट्राउझर्स खूप शोभून दिसतात. न्यूट्रल रंगाच्या ट्राउझर्स आणि बॉक्सी ब्लेझर्स हे कॉम्बिनेशन खूपच हिट ठरतं.
- कार्गो पॅंटने फॅशनविश्वात पुनरागमन केलं. गुलाबी, मिंट ग्रीन तसंच मेटॅलिक रंगांच्या कार्गो पॅंट खूप आकर्षक दिसतात. सॉफ्ट सिल्क, बटरी लेदर प्रकारच्या कार्गो पॅंटही घालता येतील.
- लाउंजवेअर म्हणजे ढगळ आणि आरामदायी कपडे. असे कपडे घालून तुम्ही आराम करू शकता, झोपू शकता. म्हणूनच लाउंज पॅंट्सची चलती आहे. या पॅंट्सवर रोल नेक टॉप किंवा ब्लाउज कॅरी करता येईल. लाउंजवेअर तुम्हाला हटके आणि आकर्षक लूक देतील.
- वर्क फ्रॉम होमचा वाढता ट्रेंड आणि सोशल मीडियावर दिसण्याचा अट्टाहास यामुळे प्रत्येकाला दिवसभर छान दिसायचं आहे. म्हणूनच पीजे पॅंट्सचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.
- बॅरल लेग ट्राउझर्स खूप उठून दिसतात. या हाय वेस्ट ट्राउझर्स आहेत. या ट्राउझर्स पायांलगत थोड्या ढगळ असतात. विविधता हे या ट्राउझर्सचं एक वैशिष्ट्य. या ट्राउझर्ससोबत क्रॉप टॉप, ब्लेझर किंवा अगदी साधा शर्टही घालता येईल. यासोबत तुम्ही व्हाईट स्नीकर्सही कॅरी करू शकता. यावर छानसा बेल्ट लावल्यामुळे तुमचा लूक खुलून जाईल.

स्टाईल स्टेटमेंट

# अस्मिता



## भंवरी देवीने आणला नवा कायदा

**भंवरी देवी यांनी १९९२ मध्ये आपल्या गावात होत असलेला बालविवाह थांबवण्याचा प्रयत्न केला. ही कृती गावातील काही मोठ्या लोकांना मान्य झाली नाही. त्यांनी भंवरी देवी यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी त्यांच्यावर क्रूरपणे सामूहिक बलात्कार झाला. या घटनेने केवळ त्यांचे वैयक्तिक आयुष्य उद्ध्वस्त झाले नाही तर संपूर्ण समाजात मोठी खळबळ उडाली.**

भंवरी देवी या राजस्थानमधील एक धाडसी आणि निडर सामाजिक कार्यकर्त्या आहेत. १९९० च्या दशकात त्या सरकारच्या महिला विकास प्रकल्पांतर्गत'साथिन'म्हणून काम करत होत्या. या कामात बालविवाह रोखणे, महिलांचे सक्षमीकरण, आरोग्य आणि स्वच्छतेविषयी जागृती करणे अशी जबाबदारी त्यांच्यावर होती. १९९२ मध्ये त्यांनी आपल्या गावात होत असलेला बालविवाह थांबवण्याचा प्रयत्न केला. ही कृती गावातील काही मोठ्या लोकांना मान्य झाली नाही. त्यांनी भंवरी देवी यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी त्यांच्यावर क्रूरपणे सामूहिक बलात्कार झाला. या घटनेने केवळ त्यांचे वैयक्तिक आयुष्य उद्ध्वस्त झाले नाही तर संपूर्ण समाजात मोठी खळबळ उडाली.

मानिनी

भंवरी देवी शांत बसल्या नाहीत. त्यांनी न्याय मिळवण्यासाठी अथक लढा दिला. मात्र स्थानिक न्यायालयांनी आरोपींना निर्दोष ठरवले. हा अन्याय पाहून अनेक महिला संघटना त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याच्याच आधारावर १९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निर्णय दिला आणि विशाखा मार्गदर्शक तत्त्वेजारी केली. या तत्त्वांमुळे भारतात कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणार्याद लैंगिक छळापासून संरक्षण व्हावे यासाठी काम करायला सुरुवात झाली. पुढे २०१३ मध्ये या तत्त्वांवर आधारित सेक्सुअल हॅरॅसमेंट ऑफ वुमेन ॲट वर्कप्लेस (प्रिव्हेंशन, प्रोहिबिशन अँड रिड्रेस्सल) हा कायदा अस्तित्वात आला.



भंवरी देवी या साध्यासुध्या खेडूत स्त्रीने त्यांनी समाजातील रूढी आणि दबावाला न जुमानता सत्य आणि न्यायासाठी आवाज उठवला. त्यांच्या संघर्षामुळे भारतात लाखो महिलांना सुरक्षित कार्यस्थळाचा हक्क मिळाला. आज त्यांना महिला हक्कांच्या चळवळीतील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व मानले जाते. एका स्त्रीचा संघर्ष समाज आणि कायदा दोन्ही बदलू शकतो ही गोष्ट भंवरी देवींच्या लढ्यामुळे सिद्ध झाली.

## खूप एकटं वाटतंय...



मी २८ वर्षांची महिला असून सहा महिन्यांपूर्वी लग्न झालं. आमचं अरेंज मॅरेज असलं तरी लग्नाआधी मी पतीला ओळखत होते. लग्नाआधीच मनं जुळली होती आणि आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो. पण लग्नानंतर मला एकटं, निराश वाटू लागलं आहे. आम्ही दोघंही नोकरी करतो. त्यामुळे एकमेकांसाठी वेळ मिळत नाही. ऑफिस घरापासून खूप लांब असल्यामुळे ते सकाळी लवकर निघतात आणि रात्री उशीरा घरी येतात. आम्हाला दिवसभरात फक्त चार तास एकत्र मिळतात. सुटीच्या दिवशीही ते खूप व्यस्त असतात. त्यांच्या इतरही ॲक्टिविटी असल्यामुळे शनिवार–रविवार मी एकटीच असते. लग्नाआधी हे सगळं माहीत होतं. त्यांनी माझ्यासाठी हे सगळं थांबवावं, असं वाटत नाही. या नव्या ठिकाणी फारशी ओळखही नाही. त्यामुळे घरी बसून रहावं लागतं. या सगळ्याला खूप वैतागले आहे. या कारणावरून माझे पतीसोबत खटकेही उडत असतात. पतीला माझ्या रागाचं कारण माहीत आहे. पण ते बदलायला तयार नाहीत. मी काय करू?

– लग्नाआधी दोघांच्या एकमेकांकडून खूप अपेक्षा असतात. प्रत्येकजण स्वप्न रंगवतो. पण प्रत्यक्षात आयुष्य अपेक्षित वळणावरून जातंच असं नाही. लग्नानंतर काही बदल स्वीकारावे लागतात. तू पतीला त्याची आवड जपू देतेस. त्याला थांबवत नाहीस. हे योग्यच करतेस. पतीला त्याच्या आवडीप्रमाणे वागू दिलं नाहीस तर त्याची चिडचिड होईल, तुमच्यात भांडणं होतील. मैत्रिणी, तू पतीशी स्पष्टपणे बोल. तुझ्या अपेक्षा सांग. तो काही सामाजिक कार्य करत असेल तर त्यात तूही सहभागी हो. मन रमवण्यासाठी इतर पर्याय शोध. शेजाऱ्यापाजाऱ्यांशी ओळख करून घे. यासाठी तुलाच पुढाकार घ्यायला हवा. तुझं नुकतंच लग्न झालं आहे. पण तू स्वतंत्र, स्वावलंबी आहेस. त्यामुळे या एकटेपणावर तुला नक्कीच मार्ग काढता येईल.

काय करू?

## चविष्ट चिकू बर्फी

**खास प्रसंगी एखादा गोड पदार्थ किंवा मिष्टान्न बनवण्याचा विचार करायचा असाल तर चिकूची बर्फी करून बघा. झटपट होणारी ही बर्फी खूपच छान लागते.**

**कृती :** चिकूची सालं काढून गर मिक्सरमध्ये वाटून घ्या. कढई गॅसवर ठेऊन त्यात तूप घाला. यात चिकूचा गर घाला. तूप सुटेपर्यंत परतून घ्या. मग यात दूध घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत हलवत रहा. यात साखर घालून हलवून घ्या. हे मिश्रण घट्ट होईपर्यंत हलवत रहा. यात वेलची पूड घालून हलवून घ्या. आता एका ताटलीला तेल लावून घ्या. कढईतलं मिश्रण ताटलीत काढून पसरून घ्या. त्यावर बदाम आणि पिस्ते घाला. यानंतर सेट होण्यासाठी तासभर फ्रीजमध्ये ठेऊन द्या. तासाभराने चौकोनी वड्या कापून घ्या. चिकू बर्फी तयार आहे!

**साहित्य :** पाच ते सहा चिकू, अर्धी वाटी बदाम आणि पिस्त्याचे काप, अर्धी वाटी वेलची पावडर, दोन चमचे तूप, पाच ते सहा चमचे साखर

रसगंधा



## कमाल गोल्डन आयशॅडोची

पार्टी, समारंभाला जाताना फक्त ट्रेंडी कपडे घालून भागत नाही तर त्यासोबत छान मेक अपही करायला हवा. मेक अप करताना छोटीशी चूक झाली तरी लूकचा पूर्ण विचका होऊ शकतो. मेक अप करताना रंगांच्या बाबतीत बराच गोंधळ होतो. आयशॅडो असो वा ब्लश किंवा मग लिपस्टिक, कोणती रंगसंगती कॅरी करायची हे पटकन कळत नाही. म्हणूनच गोल्डन आयशॅडोसोबत वेगवेगळे प्रयोग करता येतील. सोनेरी रंग प्रत्येकावर खुलून दिसतो. शिवाय प्रत्येक प्रकारच्या पेहरावावरही तो खुलून दिसतो. गोल्ड आयशॅडोचा वापर करून तुम्ही डोळ्यांना हटके लूक देऊ शकता.



- सध्या स्मोकी आईजचं बरंच प्रस्थ आहे. रात्रीच्या समारंभात स्मोकी आईज खूप सुंदर दिसतात. सोनेरी आयशॅडोने तुम्ही हा स्मोकी लूक मिळवू शकता. यासाठी डोळ्यांवर गोल्डन आयशॅडो लावा. मग डोळ्यांच्या कडांलगत काळी किंवा गडद रंगाची आयशॅडो लावा. शेवटी मस्कारा आणि आयलायनरचा जाडसर थर लावून हा लूक पूर्ण करा. यामुळे तुम्हाला छान स्मोकी लूक मिळेल.
- गोल्डन आयशॅडोने ग्लिटर लूक मिळवता येईल. यासाठी आधी डोळ्यावर बेस आयशॅडो लावा. त्यावर चकाकती गोल्डन आयशॅडो लावा. मग मस्कारा आणि आयलायनरने आपला लूक पूर्ण करा. तुम्ही खोट्या पापण्याही लावू शकता.
- तुम्हाला फार झगमगीत लूक नको असेल तर गोल्डन आयशॅडोने फक्त टच अप करा. यासाठी कपड्यांच्या रंगाशी मिळतीजुळती आयशॅडो लावा. त्यानंतर कडांलगत गोल्डन आयशॅडो लावा. यामुळे तुमचे डोळे खूप सुंदर दिसतील.
- मेक अपच्या बाबतीत थोडे प्रयोग करायचे असतील तर कट क्रीज मेक अप करता येईल. यासाठी आधी कॅट आय मेक अप करून घ्या. यासाठी काळी किंवा इतर रंगांची आयशॅडो वापरता येईल. त्यानंतर डोळ्यांच्या वरच्या बाजूला ग्लिटर गोल्डन आयशॅडोने फक्त एक रेष काढा. या लूकमध्येही तुम्ही उठून दिसाल.

ब्युटी टॉक

हेअर केअर

### केसांसाठी लवंगाचं तेल

लवंगामुळे दातांची दुखणी बरी होतात. शिवाय केसांच्या वाढीसाठीही लवंग उपयुक्त ठरतं. लवंगाचं तेल उत्तम हेअर कंडिशनर आहे. लवंगाच्या तेलाचे दोन ते तीन थेंब ऑलिव्ह ऑईलमध्ये घाला. हे मिश्रण ओल्या केसांवर लावा. यानंतर केसांवर टॉवेल गुंडाळा. साधारण १० ते १५ मिनिटांनंतर केस वाळतील. यामुळे केस छान मुलायम होतील. लवंगाच्या तेलामुळे रक्ताभिसरण सुधारतं. यामुळे केस गळण्याचं प्रमाण कमी होतं. शॅंपू लावण्यासाठी लवंगाच्या तेलाने टाळूला मसाज करा. यामुळे केस गळण्याचं प्रमाण कमी होईल.



स्कीन केअर



### लावा केळ्याचा फेस पॅक

कोरडी त्वचा आणि काळ्या डागांची समस्या दूर करण्यासाठी घरीच फेस पॅक तयार करता येईल. फेस पॅक तयार करण्यासाठी अर्धं केळं सालासकट वाटून घ्या. यात अर्धा चमचा ग्लिसरीन आणि टी ट्री ऑईलचे चार थेंब टाका. सर्व मिश्रण एकत्र करा. हा फेस पॅक चेहऱ्यावर लावा. या पॅकमधून त्वचेला 'क' आणि 'ई' जीवनसत्त्व मिळेल. 'ई' जीवनसत्त्वामुळे त्वचा छान तजेलदार दिसेल.

स्मार्ट शॉपिंग



### सेलमध्ये खरेदी करताना...

लग्नप्रसंगी लेहंगा चोली कॅरी करण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. लग्नात पारंपरिक पेहराव करणाऱ्या मुली रिसेप्शनला लेहंगा चोली घालतात. लग्नासाठी लेहंगा चोली घेताना काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. लेहंगा घेताना रंग, स्टाईल, डिझाइनसोबतच आरामदायीपणाचा विचार करायला हवा. लेहंगा घेण्यासाठी ऑनलाईन सर्च करा. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा लेहंगा विकत घ्या. उंची ठिकठाक असेल आणि वजन थोडं जास्त असेल तर घेरवाला लेहंगा घ्या. उंच मुली फिटिंगवाले लेहंगे घालू शकतात. लेहंगा विकत घेण्याआधी परिधान करून बघा.

किचन टिप्स



### रायता बनवताना...

आपण घरी रायतं बनवतो. आधी करून ठेवलेलं रायतं नंतर आंबट होतं. हे टाळण्यासाठी रायतं बनवताना मीठ घालू नका. त्याऐवजी वाढण्याआधी मीठ घाला. यामुळे रायत्यातलं दही आंबट होणार नाही. तसंच आलू पराठे बनवताना बटाट्याच्या सारणात कसूरी मेथी घाला. यामुळे आलू पराठे खूप चविष्ट बनतील.

# ओबीसी वर दुहेरी भूमिका चालणार नाही


## शरद पवार सर्वपक्षीय बैठकीला का आले नाही? भुजबळांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

मराठा आरक्षणासंदर्भात बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला शरद पवारांसह विरोधी पक्षाचे कोणतेही लोक आले नाही. त्यानंतर आता पवार हा प्रश्न सामंजस्याने सोडवण्याची भाषा करत आहेत. असे असेल तर ते तेव्हाच सर्वपक्षीय बैठकीला का आले नाही? असा रोखठोक सवाल ओबीसी नेते आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी गुरूवारी पवारांवर शरसंधान साधताना केला. ते नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होते.

मराठा आरक्षण या विषयावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी. त्या बैठकीला मराठा समाजाचे मनोज जरांगे, ओबीसी समाजाचे छगन भुजबळ, लक्ष्मण हाके यांनाही बोलवावे, त्या संयुक्त बैठकीत चर्चा करून या विषयावर मार्ग काढावा अशी सूचना शरद पवार यांनी सरकारला केली होती.

त्याला प्रतिसाद देत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक सर्वपक्षीय बैठक बोलावली. पण, त्या बैठकीला शरद पवारच अनुपस्थित राहिले. सामंजस्याने तोडगा काढण्याची भाषा करणारे शरद पवार तेव्हा बैठकीला का आले नाही? असे भुजबळ या प्रकरणी संतापाच्या सुरात म्हणाले.



**तेव्हा शरद पवारच मार्गदर्शक**

उद्धव ठाकरे यांचे सरकार होते तेव्हापासून मराठा समिती अस्तित्वात होती. त्यावेळी त्यांचे मार्गदर्शक शरद पवारच होते. त्या समितीत राष्ट्रवादीच्या बाजूने अजित दादा आणि जयंत पाटील, शिवसेनेच्या वतीने एकनाथ शिंदे आणि सुभाष देसाई, काँग्रेसच्या बाजूने बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण होते. त्यावेळी मराठा समाजासाठी समिती नेमण्याची गरज होती काय, असे पवार बोलले नाही. शरद पवार यांच्या विषयी आदर राखूनही तेव्हा ते का बोलले नाहीत? असा सवाल भुजबळ यांनी केला.

छगन भुजबळ यांनी या प्रकरणी दुहेरी भूमिका चालणार नाही असे ठणकावून सांगितले. ते म्हणाले, आमच्यामध्ये आणखी मंत्री टाका. आम्ही आमचे आरक्षण वाचवण्यासाठी झगडत आहोत. आणि मराठ्यांना इथे ईडब्ल्यूएसमध्ये आरक्षण असतानाही त्यांना ओबीसीमध्ये वेगळे पाहिजे. यावरही पवारांनी बोलले पाहिजे.

त्यावेळी एक भूमिका आणि यावेळी वेगळी भूमिका असे चालायचे नाही. मराठा समाजाला खुल्या प्रवर्गातून संधी होती. त्यावेळी पवारांनी नाही म्हटले. मोदींनी ईडब्ल्यूएसचे आरक्षण आणले. त्यात मराठा समाज आठ टक्के आहे. आता तरीसुद्धा तुम्ही म्हणता की ओबीसीमध्ये आरक्षण पाहिजे.

मी म्हटले की, तुम्ही सांगा आम्हाला मराठा आरक्षण वेगळे नको. आम्हाला फक्त ओबीसीमध्ये पाहिजे म्हणून. आता एमपीएससी व मेडिकलचे निकाल लागले. त्यात ओबीसींचा कट ऑफ वर आहे. बाकीचे खाली आहे. तुम्हाला राजकारणात, आरक्षण हवे आहे की शिक्षणात हे ठरवा. आणि आर्थिकदृष्ट्या फायदाही हवा आहे. ओबीसींना मिळत असलेले सर्व फायदे मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना मिळत आहेत.

ते पुढे म्हणाले, मंत्रिमंडळात मी अनेक वेळा बोललो, जे मराठा समाजाला देत आहेत तेच ओबीसींनाही द्या.आम्ही आमचे आरक्षण वाचवण्यासाठी पुढे यायचे नाही का? पवार साहेबांना माझं सांगणं आहे, शिवसेना सोडून मी तुमच्यासोबत आलो ते मंडल कमिशनसाठी आणि तुम्ही मंडल कमिशन लागू केलं. त्यासाठी तुमचे आभार मानले. पण मग आमचे आरक्षण जात असेल तर पवारांनी बोलायला नको? असा सवाल भुजबळ यांनी केला.

मंडल आयोग आल्यानंतर तोपर्यंत सरकार मराठा एक जात असेल. पण ओबीसींच्या ३७४ जाती आहेत. म्हणून त्या प्रत्येक जातीचे नुकसान होत आहे, म्हणून आम्ही कुणबी, माळी, वंजारी समाजाच्या वतीने हायकोर्टात याचिका दाखल केलेली आहे. दोन-चार दिवसात त्याच्यावर सुनावणी होईल, असे ते म्हणाले.

# शरद पवारांचा महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

ओबीसी आणि मराठा उपसमितीवर भाष्य करताना, ऐक्य घडवायचे तर समित्यांत एकाच जातीचे लोक का? सरकारने इथे सामंजस्य निर्माण करून दोघात एकता करायला पाहिजे होती, असे मत शरद पवारांनी मांडले होते.

शरद पवारांच्या या भूमिकेवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. शरद पवारांचा महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, यासाठी शरद पवारांनी काळजीपूर्वक बोलले पाहिजे, असेही ते म्हणालेत.



राज्य सरकारने हैदराबाद गॅझेज लागू केल्यानंतर ओबीसी संघटना आक्रमक झाल्या आहेत. याशिवाय बंजारा आणि धनगर समाजही हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देण्याच्या मागणीसाठी आग्रही असल्याचे दिसून येत आहे. यावर महाराष्ट्रातील समाजिक वीण उसवत असल्याची प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली होती.

त्यावर बावनकुळे म्हणाले, शरद पवार हे महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचे काम करत आहेत. समाजात तेढ निर्माण होणार नाही, यासाठी पवार यांनी काळजीपूर्वक बोलले पाहिजे. मराठा आणि ओबीसी समाजाच्या उपसमित्या समाजामध्ये एकरुपता आणण्यासाठी, समाज एकसंघ करण्यासाठी तसेच महाराष्ट्राला मजबूत करण्यासाठी आणि समाजातील तेढ कमी करण्यासाठी निर्माण करण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## तलावातील मासे चोरीच्या प्रयत्नात दोघांचा बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १८ :

मासे खायचे आहेत, पण ते चोरून. या मानसिकतेतून मासे चोरण्यासाठी गेलेल्या दोघांचा नाल्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना पवनी तालुक्यातील खांबाडी या गावी घडली.

पवनी तालुक्यातील खांबाडी या गावातील दोघांनी मासे खाण्याच्या मोहात आपला जीव गमावला. मासे चोरायला गेलेल्या एकाचा पाय घसरून तो नालात बुडायला लागला त्याला वाचवण्यासाठी दिलेला दुसरा व्यक्ती ही पाण्या त पाय घसरून बुडू लागला. विशेष म्हणजे हे दोघेही दारूच्या नशेत असल्याचे सांगण्यात येत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गावापासून १५ किमी अंतरावर असलेल्या खांबाडी शेत शिवारातील नाल्यात मासे पकडण्यासाठी एका व्यक्तीने जाळे लावून ठेवले होते. या अडकलेले मासे चोरण्याच्या हेतूने घनश्याम रामटेके (वय ४२) व मिलिंद सुखदेवे (५५) हे नाला परिसरात गेले. या दरम्यान एकाचा पाय घसरून तो खोल पाण्यात बुडू लागण्याने दुसऱ्या व्यक्तीने वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र यात दोघांचाही मृत्यू झाला. आज १८ सप्टेंबर रोजी मासे पकडण्यासाठी जाळे लावणारी व्यक्ती गेली असता हा प्रकार उघडकिस आला. गावात याची चर्चा आहे.

अड्याळ पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे. १७ सप्टेंबर च्या रात्री ११ ते १८ च्या सकाळी ७ दरम्यान ही घटना घडल्याचे नमूद आहे. पोलिसात मासे पकडण्यासाठी गेल्याचे म्हंटले जात असले तरी वास्तव वेगळेच असल्याने ग्रामस्थ सांगतात. या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## राहुल गांधींचे भाष्य बालिश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेऊन कशाप्रकारे ऑटोमॅटिक आणि तंत्रज्ञानाचा वापर करून मतदार यादीतील विरोधी पक्षाचे समर्थित मतदार वगळण्यात आले आणि त्याच पद्धतीने बनावट मतदार यादीत समावेश करून घेण्याचा आरोप केला. त्यावर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेबद्दल जे भाष्य केले आहे ते बालिशपणाचे आहे अशी टीका केली आहे.



ते म्हणाले निवडणूक प्रक्रिया समजून घेणे त्यांना आवश्यक आहे. कदाचित त्यांचे सल्लागार त्यांना बूथ लेवलपासून मतदार यादी तयार होणे आणि मतदान प्रक्रिया संपूर्ण प्रक्रियेची माहिती त्यांच्यापासून लपवून ठेवत असतील, असेही तटकरे म्हणाले. त्यांच्या सल्लागारांना राहुल गांधी यांची बदनामी करायची असेल, असा दावाही केला.

सुनील तटकरे आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागपूर शहर कार्यालयात पत्रकार परिषदेत बोलत होते. तटकरे म्हणाले, प्रत्येक पक्षाचा बीएलओ असतो, मतदार यादी तयार करणे, ती तपासणे तसेच मतदान केंद्रावरसुद्धा प्रत्येक पक्षाचा प्रतिनिधी असतो तो मतदाराची ओळख पटवून घेऊ शकतो तरीदेखील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी अशा प्रकारचा आरोप करत असतील तर तो चुकीचा आहे, तो एक कथानक तयार करण्याचा प्रयत्न आहे. मतदार सुज्ञ आहे, असेही ते म्हणाले.

ओबीसी आरक्षणावर भुजबळांची मुख्यमंत्र्याशी चर्चा, सुनील तटकरे यांचा दावा

नागपूर : राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला कुणबी जाती प्रमाणपत्र वितरण करण्यास विरोध केला आहे. समता परिषदेचा आज नागपुरात ओबीसी मेळावा आहे. या मेळाव्याला मंत्री छगन भुजबळ मार्गदर्शन करणार आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

**भुजबळांची मुख्यमंत्र्याशी चर्चा**

ते म्हणाले, सकल मराठा समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे पण, ते आरक्षण देत असताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागायला नको, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सुरुवातीपासून राहिली आहे. जरांगे पाटीलांनी मराठा समाजाचा एक आंदोलन उभे केले.

त्यांच्या सुरुवातीला काही वेगळ्या मागण्या होत्या. त्यानंतर मागण्याची व्याप्तीत बदल होत गेला. त्यातून हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट असे नवीन नवीन त्यातील बाबी पुढे आल्या. आता सरकारने ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या बाबतचा जो नवीन आदेश काढला आहे. त्याचा अभ्यास छगन भुजबळ त्यांच्या पद्धतीने करत आहेत. मराठा समाजाचे नेतेसुद्धा त्याचा अभ्यास करत आहेत. इतरही अभ्यासक जे कोणत्याही समाजाच्या बाजूने नाहीत. ते देखील त्यावर विचार करत आहेत.

मराठा समाजाला आरक्षण दिल्यामुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागतो आहे काय याचा विचार प्रत्येकजण आपल्या पद्धतीने करत आहेत. भुजबळ यांनी गेल्या ४० वर्षात ओबीसी आरक्षणाच्या माध्यमातून एक चळवळ उभी केली आहे. ते त्याच्या पद्धतीने अभ्यास करत आहेत. मुख्यमंत्री आणि भुजबळ यांची चर्चा झाली आहे, मंत्रिमंडळात चर्चा झाली. त्यामुळे या प्रश्नाची उकल सामाजिक दरी न वाढता एकोप्याने कशी होईल, असा आमचा सर्वांचा प्रयत्न आहे, असे तटकरे म्हणाले.

## मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल काँग्रेसमध्ये

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १८ :

मेळघाटातून तीन वेळा आमदार राहिलेले माजी आ. राजकुमार पटेल यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याआधी ते प्रहारच्या तिकिटावरून निवडून आले होते.



तत्पूर्वी ते काँग्रेसच्याच तिकिटावर मेळघाटातून निवडून आले होते. त्यामुळे पटेल हे स्वगृही परतले आहेत. त्यांनी त्यांचा कौटुंबिक वारसा, काँग्रेससोबत असलेला ऋणानुबंध जपल्याची प्रतिक्रिया सपकाळ यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट)चे संघटन सचिव अमित गावंडे यांच्या नेतृत्वाखाली सचिव भूषण लोणारे, सोशल मीडिया सेल शहराध्यक्ष अक्षय ढोले आणि सामाजिक न्याय जिल्हा सचिव दिनेश येवले यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याप्रसंगी खा. बळवंत वानखेडे, यशोमती ठाकूर उपस्थित होत्या.

## पूर्व विदर्भात पुन्हा पाऊस?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

हवामान विभागाने महाराष्ट्राच्या काही भागाला शुक्रवार १९ रोजी मुसळधार पावसाचा इशारा दिला असून, त्यात पूर्व विदर्भाचाही समावेश आहे.

मील अनेक दिवसापासून धुंवाधार पाऊस विदर्भाला झोडपत असून, सद्धया ढगाळ वातावरण आहे. त्यातच आता हवामान खात्याने शुक्रवार १९ रोजी विदर्भाच्या अनेक भागात पाऊस कोसळणार असल्याचा इशारा दिला आहे. प्रशासनानेही याची दखल घेतली असून, योग्य ती खबरदारी घ्यावी, असे सूचित केले आहे.

## छबी चित्रपटातून उलगडणार फोटोचं गूढ




लोकरंजन

फोटोग्राफी करणारा एक फोटोग्राफर कोकणात एका मुलीचे फोटो काढतो. त्या फोटोंचा एक विचित्र अनुभव त्याला येतो. त्या फोटोंमागे नेमकं काय गूढ असतं याची गोष्ट छबी या चित्रपटातून पाहता येणार आहे. अत्यंत रंजक अशा या चित्रपटाचा ट्रेलर आणि म्युझिक लाँच सोहळा नुकताच मोठ्या दिमाखात संपन्न झाला. येत्या २५ सप्टेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

केके फिल्म्स क्रिएशन, उप्स डिजिटल एंटरटेन्मेंट यांनी छबी या चित्रपटाची निर्मिती केली असून जया तलक्षी छेडा या चित्रपटाच्या निर्मात्या आहेत. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन अद्वैत मसूरकर यांचं आहे. चित्रपटात समीर धर्माधिकारी, मकरंद देशपांडे, शुभांगी गोखले, राजन भिसे, संजय कुलकर्णी, लीना पंडित असे अनुभवी कलाकार असून ध्रुव छेडा, सृष्टी बाहेकर, अनघा अतुल, रोहित लाड, ज्ञानेश कदम या नव्या दमाच्या कलाकारांचा उत्तम अभिनयही आपल्याला पहायला मिळणार आहे.

फोटोग्राफी स्पर्धेसाठी एक तरूण फोटोग्राफराला फोटो पाठवायचे असतात. त्यासाठी तो कोकणात जातो. कोकणात जाऊन एका मुलीचे फोटो काढलेले असतात. प्रत्यक्षात त्या फोटोत कुणीच दिसत नाही. पण त्या फोटोग्राफरला त्या फोटोत मुलगी दिसत असते. या फोटोमागे काय कहाणी आहे? ती मुलगी कोण असते? या प्रश्नांची उत्तरं मोठ्या पडद्यावरच पाहायला मिळणार आहेत. निसर्गसंपन्न कोकणाच्या पार्श्वभूमीवरची एक गूढरम्य गोष्ट छबी या चित्रपटांतून मांडण्यात आली आहे. ■ ■ ■

## 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' प्राइम व्हिडिओचा ट्रेलर रिलीज



भारतातील सर्वात आवडते मनोरंजन केंद्र असलेल्या प्राइम व्हिडिओने त्यांच्या आगामी मूळ टॉक शो 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' चा बहुप्रतिक्षित ट्रेलर लाँच केला.

या ट्रेलरमध्ये प्रेक्षकांना त्यांच्या आवडत्या स्टार्सच्या जगात एक झलक दाखवण्यात आली आहे, ज्यामध्ये मजेदार, संस्मरणीय क्षण, करिअरमधील टप्पे आणि मसालेदार अफवा आणि लिंक-अप्स यांचा समावेश आहे. या शोचे सह-होस्टिंग पहिल्यांदाच करिष्माई काजोल आणि विनोदी ट्विंकल खन्ना करणार आहेत. प्राइम व्हिडिओचा नवीन अनस्क्रिप्टेड ओरिजिनल, बनिजय एशिया निर्मित, २५ सप्टेंबर रोजी प्रीमियर होईल. तो भारतात आणि २४०+ देशांमध्ये आणि प्रदेशांमध्ये एकाच वेळी प्रदर्शित होईल, दर गुरुवारी नवीन एपिसोड्स स्ट्रीमिंग होतील.

शोच्या पाहुण्यांच्या यादीत सलमान खान, आमिर खान, अक्षय कुमार, आलिया भट्ट, वरुण धवन, करण जोहर, कृती सेनन, विकी कौशल, गोविंदा, जान्हवी कपूर आणि इतर अनेक मोठ्या बॉलीवूड स्टार्सचा समावेश आहे. 'टू मच विथ काजोल' आणि 'ट्विंकल' हा खरोखरच प्रामाणिकपणा, विनोद आणि अनपेक्षित खुलाशांनी भरलेला एक रोलरकोस्टर आहे.

येथे सलमान आणि आमिरची भावंडांची केमिस्ट्री दिसेल, करण आणि जान्हवीची मजेदार विनोदी धमाल छेडछाडीसह सुरू राहील. आलिया आणि वरुणचा विद्यार्थी ते सुपरस्टार हा प्रवास देखील उलगडेल.

गोविंदा आणि चंकी पांडे यांचे विनोदी संभाषण तुम्हाला हसवेल आणि कृती-विकी सारख्या नवीन पिढीच्या स्टार्सच्या यशोगाथा देखील प्रेरणा देतील. शोमध्ये सर्वात वास्तविक आणि वेगळ्या शैलीतील पाहुणे दिसतील, जे तुम्ही कदाचित यापूर्वी कोणत्याही शोमध्ये पाहिले नसतील. ■ ■ ■

## क्रांतिज्योती मध्ये दिसणार कलाकारांची भक्कम फौज!




काही दिवसांपूर्वीच दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी त्यांच्या आगामी चित्रपट क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यमची घोषणा केली होती. मराठी शाळांची कमी होत जाणारी संख्या, मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व यावर मनोरंजन करत भाष्य करणाऱ्या या चित्रपटाचे चित्रीकरण अलिबाग आणि आसपासच्या भागात यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे.

चित्रपटाच्या घोषणेनंतरच यात कलाकार कोण असतील, याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली होती. प्रेक्षकांच्या उत्सुकतेला पूर्णविराम देत चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. यात कलाकारांचे चेहरे जरी दिसत नसले तरी चित्रपटात दमदार कलाकारांची भक्कम फौज पाहायला मिळणार हे नक्की. मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते सचिन खेडेकर, तरुण पिढीचे स्टार्स अमेय वाघ आणि सिद्धार्थ चांदेकर, लोकप्रिय अभिनेत्री क्षिती जोग, कादंबरी कदम, तसेच हरीश दुधाडे आणि पुष्कराज चिरपुटकर यांच्यासह सोशल मिडीया स्टार प्राजक्ता कोळी प्रथमच मराठी चित्रपटात दिसणार आहे. या सर्व ताकदीच्या कलाकारांचा अभिनय या चित्रपटात पाहायला मिळणे, म्हणजे प्रेक्षकांसाठी ही पर्वणी ठरणार आहे.

दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, माझे शालेय शिक्षण रायगड जिल्ह्यात झालं आणि आता माझा हा चित्रपट जो मराठी शाळांबद्दलच आहे त्याचं चित्रीकरण मला याच भागात करता आलं याचा प्रचंड आनंद आहे. चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहून खूप आनंद झाला होता आणि आता चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर माझा विश्वास अधिक दृढ झाला आहेह्व क्षिती जोग यांच्या चलचित्र मंडळी निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हेमंत ढोमे यांनी केले आहे. ■ ■ ■

स्टार प्लस त्यांच्या 'माना के हम यार नहीं' या शोसह प्रेक्षकांसाठी एक नवीन आणि ताजीतवानी कथा घेऊन येत आहे. या शोमध्ये मनजीत मक्कर कृष्णाची भूमिका साकारत आहे, तर शोमध्ये दिव्या पाटील खुशीची भूमिका साकारताना दिसणार आहे.

शोमध्ये दोघांचेही आयुष्य एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे आहे, परंतु नशिब त्यांना एकत्र आणते. खुशी एक मजबूत आणि जबाबदार मुलगी आहे, तर कृष्णा प्रेम आणि साधेपणाने भरलेली आहे. एकत्र, दोघेही एक अशी कथा तयार करतात ज्यामध्ये अनेक भावना, ट्विस्ट आणि नवीन नातेसंबंध पाहायला मिळतील. ७ ऑक्टोबर रोजी फक्त स्टार प्लसवर हा शो संध्याकाळी ७ वाजता प्रदर्शित होईल. ■ ■

**माना कि हम यार नहीं**
**स्टार प्लसवर लवकरच**



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## विवाह प्रमाणपत्र नाही म्हणून महिलेला परीक्षा केंद्रावरून बाहेर काढले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे संचालनालय विभागाच्या वतीने औषधी व द्रव्या विभागातील काही पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. याची परीक्षा नागपूरच्या विविध केंद्रांवर आयोजित करण्यात आली होती. गुरुवारी १२.३० वाजतापर्यंत परीक्षा केंद्रावर पोहचण्याची वेळ देण्यात आली होती. तर दुपारी १ वाजता ही परीक्षा सुरू होणार होती. मात्र, या परीक्षेच्या दरम्यान गोंधळ उडाल्याने अनेक परीक्षार्थिंना परत जावे लागले आहे.

यात लग्न झालेल्या महिलेकडे ओळखपत्राचा पुरावा म्हणून सर्व प्रकारचे प्रमाणपत्र असतानाही केवळ लग्न झाल्याचे विवाह प्रमापणत्र नसल्याने तिला परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. विभागाच्या वतीने १८ सप्टेंबरला नागपूरच्या जिंदाल एज्युकेशन संस्था गोंडखैरी परिसरात परीक्षा आयोजित करण्यात आली होती. यात औषध वितरक पदासह अन्य पदांचीही परीक्षा होणार होती. यासाठी नागपूर विभागाच्या विविध भागांमधून उमेदवार आले होते.

यासाठी चंद्रपूरवरून एक महिला वेळेत परीक्षा केंद्रावर प्रवेशासाठी पोहचली. यावेळी तिने परीक्षा अर्जामध्ये लग्नानंतरचे बदललेले नाव लावले आहे. त्यासाठी तिने आधार कार्ड, पॅन कार्ड हे प्रमाणपत्र ओळखपत्र म्हणून दाखवले. त्यात लग्नापूर्वीचे आणि लग्नानंतरच्या अशा दोन्ही नावांचा उल्लेख आहे.

यावरून संबंधित महिला विवाहित असून तिचे लग्नानंतरचे नाव काय? हे स्पष्ट होते. असे असतानाही तिला केवळ विवाह प्रमाणपत्र नाही म्हणून परीक्षेपासून वंचित ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे.या गंभीर प्रकारामुळे महिलेला परीक्षेपासून वंचित राहावे लागले आहे. काही उमेदवारांना परीक्षा केंद्रावर पोहचण्यास पाच मिनीटांचा उशीर झाल्याने त्यांनाही परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यास नकार दिला आहे.

## कोकाटेंनी रोहित पवारांना अखेर कोर्टात खेचले

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १८ :

विधिमंडळात कथितपणे ऑनलाईन रमी खेळल्या प्रकरणी वादात सापडलेले मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अखेर मानहानी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना कोर्टात खेचले आहे. कोर्टात झालेल्या सुनावणीत कोकाटेंनी रोहित पवार यांना मी नेमका रमीच खेळत होतो हे कशावरून? असा सवाल केला आहे.



रोहित पवार यांनी विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना एक व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यात तत्कालीन कृषिमंत्री माणिकरावर कोकाटे कथितपणे ऑनलाईन रमी खेळताना दिसून येत होते. त्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महायुती सरकारवर टीकेची झोड उठली होती. अखेर सरकारने कोकाटेंकडील कृषि मंत्रालय काढून ते दत्तात्रय भरणे यांच्याकडे दिले होते. तसेच कोकाटे यांच्याकडे क्रीडा मंत्रालयाचा पदभार सोपवण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर माणिकराव कोकाटे यांनी रोहित पवार यांच्याविरोधात वकील मनोज पिंगळे यांच्यामार्फत अब्रुनुकसानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे.

या दाव्यावर नाशिक न्यायालयात कोर्टात सुनावणी झाली. त्यात कोकाटे यांच्या वकिलांनी माझे अशील रमीच खेळत होते हे कशावरून? व व्हायरल व्हिडो मॉर्फ केला नसेल हे कशावरून? असे विविध प्रश्न रोहित पवार यांना केले. यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीनंतर कोर्टाने संबंधितांना नोटीस बजावत सुनावणी पुढील तारखेपर्यंत तहकूब केली.

## हिमोफिलिया रुग्णांसाठी आरोग्य शिबीर

### नागपूरच्या इंटास फाउंडेशनचा कल्याणकारी उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

इंटास फाउंडेशन आणि लीलाशंकर फाउंडेशन यांच्या सहकार्याने शेगाव, जि. बुलढाणा येथे हिमोफिलिया पेशंट असिस्टन्स प्रोग्राम आयोजन करण्यात आले. यामध्ये फॅक्टर ८ चे वितरण, सेल्फ-इन्फ्यूजन प्रशिक्षण आणि फिजिओथेरपी सत्रांचा समावेश होता.




लीलाशंकर फाउंडेशनचे संस्थापक डॉ. राजकुमार सिरसम यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या अनोख्या उपक्रमाला इंटास फाउंडेशन नागपूरचे प्रकल्प समन्वयक निखिल वैद्य, समुपदेशक कालिदास वडमे, प्रवीणा गेडाम, अकोला हिमोफिलिया सोसायटीचे सचिव शर्मिला सयाम, पारितोष सयाम आणि अनेक हिमोफिलिया रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

बुलढाणा जिल्ह्यात रक्त गोठण्याचे घटक (फॅक्टर) उपलब्ध नसल्यामुळे, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना अनेकदा नागपूर किंवा अमरावतीला जावे लागते. या आव्हानाला तोंड देत, इंटास फाउंडेशनने ६० रुग्णांना मोफत फॅक्टर (५०० आययू) १२० वाईल्स वाटप केले. याव्यतिरिक्त, फिजिओथेरपी व्यायामांचे प्रात्यक्षिक दाखवून स्वयं-इन्फ्यूजन प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. अश्विन दाते यांनी संयोजन केले.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
शुक्रवार, दि. १९, सप्टेंबर २०२५

## जबरीने कार सीज करून मागितली खंडणी

**अकोल्यातून चौघांना अटक, बँक अधिकारीही आरोपी**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** आरबीआयच्या अधिकाऱ्यांना घेऊन जात असलेल्या ट्रॅव्हल्स कंपनीची कार बँकेच्या खासगी सीजर्सनी अकोल्यात सीज केली. पैसे भरल्यानंतरही त्यांनी गाडी परत देण्यास नकार दिला आणि आणखी पैशांची मागणी केली. पोलिसांनी या प्रकरणात ४ आरोपींना अकोल्यातून अटक केली आहे. प्रेमकुमार प्रितमदास लड्डानी (५०) रा. अकोला, प्रमोद रमेश नवलकर (४२), राहुल उर्फ रोशन आनंदा वाकोडे (२१) आणि केशव राजू दही (२८) तिन्ही रा. शेगाव अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. या प्रकरणात पोलिसांनी यस बँकेचा कर्मचारी रोहित खंडेलवाल, वसुली अधिकारी रजनीश द्विवेदी आणि यार्ड मालकालाही आरोपी केले आहे.

फिर्यादी अनिकेत सतीश डवले (३५) रा. राजेंद्रनगर, हिंगणा रोड यांचा सतीश ट्रॅव्हल्स नावाने व्यवसाय आहे. त्यांनी यस बँककडून फायनांसवर दोन वाहन खरेदी केले होते, ज्यांचे दोन हफ्ते थकित होते. गत ७ ऑगस्टच्या दुपारी अनिकेत त्यांच्या चारचाकी वाहन क्र. एमएच-३१/एफसी-५८१२ मधून आरबीआयच्या अधिकाऱ्यांना शासकीय कामाने नागपुरातून अकोला येथे घेऊन जात होते. शेगावमध्ये वरील आरोपींनी त्यांचे वाहन अडविले. सीजिंग कंपनीचा मालक कुणाल चव्हाणसोबत मिळून अनिकेत आणि अधिकाऱ्यांना कारमधून खाली उतरवले. त्यानंतर जबरीने कार हिसकावून घेत यार्डमध्ये उभी केली. अनिकेतने थकित रक्कम भरली आणि वाहन सोडण्याची विनंती केली.

# जीआर मागे घ्या : भुजबळांचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**

मराठा समाजाला आरक्षण जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील ओबीसी समाज नाराज झाला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवली आहे. अनेकवेळा पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर देखील त्यांनी आक्षेप नोंदवला आहे. हा जीआर मागे घ्या, नाहीतर आवश्यक ते बदल करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. आज देखील भाषणात बोलताना छगन भुजबळ यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून टीका केली आहे.



छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजाचा मोठा विजय झाला अशा बातम्या येत आहेत. मीडिया मंडळींनी नीट ऐकून घ्यावे हा जीआर निघाल्यानंतर अनेकांनी आपापल्या पद्धतीने हायकोर्टाकडे धाव घेतली. त्यातल्या काही लोकांनी पीआयएल केले, आम्ही त्यांना सांगितले हे चुकीचे होईल. अनेक वकील जे आहेत त्यांच्याशी आम्ही रात्रंदिवस चर्चा करत आहोत. त्यांनी सांगितले की आपल्याला पीआयएल नाही करायचे रिट करायचे. मग ज्यांनी पीआयएल केले होते त्यांनी विनंती केली की आम्हाला रिट करण्यासाठी मुभा द्यावी. तिथे त्यांचा पीआयएल नाकारला गेला त्यामुळे चुकीचा गैरसमज लोकांमध्ये पसरला.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आतापर्यंत आम्ही चार ते पाच रिट अर्ज केले आहेत. एक केले आहे कुणबी सेनेच्या वतीने, दुसरे केले आहे नाभीक समाजाच्या वतीने, तिसरे माळी समाजाच्या वतीने, चौथे जे आहे समता परिषदेचे आमचे एक अधिकारी आहेत त्यांच्या वतीने केले आहे. असे आमचे 5-6 रिट केलेले आहे. आता त्याची सुनावणी सुरू होईल आणि अतिशय काळजीपूर्वक वकील नेमले आहेत. मला खात्री आहे की निश्चितपणे आपली मागणी आहे एकतर हा जीआर मागे घ्या नाहीतर आवश्यक त्या सुधारणा करा, अशी आपली मागणी आहे. त्यात निश्चितपणे आपल्याला यश मिळणार, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला.

### समता परिषद मेळाव्याचे आयोजन

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनामागे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेते असल्याचा आरोप अनेक वेळा होत आहे. परंतु आता अंतरवली सराटीत झालेल्या आंदोलनाबाबत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेते अन मंत्री छगन भुजबळ यांनी राजकीय क्षेत्रात खळबळ उडवून देणारा दावा केला आहे.

अंतरवली सराटीमध्ये २ सप्टेंबर २०२३ रोजी पोलिसांकडून लाठीहल्ला झाला होता. त्यानंतर मनोज जरांगे निघून गेले होते, परंतु शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांनी त्यांना पुन्हा आणून बसवले, असा दावा भुजबळ यांनी केला आहे. ते नागपुरात समता परिषदेच्या मेळाव्यात बोलत होते.

शुक्रवारी नागपुरात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्याच्या पूर्वसंध्येला येथे समता परिषदेचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ईश्वर बाळबुधे यांनी केले.त्यावेळी उपस्थित मान्यवर महात्मा फुले संस्थेचे अध्यक्ष अरुण पवार ,प्रा.जावेद पासा, अलकाताई कांबळे, माया ईरतकर ,आमदार पंकज भुजबळ, वंजारी समाजाचे नेते सक्षगं मुंढे सह ,बापु भुजबळ, सह विविध संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुचाकीस्वार तरुणांना आपली बसने उडविले

**चाकाखाली येऊन एकाचा मृत्यू, दोघे गंभीर**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** आपली बसच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीस्वार ३ तरुणांना जबर धडक दिली. यात चाकाखाली येऊन एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघे गंभीर जखमी आहेत. अपघाताची ही भीषण घटना गिट्टीखदान ठाण्यांतर्गत सेमिनरी हिल्स परिसरात घडली. यश व्यंकट पौनिकर (२१) रा. लालगंज, मेहंदीबाग रोड असे मृताचे नाव आहे. जखमी हर्ष राजेश मौदेकर (२१) रा. लालगंज आणि अतुल घनश्याम कपाटे (२२) रा. जुनी मंगळवारी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपी बस चालक संतोष शिवराम उईके रा. शिवशक्तीनगर, पारडीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यश, हर्ष आणि अतुल हे तिघेही मित्र होते. तिघेही एमएच-४९/व्ही-८०२५ क्रमांकाच्या दुचाकीवर ट्रीपल सीट बसून टीव्ही टॉवर चौकातून एलएडी चौकाकडे जात होते. त्याच दरम्यान एमएच-४९/बीझेड-२७६२ क्रमांकाची आपली बस एलएडी चौकातून टीव्ही टॉवरकडे जात होती. बसचा चालक संतोष हा भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत होता. एलएडी चौकाजवळच त्याने समोरून येत असलेल्या मोटारसायकलला जबर धडक दिली. बसची गती अत्याधिक असल्याने वेळीच ब्रेक लागला नाही. मोटारसायकलचा पुढचा भाग बसमध्ये अडकल्याने तिघेही बऱ्याच दूरपर्यंत फरफटत गेले. त्याच दरम्यान चाकाखाली आल्याने यशचा मृत्यू झाला, तर हर्ष आणि अतुल हे गंभीर जखमी झाले. आसपासचे नागरिक मदतीला धावले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. गिट्टीखदानचे ठाणेदार कैलाश देशमाने पथकासह घटनास्थळी पोहोचले. तिघांनाही उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना केले. डॉक्टरांनी तपासून यशला मृत घोषित केले. हर्ष आणि अतुल यांची प्रकृतीही चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपी बस चालक संतोषला अटक करून तपास सुरू केला आहे.

## ज्येष्ठ शिक्षकांवर टीईटीची टांगती तलवार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**

शालेय शिक्षण विभागाच्या नियमानुसार फेब्रुवारी 2013 पासून शिक्षक होण्यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टिईटी) अनिवार्य करण्यात आली होती. त्यानुसार नियमाप्रमाणे शिक्षक भरती घेण्यात आल्या. मात्र 2013 पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना ही अट लागू नव्हती. आता सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याच्या संदर्भात निकाल देताना सर्व शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य असल्याचा निर्णय दिला आहे.त्यामुळे ज्येष्ठ शिक्षकांवर टीईटीची टांगती तलवार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी शिक्षकांना केवळ दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. शिवाय ज्या शिक्षकांना निवृत्तीसाठी 5 वर्ष उरली आहेत त्यांना या परीक्षेतून सूट देण्यात आली असली तरी पदोन्नतीसाठी मात्र टीईटी सक्तीची करण्यात आली आहे. दोन वर्षात परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवामुक्तीचा आदेशही देण्यात येणार आहे.या निर्णयामुळे राज्यातील जवळपास 95 हजार शाळांतील दीड ते दोन लाख शिक्षकाना हि परीक्षा द्यावी लागणार आहे. यामुळे शिक्षकांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे. या निर्णयाविरुद्ध राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी अशी शिक्षक संघटनांची मागणी आहे. येत्या 23 नोव्हेंबरला होणारी ही शिक्षक पात्रता परीक्षा अनेक शिक्षक देणार असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या मार्फत ही परीक्षा घेण्यात येत आहे. 15 सप्टेंबर ते 3 ऑक्टोबर या मुदतीत ऑनलाइन अर्ज करावयाचे आहे.

या निर्णयाचा शिक्षक व त्यांच्या कुटुंबावर परिणाम होणार आहे तेव्हा राज्य शासनाने मानवी दृष्टिकोन बाळगून याविरोधात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी अशी शिक्षक संघटनांची मागणी आहे.

बदलत्या अभ्यासक्रमानुसार शिक्षकांना राज्य शासन प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करीतच असते. तेव्हा या शिक्षक पात्रता परीक्षेची अजिबात गरज नाही त्यातही 53 वर्षावरील शिक्षकांना पदोन्नतीसाठी टीईटी द्यावी लागणार आहे. या वयात त्यांची परीक्षा देण्याची मानसिकता राहील का? सरकारने याविरोधात पाऊल उचलले नाही तर शिक्षक संघटना उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करेल.

**परशराम गोडाणे,** मुख्य संघटन सचिव
कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य

## पोलीस उपनिरीक्षकासह दोघांना पोलिस कोठडी

**अपघात दाव्याशी संबंधित कागदपत्रांसाठी घेतली लाच**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** पोलिस खात्यात काही असे कर्मचारी कार्यरत आहेत, ज्यांच्यामुळे पोलिस खाते सतत बदनाम होते. ते हे सुद्धा पाहात नाही की, पीडित कोणत्या पीडेत आहे. हे लोक मृताच्या टाळूवरचे लोणी खाण्यासही मागे-पुढे पाहात नाही. अशा कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांच्या मनात पोलिसांप्रति विश्वास कमी होत चालला आहे. पोलिसांची प्रतीमा धुमील करणारी अशीच एक घटना बुधवारी हुडकेश्वर पोलिस ठाण्यात घडली. अपघात विमा दाव्यासाठी आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी एका पोलिस उपनिरीक्षक व महिला पोलिस हवालदाराने पीडिताला लाच मागितली. मात्र त्यांचा हा लोभ त्यांनाच घेऊन बुडाला. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दोघांनाही लाचेसह रंगेहात पकडले. दोघांनाही गुरूवारी एसीबीच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. आकाश पिराजी साकोरे (२८) रा. ओमकारनगर आणि शारदा सदाशिव भेरे-आलोटकर (४०) रा. संत गजानननगर, पिपळा रोड अशी लाचखोर पोलिसांची नावे आहेत.

तक्रारदार हे वकील असून त्यांच्या पक्षकाराच्या वडिलांचे अपघातात मृत्यू झाला होता. त्यांना मोटर वाहन अपघात दावा प्राधिकरण येथे दावा करण्याकरिता आवश्यक संबंधित कागदपत्रांची आवश्यकता होती. ते कागदपत्रांसाठी ठाण्यात गेले असता वरील आरोपींनी कागदपत्र उपलब्ध करण्यासाठी ८ हजार रूपयांची मागणी केली. त्यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. पथकाने तक्रारीची खात्री करून सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदार हुडकेश्वर ठाण्यात पोहोचले. उपनिरीक्षक साकोरे आणि हवालदार शारदा यांनी ठाण्यातच तक्रारदाराकडून ८ हजारांची लाच स्वीकारली. दबा धरून बसलेल्या पथकाने दोघांनाही रंगेहात पकडले. त्यांच्याकडून लाचरक्कम जप्त केली.

सामान्यतः शासकीय कार्यालयांमध्ये सुविधेनुसार काम करून देण्यासाठी कर्मचारी चहा-पाण्याचा खर्च मागतात. मात्र येथे एक पीडिताने त्याच्या वडिलांना गमावले होते. त्याच्यावर आधीच दुःखाचा डोंगर कोसळला असताना वरील आरोपींनी केवळ कागदपत्र देण्यासाठी पैशांची मागणी करणे हे संतापदायक आहे. कुटुंबाने वकिलामार्फत भरपाईसाठी कागदपत्रांची मागणी केली होती. साकोरे आणि शारदा एसीबीच्या जाळ्यात अडकले. गुरूवारी तपास अधिकाऱ्याने दोघांनाही एसीबीच्या विशेष न्यायालयात हजर केले. न्यायालयाने दोघांनाही एक दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली. या दरम्यान हुडकेश्वरचे ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर यांची बदली झाल्याने संपूर्ण विभागात चर्चा आहे की, त्या दोघांच्या कृत्याची शिक्षा भेदोडकर यांना मिळाली. जेव्हाकी, भेदोडकर हे प्रामाणिक अधिकारी म्हणून विभागात ओळखले जातात.

## बेदम मारहाण करून दारूड्या भावाची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** भावांनी मिळून दारूड्या धाकट्या भावाची बेदम मारहाण करून हत्या केली. यात आई आणि वहिनीनेही त्यांना साथ दिली. त्यानंतर बाथरूममध्ये पडून जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा देखावा करीत हे पाप लपविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून नव्याने तपास सुरू केला असून आरोपी भाऊ आणि वहिनीला अटक केली आहे. कुटुंबातील इतर सदस्यांची चौकशी केली जात आहे. सुधीर पंढरीनाथ खंडारे (४०) रा. इरोज सोसायटी, शिवनगर असे मृताचे नाव आहे. आरोपींमध्ये सुधीरचा मोठा भाऊ योगेश खंडारे (५६), राजेश खंडारे (४३), रुपा योगेश खंडारे (५२) आणि आई कौशल्या खंडारे (७०)चा समावेश आहे.

गत २ सप्टेंबरच्या सकाळी सुधीर घरच्या बाथरूममध्ये जखमी अवस्थेत आढळला होता. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. चौकशीदरम्यान कुटुंबीयांनी रात्रीला बाथरूममध्ये पडला असेल. नळावर आदळल्याने डोक्याला गंभीर मार लागून त्याचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. मानकापूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. शवविच्छेदन अहवालात डॉक्टरने, डोक्यावर काहीतरी जड वस्तूचा सतत प्रहार झाल्याने सुधीरचा मृत्यू झाला. पोलिसांनी कुटुंबीयांची चौकशी सुरू केली. प्रत्येकाने माहिती नसल्याचेच सांगितले. पोलिसांनी शेजाऱ्यांकडे विचारपूस केली असता माहिती मिळाली की, सुधीरला दारूचे व्यसन होते. तो कुठलाही कामधंदा करीत नव्हता. योगेशवरच संपूर्ण कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी होती.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना
## सेवा पर्वात महावितरणतर्फे विशेष अभियान

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस 17 सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती 2 ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वात महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. वीज ग्राहकांनी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा पर्वातील उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वीज ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या या योजनेला प्राधान्य देण्यास त्यांनी सांगितले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. 13 फेब्रुवारी 2024 रोजी सुरू केली आहे. सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळवे यासाठी ही योजना आहे. या योजनेमध्ये छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी वीज ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला साठ हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला 78 हजार रुपये अनुदान मिळते. हाउसिंग सोसायट्यांनाही 500 किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट 18 हजार रुपये अनुदान मिळते.

एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिना अंदाजे १२० युनिट वीजनिर्मिती होते. वीज ग्राहकाच्या गरजेपेक्षा अधिक वीज सौर ऊर्जा प्रकल्पातून तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळविता येते. राज्यात महावितरणच्या 2,84, 245वीज ग्राहकांना योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांनी बसविलेल्या सौर वीजनिर्मिती प्रकल्पांची एकूण क्षमता 1087.36 मेगावॅट झाली आहे. यामध्ये नागपूर जिल्हा अव्वल स्थानी आहे. नागपूरमध्ये 43,910 ग्राहकांनी सौर पॅनल बसवून 171.83 मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता साध्य केली आहे. नागपूरप्रमाणेच वर्धा जिल्ह्यातही 8,559 ग्राहकांनी आपल्या छतावर एकूण 30.36 मेगावॅट वीज निर्मिती क्षमता असलेले सौर पॅनल लावले आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी वीज ग्राहकांनी या वेबसाईटवर घरबसल्या ऑनलाईन नोंदणी करावी. वीज ग्राहकांना आपल्या पसंतीचा पुरवठादार निवडता येतो. महावितरणने योजनेचा लाभ घेण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. सेवा पर्वात योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणच्या सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आल्या असून या योजनेसाठीच्या अर्जांना प्राधान्य देण्यास सांगण्यात आले आहे. महावितरणच्या जवळच्या कार्यालयातही या योजनेबद्दल चौकशी करता येईल

# राज्य महिला आयोग विवाहपूर्व समुपदेशन केंद्रासाठी अग्रक्रमाने काम करणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** **लग्नसंस्था ही आपल्या भारतीय समाजाचा पाया आहे. ती टिकवण्यासाठी घटस्फोटांच्या वाढत्या प्रमाणावर गंभीरपणे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे लग्नानंतर वाद झाल्यास होणाऱ्या समुपदेशनाबरोबरच लग्नाच्याआधी, तरुण वर्गाचे विवाहपूर्व समुपदेशन यावर भर देणे आवश्यक आहे. येत्या काळात राज्य महिला आयोग विवाहपूर्व समुपदेशन केंद्राबाबत अग्रक्रमाने काम करणार असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज येथे सांगितले.**

राज्य महिला आयोगाच्या वतीने महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत महिलांच्या समस्या व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव ॲड. प्रवीण उन्हाळे, महिला व बालविकास विभागीय उपायुक्त दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे यांच्यासह संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, समुपदेशक, तक्रारदार, पॅनलमध्ये समाविष्ट विधीतज्ञ, पोलीस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य महिला आयोगाचे मुख्यालय मुंबईत आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातल्या महिलांना आर्थिक, सामाजिक तसेच विविध कारणांमुळे मुंबईत येणे शक्य होत नाही. तेव्हा त्यांच्या तक्रारी ऐकण्यासाठी, मदत करण्यासाठी आयोगच जिल्हास्तरावर जात असतो. जिल्हास्तरावरच महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यात महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जनसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे. जनसुनावणीमुळे वेळ वाचून खर्चाची बचत होण्यासोबतच



महिलांवर होणा-या अन्याय व अत्याचाराला न्याय मिळेल, असे आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यावेळी म्हणाल्या.

महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत गडचिरोलीपासून जनसुनावणीला सुरुवात करण्यात आली. गेल्या चार वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात अनेकदा सुनावणी घेण्यात आल्या आहेत. केंद्र आणि राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक चांगले कायदे तयार केले आहेत. महिलांना भक्कमपणे साथ देत देण्याची तसेच महिलांवर होणा-या अन्याय व अत्याचाराला न्याय देण्याची आयोगाची भूमिका आहे. यात महिलांचाही सहभाग महत्वाचा असल्याचे आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यावेळी म्हणाल्या.

आज आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणीदरम्यान एकूण 68 तक्रारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदवण्यात आल्या. ज्यामध्ये कौटुंबिक स्वरुपाच्या तक्रारींचे प्रमाण सर्वाधिक होते. महिलांच्या तक्रारी निवारणाकरीता आयोजित जनसुनावणीसाठी चार पॅनल तयार करण्यात आले होते. पहिल्या पॅनलमध्ये आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पोलिस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, नागपूर

### महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांद्वारे अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न : रुपाली चाकणकर

महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव ॲड. प्रवीण उन्हाळे, पोलिस उपायुक्त राहुल माकणीकर यांचा समावेश होता. अन्य पॅनलमध्ये विधीज्ञ, पोलिस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी महिला व मुलांच्या सहाय्य कक्षाचे समुपदेशक तसेच अन्य अधिकारी, सदस्यांचा समावेश होता. या पॅनलने महिलांच्या समस्या जाणून घेतल्या. ज्या तक्रारींवर आजच कार्यवाही पूर्ण झाली नाही त्यांना योग्य त्या संबंधित यंत्रणांकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली असून त्याबाबत आयोग आढावा घेणार आहेत.

आयोगाच्या या जनसुनावणीस जिल्ह्यातील महिलांनी उपस्थिती दर्शवित चांगला प्रतिसाद दिला. बाहेरून आलेल्या प्रत्येक महिलेस सुरुवातीस कक्षाच्या बाहेर लावण्यात आलेल्या नोंदणी टेबलवरून टोकन नंबर देण्यात आले. त्यानंतर देण्यात आलेल्या पॅनलसमोर उपस्थित राहून महिलांनी आपल्या लेखी तक्रारी, समस्या सादर केल्या. प्रत्येक महिलेचे म्हणणे पॅनल सदस्यांनी आत्मियतेने ऐकून घेतले व त्यावर कार्यवाही केली.

**जनसुनावनीत महिलांच्या ६८ तक्रारी**

जनसुनावनीत एकूण 68 तक्रारी दाखल झाल्या. त्यात वैवाहिक व कौटुंबिक स्वरुपाच्या 37 तक्रारींचा समावेश आहे. तसेच सामाजिक स्वरुपाच्या 14, आर्थिक आणि मालमत्ता विषयक 7, कामाच्या ठिकाणी महिलांना होणारा त्रास 8 व इतर स्वरुपाच्या २ तक्रारींचा समावेश आहे. सर्वांची आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि पॅनेलच्या सदस्यांनी आस्थेने विचारपूस केली.

**जनसुनावणीसाठी चार पॅनेल**

महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता आयोजित जनसुनावणीसाठी चार पॅनल तयार करण्यात आले होते. या पॅनलमध्ये विधी तज्ञ, पोलीस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी, महिला व मुलांच्या सहाय्य कक्षाचे समुपदेशक तसेच अन्य अधिकारी, सदस्यांचा समावेश होता.

## कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल

**खड्डयात पडून तरुणाचा मृत्यू प्रकरण**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** डीप्टी सिग्नल परिसरात निर्माणाधिन उड्डाणपुलाच्या खड्डयांमुळे महेंद्र संतकुमार फटिंग (२०) रा. डीप्टी सिग्नल हा तरुण अपघाताला बळी पडला. खड्डयात पडल्याने त्याचा मृत्यू झाला. या घटनेवरून परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र रोष पसरला. मंगळवारी रात्रीच लोकांनी संताप व्यक्त करीत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यानंतर बुधवारी लकडगंज ठाण्याचा घेराव करण्यात आला. पोलिसांनी बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविला आहे. मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरात ठिक-ठिकाणी पाणी भरले होते. डीप्टी सिग्नल परिसरात उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे झाले आहेत. पावसामुळे ते खड्डे पाण्याने तुंबले होते. रात्री ८ वाजताच्या सुमारास महेंद्र मोटारसायकलने कामावरून घरी जात होता. रस्त्यावर सर्व पाणी असल्याने त्याला खड्डयाचा अंदाज आला नाही. एक खड्डयात त्याची मोटारसायकल उसळून तो खाली पडला. या घटनेवरून कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांमध्येही तीव्ररोष पसरला.

# भारतीय ज्ञान भारतीय पद्धतीने देणे आवश्यक : डॉ. प्रशांत बोकारे

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १८

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वर्धापन दिन समारोह दि.१८ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. विश्वविद्यालयाच्या स्थापनेला २८ वर्षे पूर्ण होवून २९ व्या वर्षात विश्वविद्यालयाने पदार्पण केले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी भूषविले. वर्धापन दिनाला प्रमुख अतिथी या नात्याने गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे उपस्थित होते. सर्व सन्मान्य अधिष्ठाता व सवैधानिक अधिकारी यांच्यासह रामटेक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती आणि कुलसचिव डॉ. देवानंद शुक्ल यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला डॉ. नीरज खटी, कुलसचिव, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान संस्था आणि सौ. विद्या बोकारे यांची विशेष उपस्थिती होती.

मुख्य कार्यक्रमापूर्वी भारतीय ध्वज आणि विश्वविद्यालयीन ध्वज फडकवण्यात आला. यानंतर मुख्य कार्यक्रमाचा प्रारंभ महाराष्ट्र आणि विश्वविद्यालयीन गीताने झाला.



संस्कृत तथा संस्कृतेतर संकायाच्या अधिष्ठाता प्रो. कविता होले यांनी प्रास्ताविकात विश्वविद्यालयाच्या २८ वर्षांच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण घडामोडींचा आढावा घेतला.

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती संकायाच्या अधिष्ठाता प्रो. कलापिनी अगस्ती यांनी २०२४-२५ चा विश्वविद्यालयाचा प्रगती अहवाल सादर केला.

डॉ. कीर्ती सदार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. मुख्य अतिथी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी आपल्या विचारशील अभ्यासपूर्ण व उत्स्फूर्त भाषणात भारतीय ज्ञान भारतीय पद्धतीने दिले पाहिजे यावर भर दिला. विश्वविद्यालयाच्या २८ वर्षांच्या कालावधीत नेत्रदीपक प्रगती केली असून यासाठी मी सर्वांचे अभिनंदन करतो. शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण ही संकल्पना समजावून सांगताना डॉ. बोकारे म्हणाले, पाश्चात्य देशात जे ज्ञान उपलब्ध आहे तेच जर आपण दिले तर पाश्चात्य देशातील लोक आपल्याकडे शिकायला का येतील? जीवन कसे जगावे? ऐश्वर्यसंपन्न कसे व्हावे हे भारतात शिकायला मिळत होते. औषधीविज्ञान, शल्यक्रिया, अर्थशास्त्र हे खरे भारतीय ज्ञान आहे. हेच भारतीय ज्ञान भारतीय पद्धतीने देणे म्हणजे आपले शिक्षण आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचवणे होय. पाश्चात्य देश भारताकडे आकर्षित होते कारण त्यांना येथील ज्ञानसमृद्धी समजली होती. नालंदा विश्वविद्यालयातील एका वैद्याने अल्लाउद्दिन खिलजीचा आजार बरा केल्यावर त्याने इतके उच्च ज्ञान जेथे आहे ते नालंदा विद्यापीठच जाळून टाकले, नष्ट केले हा आपला इतिहास आहे. म्हणून आपली ताकद आपल्याकडे संस्कृत मध्ये असलेले प्राचीन ज्ञान असून ही ज्ञान आपली शक्ती आहे. याचा उपयोग हा भारतातील ज्ञान भारतीय पद्धतीने शिकवून केला पाहिजे आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाने ती संधी उपलब्ध करून दिली आहे.

### छात्र, कर्मयोगी आणि प्राध्यापक सन्मान सोहळा

विश्वविद्यालयाच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रथम येणा-या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येतील. तसेच उत्तम कामगिरी करणा-या प्राध्यापक व कर्मयोगी प्राध्यापक यांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. संस्कृतमहोत्सवातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांनाही पारितोषिके प्रदान करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. अतुल वैद्य म्हणाले, विद्यापीठ पायाभूत सुविधा, शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रगती, प्रकाशन, संशोधन प्रकल्प, समाजोन्मुख कार्यक्रम या सर्व बाबतीत अग्रेसर असल्याने विद्यापीठाची प्रतिमा, पोहोच आणि प्रतिनिधित्व प्रशंसनीय आहे. भारताकडे जग आकृष्ट झाले ते येथील ज्ञान, विज्ञान आणि समृद्धीमुळे वास्को द गामा, कोलंबस किंवा ब्रिटीश यांना येथील ज्ञानसमृद्धीने आकर्षित केले, संपत्ती समृद्धीने भुरळ घातली. भारतीय ज्ञानपरंपरेने ज्ञान हे मुक्तहस्ते दिल्याने वाढते असे मानले. त्यामुळे आपण कधीही कोणत्याही ज्ञान-संशोधनाचे पेटंट घेतले नाही. कारण आपण ज्ञानाचे व्यावसायीकीकरण केले नाही. आपण पाश्चात्त्यांप्रमाणे उद्योग किंवा कारखाने सुरू केले नाहीत. परंतु आता नवीन युगात आपल्याला आपल्या संस्कृतमधील ज्ञान आधुनिक युगातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला यांच्याशी जोडून सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेत आणले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मुख्य भर हा भारतीय ज्ञान परंपरा आधारित शिक्षण देण्यावर आहेत. रसायनशास्त्र, जैवविज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी सारखे विषय सामान्यजनांना समजेल अशा भाषेत पुस्तके तयार करण्याची जबाबदारी संस्कृत विद्यापीठाने घ्यावी असे मला वाटते. यामुळे विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त होईल. संस्कृत जनभाषा नसल्याने आधुनिक विज्ञान आणि भारतीय विज्ञान यामध्ये दरी निर्माण झाली असून, सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत आता विज्ञान, तंत्रज्ञान, शास्त्रे या विषयांवरील पुस्तके लिहिली गेली पाहिजे. आपल्या प्राचीन ज्ञानाचा हा वारसा जोपाने पुढे नेण्याची गरज आहे. संस्कृत भाषेचा प्रचार-प्रसार भारतीय ज्ञान परंपरा व आधुनिक विज्ञानाशी सांगड घालून करावा असे आवाहनही याप्रसंगी मा. कुलगुरू महोदयांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुमित कठाळे, सहायक कुलसचिव यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. देवानंद शुक्ल यांनी मानले.

## उत्तर नागपुरच्या इंदोरा प्रभागातील बस सेवेसाठी निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

उत्तर नागपुरातील प्रभाग क्रमांक ७ (इंदोरा) अंतर्गत लष्करीबाग, मोतीबाग, नवनकाशा, किदवाई ग्राउंड, भानखेडा, बारसे नगर, खलाशी लाईन, गड्डीगोदाम, बेझनबाग, नागसेन नगर, सुगत नगर, पंचशील नगर आणि आजूबाजूच्या वसाहतींमधील रहिवाशांच्या वाहतुकीच्या सुविधेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या भागातील नागरिकांना ड्रॅगन टेम्पल कामठी, नागलोक आणि दीक्षाभूमी येथे जाण्यासाठी सोयीस्कर बस सेवा उपलब्ध होण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. न्यू इंदोरा मैदान येथे बस सेवा सुरु करण्यासाठी नागरिकांनी नागपुर महानगर पालिका परिवहन प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे यांना निवेदन दिले आहे. विशेषतः धम्मचक्रपरिवर्तन दिनानिमित्त सर्व बौद्ध अनुयायांना दीक्षाभूमीला जाण्यास आणि परत येण्यास सुविधा व्हावी, उत्तर नागपूर विधानसभा अध्यक्ष माया उके व उत्तर नागपूर विधानसभा बसपा महासचिव सुबोध साखरे यांच्या हस्ते निवेदन दिले गेले. यावेळी राहुल मेश्राम, अतुल धमगाये, विशाल बोदेले, अर्पित मनोहर, आणि अमर गौरखेडे हे नागरिक उपस्थित होते.परिवहन अधिकारी योगेश लुंगे यांनी या मागणीबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून, येत्या काळात या सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक ती सोय करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# नागपूर विभागाने सफाई मित्र सुरक्षा उपक्रम राबविला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात स्वच्छता ही सेवा - 2025 अभियानांतर्गत 18 सप्टेंबर 2025 रोजी दुसऱ्या दिवशी सफाई मित्रांच्या आरोग्य, सुरक्षा व कल्याणावर विशेष लक्ष केंद्रीत करत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रेल्वे परिसराजवळ स्वच्छता व स्वच्छ वातावरण टिकवून ठेवण्यासाठी सफाई मित्रांचे अमूल्य योगदान लक्षात घेऊन विभागाने स्थानके, वसाहती व अन्य युनिट्समध्ये हे उपक्रम पार पाडले.

या निमित्ताने विशेष सफाई मित्र सुरक्षा शिबिरे आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये आरोग्य तपासणी, सल्ला व जनजागृती सत्रे घेण्यात आली. या शिबिरांमधून सफाई मित्रांना आवश्यक वैद्यकीय सुविधा व मदत पुरविण्यात आली. तसेच सफाई मित्रांना वैयक्तिक सुरक्षा उपकरणे (पीपीई) व सुरक्षा साहित्य वितरित करण्यात आले. यात हातमोजे, मास्क, सुरक्षा बूट तसेच इतर सुरक्षात्मक साहित्याचा समावेश होता.

ज्यामुळे काम करताना संभाव्य धोके कमी होतील व सुरक्षित कार्यपरिसर निर्माण होईल. या उपक्रमाद्वारे नागपूर विभागाने स्वच्छतेबरोबरच आपल्या कार्यबलाच्या सन्मान, आरोग्य व सुरक्षेबाबतची वचनबद्धता पुनर्स्थापित केली.

# वाडी मंडळाचा उपक्रमशील मोदी जन्मोत्सव ७५ बाटल्या रक्तदानाने मोदींना वाढदिवसाची मानवंदना

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा जन्मदिवस भाजपा वाडी मंडळाच्या वतीने उत्साहात व विविध सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता छत्रपती शाहू महाराज उद्यानात स्वच्छता अभियानाने करण्यात आली. त्यानंतर सुरक्षा नगर येथील दुर्गा माता मंदिर समिती सदस्य, गजानन सोसायटीतील गजानन मंदिर समिती सदस्य व विठ्ठल वाडीतील हनुमान मंदिरातील समिती सदस्य यांचे तुळशीचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. मंगलधाम सोसायटीतील हनुमान मंदिरात आंगनवाडीतील बालकांना मिठाईचे वाटप करण्यात आले.



यावेळी एसडीपीएल वाडी येथे ७५ जणांनी ७५ बाटल्या रक्तदान करून पंतप्रधानांचा ७५ वा वाढदिवस साजरा केला. हा रक्तदान शिबिर मेघा ब्लड डोनेशन ड्राईव्ह नागपूर यांच्या वतीने दिनेश मंत्री, हेमंत जैन, विनोद मालु, संजय जैन, सौरभ जैन, प्रतीक जैन व पवन जैन यांच्या सहकार्याने घेण्यात आला.

यावेळी राज्य परिषद सदस्य नरेश चरडे, माजी उपसरपंच आनंदबाबू कदम, जिल्हा उपाध्यक्षा सरीता यादव, केशव बांदरे, वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री ईशांत राऊत, राकेश मिश्रा, महिला आघाडी मंडळ अध्यक्षा कल्पना सगदेव, महिला ओबीसी आघाडी अध्यक्षा ज्योती भोरकर, मंडळ महामंत्री योगेश शेंडे,विशाल डोंगरे ,लक्ष्मीनारायण केसरवानी, सुधीर सिंह राणा, ज्ञानेश्वर गावंडे, दत्ता बाबर, लिलाधर भोयर, विनोद सदार, शंकर कडू, मंगला पडोळे, आभा पांडे, वर्षा शिंगरू, उर्मिला चौरसिया, आशा गौतम, लक्ष्मी बैस, सुधा पवार, पोर्निमा बंडावार, पिंकी करण, अंजली कुलकर्णी, सुरेखा बोंदरे, दीपा डागे, इंद्रायनी फटिंग, माधुरी थेटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मढी मंदिरात हवन पूजन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होणार

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १८

कामठी शहरापासुन घोरपड कडे जाणाऱ्या मार्गावरील प्राचीन दुर्गा देवीचे जागृत मंदिर असल्याची चर्चा आहे. वरील मंदिर मढी मंदिर नावाने ओळखले जाते. या देवी मंदिरात वर्षातुन दोनवेळा नवरात्र उत्सव मोठ्या धुम धडाक्याने भाविक लोक करीत असतात. यावर्षी २०८२ आश्विन शुक्ल प्रतिपदा सोमवार दिनांक २२-९-२०२५ ला घट स्थापना कार्यक्रम होणार आहे. त्याचप्रमाणे मंगळवार ३० सप्टेंबर २०२५ तसेच बुधवार दिनांक १ ऑक्टोबर २०२५ ला माँ दुर्गा हवन कार्यक्रम कार्यक्रम होईल. दुर्गा माता शोभा यात्रा आणि विसर्जन सोमवारी दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ यानंतर पुणार्हुती व कन्या पूजन नंतर प्रसाद वितरण होणार आहे. अशा कार्यक्रमा बाबत श्री. ईश्वरचंद शिवरामप्रसाद चौधरी, सदन यादव व धार्मिक भाविकांनी माहिती दिली आहे.

# इंदिरा गांधी महाविद्यालयात बँकींग तथा स्पर्धा परीक्षाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १८

इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वरमध्ये आज बँकींग, रेल्वे सेक्टर व स्पर्धा परीक्षाबाबत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संतोष बुध्येवार, मुख्य व्यवस्थापक स्पेक्ट्राम अकादमी, नागपूर व संदीप वाघमारे लोखंडे मार्केटिंग प्रमुख हे मुख्य वक्त म्हणून, प्राचार्य डॉ राजेंद्र कांबळे अध्यक्ष म्हणून मंचावर विराजमान होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. बुध्ये वार यांनी स्पर्धा परीक्षेत सहभागी होण्यासाठी कशाप्रकारे तयारी करावी लागते व ही परिक्षा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनापासून अभ्यासात स्वतःला झोकून देऊन शासकीय सेवेत संधी प्राप्त करता येईल. पदवी प्राप्त करुन न थांबता आपले आयुष्य उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकींग तथा नोकरीविषयक परिक्षाची कास धरावी असे कळकळीची भावना त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून केली. यावेळी डॉ. कांबळे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजक प्रा.मलिक परवेज यांनीं मार्गदर्शन कार्यक्रमाची रुपरेषा यावेळी विशद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.उमाकांत बल्ले यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.निधी गुप्ता यांनी तर आभार प्रा. नितीन पटे यांनी मानले.

कार्यक्रमात डा.मंजूषा ढोबळे, रोशन भगत, प्रा.हेमंत बागडे, संजय रामटेके, महेश देवघरे, चेतन ठवरे, प्रा.किशोर दुर्गे, मंजुषा कापसे आदि प्राध्यापक सहभागी झाले होते.

# भाजपा सुरेंद्रगढ मंडळाने केला मोदींचा वाढदिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

राष्ट्रनेता ते राष्ट्रपीता या पंधरवडा मधे विविध कार्यक्रमांचे आयोजन भाजपा नागपुर शहराच्या वतीने केले आहे. याच अंतर्गत आज पश्चिम नागपुर सुरेंद्रगढ मंडळाच्या वतीने 17 ला गीट्टीखदान चौकात येथे स्वच्छता अभियान राबवून नेहमी स्वच्छतेचा मूलमंत्र देणारे,आधुनिक भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चा वाढदिवस या निमित्ताने साजरा करण्यात आला,या पंधरवडा कार्यक्रमाचे संयोजक तथा मंडळ महामंत्री धनराज तेलंग, तथा या अभियानाचे संयोजक सतिश वडे, सहसंयोजक सचिन पाली व शुभेंद्र सिंग होते.



यावेळी प्रामुख्याने मंडळ अध्यक्ष विनोद बघेल, आसीफ खान, शहर उपाध्यक्ष विनोद कन्हेरे, नरेश बरडे, माजी नगरसेवक विक्रम ग्वालबंसी, प्रमोद कौरती, साधना बरडे, राजेश्वर सिंह, गिरिश ग्वालबसी, रमेश काळमेघ, प्रशांत कूमरे, सुचित्रा नशिने, प्रकाश वर्मा,गोपाल बावनकुळे, विनित शर्मा, कमलेश पांडे, संगीता पाटिल,मंदा चौधरी, आरती मंगकलर, प्रभा वानखेडे, शोभा पेंडलवार, पप्पू समसेरिया, शत्रुहन तिवारी, सुरेश कोंगे, मनीश महले, अनुपमा सायरे, राखी शिगारे, राजश्री विश्वास, भारती माळवे, मारुती हेलूडे, नरेंद्र ठाकुर, दिपक शेवारे, साहेबराव कुहिके व असंख्य पदाधिकारी उपस्थित होते

# काँग्रेस पक्षाचा निषेध कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८

पूर्व नागपूर परिसरातील हसनबाग चौक येथे नागपूर शहर काँग्रेस कमिटी ब्लॉक क्रमांक १ तर्फे भारताचे पंतप्रधान यांचा निषेधात्मक वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी रखडलेल्या रस्त्याचे कामे आणि ऐन रोडवर असलेल्या जीवघेण्या खड्ड्याविरोधात निषेध करण्यात आला. डिप्टी सिग्नल येथील रोड वरच्या खड्ड्यात पडून महेंद्र फॉटिंग नावाच्या युवकाचा मृत्यू झाला. यावेळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शहराचे प्रतिनिधी नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे महासचिव मुकेश गजभिये, सामाजिक कार्यकर्ते प्रविण बेलेकर, नागपूर शहर शांतता कमिटीचे सदस्य शेख मुजीब वारसी, मनीष वानखेडे, पूर्व नागपूर काँग्रेस ओबीसी विभाग कार्याध्यक्ष पंकज चापले, नितीन रामटेककर,राजेश उकुंडे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जिचकार, शुभम गजघाटे, काळू भाई, राकीम भाई व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# डोंगरगढ नवरात्री यात्रेसाठी रेल्वेची विशेष तयारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाच्या विभागीय सभागृहात पत्रकार परिषद विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता आणि वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली उपस्थित अधिकारी आणि पत्रकारांशी चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये प्रामुख्याने डोंगरगड नवरात्र मेळव्यादरम्यान प्रवाशांची सोय आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, दक्षिण मेळ्याच्या काळात गर्दीचें व्यवस्थापन आणि सेवा राखण्यासाठी पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभागाने व्यापक तयारी केली आहे.

सुरळीत वाहतूक सुरू ठेवण्यासाठी, दक्षिण बाजूला ६ आणि उत्तरेकडे २ अतिरिक्त तिकीट काउंटर तसेच ३ एटीएम मशीन (दक्षिण) आणि १ एटीव्हीएम मशीन (उत्तर) उपलब्ध असेल. ५ मोबाईल यूटीएस युनिट्स परिसंचरण क्षेत्र आणि प्रवासी इंटरफेसवर तैनात केले जातील. सध्याच्या १० तिकीट तपासणी कर्मचा?यांव्यतिरिक्त, प्लॅटफॉर्म कर्तव्ये, प्रवाशांना मदत आणि इतर कामांसाठी १६ अतिरिक्त कर्मचारी तैनात केले जातील.

तिकीटविना प्रवास रोखण्यासाठी अतिरिक्त आरपीएफ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि गर्दीचें व्यवस्थापन करण्यासाठी अतिरिक्त आरपीएफ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

आणि नागरी संरक्षण कर्मचारी तैनात केले जातील, तर स्काउट्स आणि गाईड्समध्ये "मे आय हेल्प यू" बूथ आणि अतिरिक्त चौकशी काउंटर असतील. दुचाकी पार्किंग क्षेत्र २४७ प्रतीक्षा क्षेत्र म्हणून वापरले जाईल. रुग्णवाहिका सेवा उपलब्ध असेल आणि स्टेशनची स्वच्छता राखण्यासाठी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. विशेष 'पूजा समाग्री' किओस्क देखील उभारले जातील.




मेळ्याच्या काळात अनेक गाड्यांना तात्पुरते थांबे देण्यात आले आहेत, ज्यात २०८४३/४४ बिलासपूर-भगत की कोठी यांचा समावेश आहे. २०८४५/४६ बिलासपूर-बिकानेर, १२८५१/५२ बिलासपूर-चेन्नई, १२८४९/५० बिलासपूर-पुणे आणि १२७७१/७२ रायपूर-सिकंदराबाद एक्स्प्रेसमध्ये दुर्ग-गोंदिया-दुर्ग पॅसेंजर रायपूरपर्यंत विस्तारित आणि रायपूर-डोंगरगड-रायपूर मेमो गोंदियापर्यंत विस्तारित आहे. डोंगरगड-दुर्ग-डोंगरगड दरम्यान एक अतिरिक्त विशेष ट्रेन देखील चालवली जाईल. याव्यतिरिक्त, नागपूर, रायपूर आणि गोंदिया-पाटणा, इतवारी-शालीमार, दुर्ग-निजामुद्दीन, दुर्ग-पाटणा, यांसारख्या बिलासपूर विभागातील अनेक पूजा विशेष गाड्या. बिलासपूर-येल्हांका इत्यादी. पेंच व्हॅली एक्सप्रेस आणि बैतुल-छिंदवाडा-सिवनी पॅसेंजर नागपूर विभागातून नैनपूरपर्यंत वाढवल्या जातील. चेन्नई-गया एक्सप्रेसचा थांबा नागभीड येथे आहे आणि चेन्नई-बिलासपूर एक्सप्रेसचा थांबा मुलमरोडा येथे आहे. राहील. प्रवाशांसाठी अमृत स्टेशन योजनेअंतर्गत, वडसा (किंमत २०.४४ कोटी), नैनपूर (१७.८६ कोटी) आणि

मांडला किल्ला (१३.५५ कोटी) आधुनिक दर्शनी भाग, बागा आणि लँडस्केपिंग, उच्च दर्जाचें प्रतीक्षालय, सीसीटीव्ही, हाय मास्ट लाईट्स, १२ मीटर रुंद फूट-ओव्हर ब्रिज, चांगले वाहतूक परिसंचरण आणि लिफ्ट्स यासारख्या सुविधांचा विकास. यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, विभागीय व्यवस्थापकांनी स्वच्छता ही सेवा पखवाडा आयोजित केला जात असल्याची माहिती दिली.

# एचएसआर लेआउटमध्ये सकरा वर्ल्ड हॉस्पिटल आणि आयकेओसीची संयुक्त पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

भारतातील पहिले १००% एफडीआयवर आधारित रुग्णालय सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, बेंगळुरू यांनी इंटरनॅशनल नी अँड ऑर्थोपेडिक सेंटर (आयकेओसी) च्या सहकार्याने एचएसआर लेआउट, बेंगळुरू येथे ५० खाटांचे अत्याधुनिक मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू केले आहे. या कार्यक्रमाला कर्नाटक सरकारचे मोठे व मध्यम उद्योग तसेच पायाभूत सुविधा विकासमंत्री एम. बी. पाटील मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## ५० खाटांचे अत्याधुनिक आरोग्य केंद्र सुरू

या नव्या आरोग्य केंद्रात ऑर्थोपेडिक्स, ऑर्थोस्पाईन, जनरल सर्जरी, कार्डिअॅक सर्जरी, युरोलॉजी, प्लॅस्टिक सर्जरी आणि न्यूरोसर्जरी अशा अनेक शाखांमध्ये तज्ज्ञ सेवा उपलब्ध होणार आहेत. रुग्ण-केंद्रित सेवा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नैदानिक उत्कृष्टता यांचा संगम घडवून ही पुढाकार आरोग्य सेवांमध्ये नवीन उंची निर्माण करणार आहे.

एम. बी. पाटील, मंत्री झ मोठे व मध्यम उद्योग आणि पायाभूत सुविधा विकास, कर्नाटक सरकार म्हणालेः सकरा वर्ल्ड हॉस्पिटल आणि डॉ. चंद्रशेखर यांचे या नव्या आरोग्य केंद्रासाठी मनःपूर्वक अभिनंदन. हे अत्याधुनिक संस्थान जागतिक दर्जाच्या सांधेदुखी व मणक्याच्या आजारांच्या उपचारामध्ये क्रांतिकारी ठरणार आहे. निरोगी नागरिक हेच मजबूत कुटुंब आणि समृद्ध समाजाचे आधारस्तंभ आहेत.

डॉ. चंद्रशेखर पी, संचालक - ऑर्थोपेडिक्स, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल आणि चेअरमन, आयकेओसी म्हणालेः सकरा वर्ल्ड हॉस्पिटलसोबतची ही भागीदारी दोन प्रतिष्ठित संस्थांची ताकद एकत्र आणते आणि एकाच छताखाली व्यापक व उच्च दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देते. हे रुग्णालय एचएसआर लेआउट व परिसरातील वाढत्या आरोग्य गरजांना पूर्ण करण्यास सज्ज आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, अनुभवी डॉक्टरांची टीम आणि 24७7 सहाय्यक सेवा यामुळे ही नवी सुविधा एचएसआर लेआउट व बेंगळुरूतील रहिवाशांसाठी विश्वासार्ह आरोग्य गंतव्य ठरणार आहे.

## सालईमेंढा येथील शेती शाळा वेळेवर रद्द केल्याने ग्रामस्थ भडकले

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १८ :

तालुक्यातील सालईमेंढा येथे आयोजित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची शेती-शाळा ग्रामस्थ पोहचल्यानंतर कृषी मंडळ अधिकाऱ्यांनी वेळेवर रद्द केल्याने आपली कामे सोडून या कार्यशाळेत आलेले ग्रामस्थ चांगलेच भडकले. त्यांनी याची तक्रार तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे केली असून अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. बुधवारी( १७) सालईमेंढा येथे तालुका कृषी विभागाकडून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. नियोजित वेळेत या भागातील शेतकरी या कार्यशाळेला पोहचले. मात्र त्यांना तिथे उपस्थित सहायक अधिकाऱ्यांनी" मंडळ अधिकाऱ्यांकडून नुकताच भ्रमणध्वनी आला होता व ही कार्यशाळा रद्द करण्यात आल्याचे सांगितले."त्यामुळे आपली सर्व कामे व रोजी सोडून आलेले शेतकरी संतापले. सदर मंडळ कृषी अधिकारी हे बेजबाबदार असून शेतकऱ्यांना त्यांनी आधीच सभा रद्द झाल्याच्या सूचना द्यायला पाहिजे होती. हे अधिकारी गावामध्ये येत नाहीत. शेतकऱ्यांना कुठलीही माहिती देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण होत असून या अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी येथील शेतकरी धर्मेंद्र देवगडे, राजेंद्र इरपाते,दीपक अडबैले, सुरेश कोवे, शांताराम नागोसे आदींनी या तक्रारीत केली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १८ :

ग्राम पंचायत गुमथळा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विशेष ग्राम सभेचे आयोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्र पिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पंधरवाडा कार्यक्रम यामध्ये १)पहिल्या टप्प्यात :- पांदन रस्ते विषय मोहीम २ ) दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे घरांचे पत्ते पाटप ३ ) तिसऱ्या टप्पा जिल्हाधिकारी यांनी स्थनिक परिस्थितीचा विचार करून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे.



उपस्थित कामठी तहसीलचे तहसील दार गणेशजी जगदाळे, माजी जिल्हा परिषद विरोधी पक्षनेता अनिलजी निधन नायब तहसीलदार राजाराम बमनोटे सरपंच प्रणालीताई डाफ, महेशजी काकडे ग्रा.पं.सदस्य योगेशजी डाफ, कोमलजी तट्टे, मनोहरजी आगलावे, आकाशजी डाफ, रेखाताई भोयर, सीमाताई चवरे, मीनाताई डाफ, पिंकीताई मोहोड, कविताताई डाफ, ग्राम पंचायत अधिकारी सचिन खोडे ,पोलीस पाटील प्रवीण निबुळकर, मंडळ अधिकारी दुरुगवार तलाठी अमोल वावरे, वैद्यकीय अधिकारी मॅडम, कृषी सहाय्यक मखमले, पाटोले मॅडम, अंगणवाडी सेविका मंदा कापले, मुन्नीबाई प्रजापती, शोभा इरपाते, बचत गटाचे महिला भारती वाघ, वैशाली शिवनकर, सरिता धुळसे, आशा सेविका सीमा आगलावे, वृंदा दाउस्कर, मंगला पेठे, दिलीप मुळे सुरेश, रामटेके शंकर डाफ, नरेश डाफ, गजानन भाकरे रवींद्र लांडे, सूर्यभान वानखेडे, किशोर डाफ युवराज काकडे,रामजी कांबळे, विठ्ठल भाकरे अशोक लोणारकर विलास ब्राम्हणकर, रमेश राउत रामदास उपरीकर दुलीचंद सहारे, आकाश धूळसे ,भीमराव काकडे,अनेक नागरिक या सभेला व कार्यक्रमाला उपस्थित होते.

येत्या काही दिवसात गणपती नगर येथील लोकांना घराचे पट्टे वाटपाचा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचा हस्ते घेणार असे आवाहन केले.

# नवरात्र उत्सव पवित्र व सुरक्षित ठेवण्यासाठी अश्लील गाण्यांवर बंदीची मागणी

## विश्व हिंदू परिषद- बजरंग दल, हिंगणा प्रखंडाचे वाडी पोलिस ठाण्यात निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

सोमवारपासुन सुरु होणाऱ्या नवरात्र महोत्सवात धार्मिकतेचे व परंपरेचे पवित्र वातावरण अबाधित राहावे, यासाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, हिंगणा प्रखंडाच्या वतीने वाडी पोलीस स्टेशन येथे निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नवरात्रीदरम्यान निघणाऱ्या शोभायात्रा तसेच गरबा उत्सवांमध्ये डीजेवर अश्लील, अभद्र व फिल्मी गाणी वाजविण्यास कडक मज्जाव करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. तसेच गरबा मंडळांनी पावित्र्य राखत कोणत्याही प्रकारे धर्मभावना दुखावल्या जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन संघटनांकडून करण्यात आले.



यावेळी आयोजक समित्यांनी पोलिस प्रशासनासोबत समन्वय साधून सुरक्षा व्यवस्था बळकट करावी, गरबा मैदानांमध्ये असामाजिक प्रवृत्तीचे लोक प्रवेश करू नयेत, महिलांवर छेडछाड अथवा अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना निवेदनातून देण्यात आल्या. निवेदन स्वीकारताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांनी संघटनांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत नवरात्र महोत्सव शांततेत, पारंपरिक व सुव्यवस्थित पार पडण्यासाठी पोलिस प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी खात्री दिली. यावेळी वि.हिं.प उमरेड जिल्हा सहमंत्री जितेश गोरडे, उपाध्यक्ष रवी अजित, जिल्हा कोषाध्यक्ष विशाल जाधव, गौसंवर्धन व गौरक्षक जिल्हा प्रमुख अजय पाटणे , प्रखंड मंत्री पवन बर्वे, बजरंग दल संयोजक शिवम राजे, सह संयोजक संदीप मानकर गौरक्षक प्रमुख गौरव उगले, राजेश बनकर, हिराचंद शेंडे, नीलम देवतळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# सेंट क्लेरेट शाळेच्या खेळाडूंनी किक बॉक्सिंगमध्ये मिळवले उत्कृष्ट यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

बुट्टीबोरी येथील टाकलघाटच्या शिंगारे हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या डीएसओ जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत सेंट क्लेरेट शाळेच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून शाळेचे नाव उजळले.ही स्पर्धा स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया - डीएसओ जिल्हा क्रीडा कार्यालय आणि नागपूर किकबॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त तत्वावधानात पार पडली. स्पर्धेत सेंट क्लेरेट शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध वर्गांमध्ये पदके जिंकून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

प्रथम क्रमांक (आमगाव, गोंदिया जिल्ह्यात होणाऱ्या विभागीय टप्प्याच्या स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू) लावण्या मकोडे,रुद्र भोंयर, देवांशु डाबुरकर, सानिका बेले, द्वितीय क्रमांक अथर्वी कांबले, दीपक भोंयर शाळा व्यवस्थापनाने विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विजेत्या खेळाडूंनी ही यशस्वी कामगिरीसाठी प्राचार्य फादर मार्टिन डिसूझा, व्यवस्थापक फादर फ्रान्सिस, फादर डायोनिस, मुख्य प्रशिक्षक सुमित नागदवने सर, सिस्टर्स, शिक्षकवृंद, गैरशिक्षण कर्मचारी आणि त्यांच्या पालकांचे आभार मानले आहेत.

# नागपूर मंडळ रेल्वे रुग्णालयात स्वस्थ नारी सशक्त परिवार कार्यक्रम आयोजित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

नरेंद्र मोदी यांच्या महिला सशक्तिकरण व सामाजिक कल्याणाच्या संकल्पनेनुसार, नागपूर मंडल रेल्वे रुग्णालयात 17 सप्टेंबर 2025 रोजी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत बहुविशेषज्ञ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मंडल रेल्वे व्यवस्थापक श्रविनायक गर्ग व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला



गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शिबिराचे उद्घाटन मंडल रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या हस्ते, सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ अध्यक्षा दीपा गर्ग तसेच इतर मान्यवर सदस्यांच्या उपस्थितीत झाले. या उपक्रमाचा उद्देश महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि प्रतिबंधात्मक उपायांचा प्रसार करणे हा होता. जी पूर्णपणे महिला डॉक्टर व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांनी केली. स्वस्थ नारी, सशक्त परिवार या संकल्पनेला या उपक्रमातून बळकटी मिळाली. शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी, कॅन्सर तपासणी (मुख, स्तन, गर्भाशय ग्रीवा), ईएनटी, दंत, मनोरोग, नेत्र, त्वचारोग यांचे विशेष सल्लामसलत तसेच पोषण, मातृ आरोग्य, मासिक पाळी स्वच्छता, प्रजनन आरोग्य आणि मानसिक आरोग्यावरील मार्गदर्शन करण्यात आले. जागृती पोस्टर व शैक्षणिक व्हिडिओच्या माध्यमातून रोगांचे प्रतिबंध आणि लवकर निदान यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांची टीम–डॉ. निर्मला गुप्ता (ईएनटी), डॉ. अरुंधती देशमुख (दंत), डॉ. शुभांगी साखरे व डॉ. प्रीती देवतरे (स्त्रीरोग), डॉ. अरथी फापे (मनोरोग), डॉ. नालंदा गडकरी (त्वचारोग), डॉ. सायली उराडे (नेत्ररोग), व डॉ. दिपाश्री जाधव (पॅथॉलॉजी)–यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. हा उपक्रम महिलांच्या सर्वांगीण आरोग्य आणि सशक्तिकरणासाठी मध्य रेल्वेच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

# मनपातर्फे प्रबोधनकार ठाकरे यांना विनम्र अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

थोर समाजसुधारक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य नेते, सामाजिक लढ्याचे नेतृत्त्व करणारे केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित छोटेखानी समारंभात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी मनपाचे उपायुक्त राजेश भगत, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, रसिका पालकर यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# ठाणेदारांच्या तैनातीत फेरबदल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी बुधवारी सायंकाळी काही ठाणेदारांच्या तैनातीत फेरबदल केले. हुडकेश्वरचे ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर यांना आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा (ईओडब्ल्यू)मध्ये पाठविण्यात आले आहे. त्यांच्या जागेवर इमामवाडाचे ठाणेदार हृदयनारायण यादव यांच्याकडे हुडकेश्वर ठाण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर यादव यांच्या जागेवर नंदनवन ठाण्याचे दुय्यम निरीक्षक जयवंत पाटील यांना इमामवाड्याचा ठाणेदार बनविण्यात आले आहे. सक्करदराचे ठाणेदार मुकुंद ठाकरे यांनाही ईओडब्ल्यूमध्ये पाठविण्यात आले आहे. त्यांच्या जागेवर वाहतूक शाखेचे प्रमोद पोरे यांना ठाणेदार म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

# साई इंटरनॅशनल स्कूलमध्ये हिंदी दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १८ :

साई इंटरनॅशनल स्कूल, परसोडा, रामटेक येथील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी हिंदी दिवस साजरा करण्यात सक्रिय सहभाग घेतला. यूएसओ क्लबच्या बॅनरखाली विद्यार्थ्यांनी हिंदी पखवाड्याचा आनंद घेतला. त्यांनी सुंदर हस्ताक्षर उपक्रम, पोस्टर मेकिंग, वाचन उपक्रम, हिंदी पठण, चार्ट मेकिंग उपक्रम अशा विविध उपक्रमांमध्ये भाग घेतला. विद्यार्थ्यांनी भाषणे दिली आणि हिंदीचे संपर्क भाषा म्हणून महत्त्व अधोरेखित केले. कल्याणी यादव यांनी कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या भव्य यशासाठी अर्चना चौबे,अर्चना दुबे, ममता नागपुरे यांनी परिश्रम घेतले.




वरिष्ठ प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी दिग्गज कवी गोपालदास नीरज, डॉ. हरवंशराय बच्चन, मुन्शी प्रेमचंद, माजी पंतप्रधान भारतरत्न दिवंगत अटल बिहारी वाजपेयी, अमृता प्रीतम, महादेवी वर्मा यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की हिंदी ही जगातील एकमेव वैज्ञानिक भाषा आहे. शैक्षणिक प्रभारी वर्षा महाजन यांनी आभार मानले.

शाळेचे संचालक डॉ. व्ही.बी. नागपुरे यांनी शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व सहभागींचे अभिनंदन केले.

# सेवा हे सर्वोच्च कर्तव्य अभियानाचा दवलामेटी ग्रामपंचायतीत शुभारंभ




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात ग्रामपंचायत दवलामेटी येथे सेवा हे सर्वोच्च कर्तव्य या भावनेतून विविध उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान तसेच स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात आले. सकाळी गावात वृक्षदिंडी काढून ग्रामस्थांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यानंतर गावातील पाणंद रस्त्यावर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी फिरते सेतू केंद्र तसेच नेत्र तपासणी शिबिराचे लोकार्पण देखील करण्यात आले. स्वच्छता मोहिमेद्वारे संपूर्ण गावात स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच गजानन रामेकर, उपसरपंच अर्चना चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी सरला चिमोटे, सदस्य सतीश खोब्रागडे, प्रकाश मेश्राम, महिला सदस्य शकुंतला अभ्यंकर, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य पथक, पोलीस पाटील तसेच सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी होणार असाक्षरांची परिक्षा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १८ :

नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत असाक्षरांची होणारी चाचणी २१ सप्टेंबर रोजी म्हणजे पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी होणार असल्याने असाक्षर, शिक्षक व मुख्याधापकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील दोन वर्षापासून संपूर्ण राज्यात नवभारत साक्षरता अभियान सुरू असून यापूर्वी असाक्षरांच्या दोन परिक्षा घेण्यात आल्या. असाक्षरासाठीची ही तीसरी संधी आहे. परंतू ही परिक्षा पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी असल्याने ग्रामीण भागातील असाक्षर परिक्षेला उपस्थित राहण्याची शक्यता कमी आहे. पितृमोक्ष अमावस्या हा दिवस धार्मिक सण म्हणून पाळला जातो. विशेषता हिंदू धर्मात या दिवशी श्राद्ध पुजा असते, त्यामुळे ग्रामीण भागात या दिवशी लोक घराबाहेर पडत नाही, त्यामुळे या दिवशी असाक्षर लोक परिक्षेला उपस्थित राहतील.

# अनागरिका धम्मपाल जयंती नागपूर येथे साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

संविधान चौक, नागपूर, येथे अनागरिका धम्मपाल जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कमलताई गवई (अमरावती) , डॉ.कार्यक्रमाचे विशेष अतिथी ,बौद्ध गया येथील महाबोधी महाविहार



मुक्ती आंदोलनाचे प्रमुख, डॉ.आकाश लामा, भदंत डॉ.चंद्रकित्ती, डॉ.चंद्रबोधी पाटील, भीमराव आंबेडकर, भदंत करुणाकर,भदंत सुमितपाल, श्रामनेर विनाचार्य, सुनील सारिपुत्ता, विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते.तर कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन भदंत धम्मशिखर, प्रकाश तत्त्वज्ञ, शंकर डेंगरे, भदंत धम्मतप, भदंत नागदीपंकर, भदंत श्रद्धामित्र यांचे लाभले.

कार्यक्रमात विशेष उपस्थिती : भदंत शीलवंश, भन्ते प्रज्ञाशील, भदंत ज्ञानबोधी, गणवीर वानखेडे, ए.के. झिंबाजी, पद्माकर गणवीर, भिक्षु नागधम्मरखी, अशोक जांभुळकर, निर्भय बागडे, उषा बुद्ध, सरोज राजवर्धन, डॉ. सरोज आगलावे, पुष्पा बुद्ध, तक्षशीला वाघधरे, छाया खोब्रागडे, सुनीता मेश्राम सह अनेक उपस्थित होत्या.

# जनता हायस्कूल खैरगावची विद्यार्थिनी वेटलिफ्टिंगमध्ये अव्वल



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. १८ :

जिल्हा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर द्वारा आयोजित नागपूर मनपा स्तरीय आणि जिल्हा स्तरीय शालेय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धा सन २०२५-२०२६ वयोगट १७ वर्षा खाली मुले/मुली वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धा दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी आर्यन स्पोर्ट्स अकॅडमी धवड पॉलिटेक्निक कॉलेज नागपूर येथे आयोजित करण्यात आली. जनता हायस्कूल खैरगाव ची विद्यार्थिनी वर्ग ८ मध्ये शिकणारी प्रत्युंषा सुनील केवटे रा. मोवाड या १७ वर्ष वयोगटातील मुलीने शालेय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत ४८ वजन गटात अव्वल स्थान प्राप्त केले. त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापिका सुषमा साठोणे, संस्थेचे सचिव अनिल साठोणे, शिक्षक कुंभारे, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व मोवाड शहरातील नागरिकांनी या मुलीचे अभिनंदन व कौतुक केले.

# नागपूर ईतवारी मंडळात स्वच्छता मोहीम सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

भारताचे पंतप्रधान आणि जगातील लोकप्रिय नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त, १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीपर्यंत देशभरात सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे.

नागपूर शहर भाजपच्या वतीने, भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या आदेशानुसार, मध्य नागपूरचे आमदार प्रवीणजी दटके यांच्या मार्गदर्शनाखाली, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा या बॅनरखाली भाजप मध्य नागपूर इतवारी मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागांमध्ये वॉर्ड अध्यक्ष, माजी वॉर्ड नगरसेवक आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी स्वच्छता मोहीम आयोजित केली. नाईक तलाव, लेंडी तलाव, तांडापेठ, बार्सेनगर, जगन्नाथ बुधवारी मस्कासाथ, आइचित मंदिर, जुने मंगळवारी, चितेश्वर वॉर्ड परिसरात स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेमध्ये



भाजपा मध्य नागपूर इतवारी मंडळाचे अध्यक्ष श्यामजी चांदेकर, स्वच्छता अभियान समन्वयक माजी नगरसेवक भास्कर पराते, उपाध्यक्ष रामभाऊ अबुलाकर, माजी उपमहापौर दिगबर बुरडे, राहुल जैन, रितेश पांडे, निकिता पराये, स्वप्नील फुलसुंगे, कल्पना मानापुरे, सचिन काटे, अक्षय काळे, मोरेश्वर वानखेडे, नानू धकाते, गणेश मौंदेकर, संदीप तामने, अमोल सावरकर, दुर्गेश घाटोळे, चंदू बाघ, बामन पार्वे, गिरधारी निमजे, दशरथ मस्के, बाळा पळसापुरे, मनोज पत्रे, जयंत पाध्ये, राहुल हरडे, अनिल रणदिवे, विजय खंडे, राजू कानोजिया, गोपाल घुले, जयकिशन हेडाऊ, गजानन खापरे, नामदेव बांगडे, गजानन कुंभारे, अनिल सुने, कृष्णा पौणीकर, सोनू वर्मा, हेमंत नंदणवार, प्रशांत दुर्गे, न्यानेश्वर बारापात्रे, विजय फुलसुंगे, बामन राऊत, जय पराते, उषा बेले, प्रतिभा सावरकर, बलय केदार, प्रवीण रेवतकर, राकेश गोखले, विक्की मंडलिक, स्वप्निल बेलखोडे, कृष्णा उमाटे, पूर्व पार्षद, पुष्पा पाठराबे, सारिका खंडे, कल्पना बावणे, जया उमरेडकर, संजय शेंडे, लक्ष्मण पाठराबे, सतीश कुंभारे, सुहास उमरेडकर, यश पांडे, श्रीकांत ठाकरे, आकाश धार्मिक, नितीन निमजे मनोहर मौंदिकर, पिंटू हेडाऊ, पार्डीकर, माजी नगरसेवक श्रवण खापेकर, बादल राऊत, हेमंत बरडे, राजुभाऊ बरडे, राजुभाऊ सुभेदार, राजेंद्र कुंभारे, सरचिटणीस आशिष भुते, तुषार लारोकार सहभागी झाले होते.

# निधन वार्ता

## सुनंदा पाटील



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १८ :

दत्तवाडीतील सत्य साई सोसायटी निवासी सुनंदा अशोक पाटील यांचे निधन झाले. त्या ६२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुले प्रदिप, संदिप, मुलगी , जावई, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी टेकडीवाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

## गजानन पौनीकर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

इतवारी येथील लालगंज गुजरी, येथील रहिवासी गजानन खिरुदुजी पौनीकर यांचे निधन झाले. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ रोजी गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# युडीआयडी कार्डपासून वंचित दिव्यांगांसाठी विशेष शिबीर

## मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांचे निर्देश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आलेल्या दिव्यांग सर्वेक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या युडीआयडी कार्ड पासून वंचित दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी २२ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. यासंदर्भात संबंधित विभागांशी योग्य समन्वय साधून कार्यवाही करावी, असे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

दिव्यांगांचा एकत्रित डाटा संकलीत करण्यासाठी मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने महात्मा गांधी सेवा संघ यांच्या माध्यमातून आशा सेविकांमार्फत दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार युडीआयडी कार्ड पासून वंचित दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्याकरिता एसोपी निर्धारित करण्याकरिता गठीत समितीची बैठक गुरुवारी (ता.१८) पार पडली.

मनपा आयुक्त यांच्या सभाकक्षात झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उपायुक्त डॉ. रंजना लाडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, डॉ. स्नेहल शंभरकर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. धर्मेंद्र मिश्रा, डॉ. समता भटनागर, मनपा अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चे प्रकल्प समन्वयक अभिजीत राऊत आदी उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात मनपाच्या माध्यमातून लोकोमोटर प्रकारचे दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्यात येणार आहे. सर्वेक्षणात शहरामध्ये २४ हजार ६३८ संभाव्य दिव्यांग असलेल्याचे निदर्शनास आले. यातील ९४७६ दिव्यांगांकडे युडीआयडी कार्ड आहे. तर १५ हजार १६२ दिव्यांग कार्ड पासून वंचित आहेत. कार्ड नसलेल्या या संभाव्य दिव्यांगांची तपासणी करून युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी प्रारंभी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये विशेष शिबीर २२ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. ५० वर्षाखालील युडीआयडी कार्ड नसलेल्या लोकोमोटर प्रकारातील दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींकरिता प्राधान्याने हे शिबीर असणार आहे. टप्प्याटप्प्याने पुढे देखील शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. यासंदर्भात नागपूर महानगरपालिका द्वारा लाभार्थी दिव्यांगांना झोननिहाय फोन व मेसेज द्वारे माहिती दिली जाणार आहे. मेसेजमध्ये कार्ड करिता आवश्यक कागदपत्रांची यादी व लोकेशन असावे, असे आयुक्तांनी नमूद केले. जास्तीत जास्त दिव्यांगांचे कार्ड काढण्याबाबत सुरळीत प्रक्रिया व्हावी यासंदर्भात भेडसावणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने दिव्यांग विभागाच्या आयुक्तांशी पत्रव्यवहार करण्याबाबत आयुक्तांनी सूचित केले.

# वेळेवर उपचार न मिळाल्याने नवजात बाळाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १८ :
येथील ग्रामीण रुग्णालयात रानमांगली येथील दर्शना नेपाल मानेगुरूदे ह्या महिलेला प्रसूती करीता रविवार (ता. १४) ला दाखल करण्यात आले. सोमवारला बाळाला जन्म दिला बाळाचं वजन १ किलो ९२५ ग्रॅम इतके होते. जन्मानंतर डॉक्टरांनी बाळ सुरक्षित असल्याचे सांगितले, मात्र त्यानंतर उपचारात मोठी हलगर्जी झाली व नागपूरला नेते असतांना मंगळवारला बाळाचा मृत्यू झाला.

सविस्तर वृत्त असे की मौदा वरून १० किलोमीटर अंतरावर असलेल्या मुळगाव रानमांगली येथील महिलेला प्रसूती करीता ग्रामीण रुग्णालय मौदा येथे दाखल करण्यात आले. सोमवार ला संध्याकाळी १० वाजल्यापासून बाळ दूध पित नव्हता. रात्री १२:३० ते सकाळी ७ पर्यंत डॉक्टर शाहबाज व नर्स शिल्पा बाळाकडे लक्ष देण्यासाठी आलेच नाहीत.

रात्री १:३० वाजता बाळ जोरजोरात रडत असतानाही नातेवाईकांनी मदतीसाठी हाका मारल्या, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. सकाळी ७ वाजता डॉक्टरांनी हातानेच बाळाला तपासले व तो व्यवस्थित असल्याचं सांगितले. व बाळाला केवळ औषध देण्यात आले. सुमारे ८ वाजताच्या सुमारास त्याच डॉक्टरांनी तपासणी करून बाळाला नागपूरला रेफर करण्याचा सल्ला दिला.असे सामाजिक कार्यकर्ता राकेश वाघमारे यांनी सांगितले.

**डॉक्टर व नर्सचा निष्काळजीपणा....**
डॉक्टर व नर्सच्या निष्काळजीपणामुळे बाळाचा मृत्यू झाला. बाळाला काय झाले काय नाही याची कल्पना आम्हाला नव्हती. डॉक्टर व नर्स यांनी काहीही कळवले नाही. बाळ जन्मताच बाळाची प्रकृती बरोबर नाही त्यामुळे आपण यांना भंडारा किव्हा नागपूरला रेफर करावे असे डॉक्टर यांनी सांगितले नाही. ह्या दवाखान्यात कोणताही उपचार यांनी केला नाही त्यामुळे माझ्या बाळाचे जीव गेला अशी प्रतिक्रिया बाळाच्या आई दर्शनाने दिली.

**रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध नाही.....**
दोन तासांहून अधिक वेळ रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली नाही. प्रोटोकॉलनुसार १०२ उपलब्ध नसल्यास १०८ वाहनाने रुग्णाला हलवता येतो, परंतु वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तम पाटील यांनी याकडे अजिबात लक्ष दिलं नाही. शेवटी नातेवाईकांनी प्रायव्हेट वाहनाची व्यवस्था करून बाळ व आईला नागपूर येथे नेण्यात आले. परंतु नागपूरमध्ये डॉक्टरांनी तपासणी करून सांगितले की बाळाचा मृत्यू अर्धा तास आधीच झालेला होता.

*** ग्रामीण रुग्णालयात बालरोगतज्ज्ञ नाही.....**
मौदा ग्रामीण रुग्णालय नागपूर व भंडारा शहराच्या मध्यभागी आहे. महिला प्रसूती ह्या दवाखान्यात होत असतात. परंतु रुग्णालयात बालरोगतज्ज्ञ (पेडियाट्रिशियन) उपलब्ध नसून केवळ ११ महिन्याच्या ट्रेनींग वर असलेले शिकाऊ जनरल डॉक्टरकडून सर्व उपचार केले जातात. त्यामुळे गंभीर नवजात बाळांच्या उपचारात मोठी हानी होत असल्याचं सामाजिक कार्यकर्ता राकेश वाघमारे यांनी सांगितले.

स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत सांगितलं की याआधीही अशाच निष्काळजीपणामुळे लहान मुलांचे मृत्यू या रुग्णालयात झालेले आहेत. तरीही प्रशासनाने आतापर्यंत कुठलीही ठोस कारवाई केलेली नाही. असे मत राकेशवाघमारे यांनी दर्शविले.

**भविष्यासाठी नागरिकांची मागणी......**
सदर घटनेनंतर नागरिक व नातेवाईकांनी मागणी केली की ग्रामीण रुग्णालयात आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. भविष्यात कोणत्याही रुग्णाला योग्य सुविधा नसताना उपचार होऊ नये. जर आपल्याकडे सुविधा नाही तर रुग्णांना वेळेवर भंडारा किंवा नागपूर ला रेफर करावे. अशी नागरिकांनी मागणी केली.



### शोभेची वस्तू बनले ग्रामीण रुग्णालय

मौदा हे मोठे शहर असून तालुक्यात १२८ गावाचा समावेश आहे. त्यातच कामठी तालुका तील काही गावाचे रुग्णांना ह्या दवाखान्याची गरज भासते. मौदा शहरातून महामार्ग गेला आहे. ह्या महामार्गावर दररोज कोणते ना कोणते अपघात होत असतात. मौदा मधोमध असल्यामुळे रुग्ण दवाखान्यात आणले जातात. परंतु डॉक्टर, नर्स व यंत्रणा याची उणीव असल्यामुळे रुग्णांना भंडारा किव्हा नागपूर येथे रेफर करावे लागते. त्यामुळे अनेक रुग्णांना जीव गमवावे लागले आहे. रुग्णालयाची फक्त इमारतच दिसते. येथे साध्ये उपचार सुद्धा होत नाही अशी प्रतिक्रिया राकेश वाघमारे यांनी दिली.



■ नागपूर : गोंड गोवारी समाजाच्यावतीने आज गुरूवारी येथील संविधान चौकात त्यांच्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विदर्भाच्या विविध भागातून आलेले समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात महिलांची संख्याही लक्षणीय होती.

# माणुसकी सुरक्षा रक्षक सेनेनी घेतली मुख्यमंत्र्यांच्या सहसचिवांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
माणुसकी सुरक्षा रक्षक सेनेच्या वतीने भारतीय प्रबंध संस्थान मिहान नागपूर तेथे कार्यरत असेलेल्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांची सेवा दि.15/10/2025 पासुन बंद करण्यात यावी असे पत्र दि.11/9/2025 ला काढुन सुरक्षा रक्षक मंडळाला कळविण्यात आले होते.

त्यांचा संघटनेच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला व याविषयी मुख्यमंत्री यांच्या सहसचिव आशा पठान यांना संघटनेच्या वतीने निवेदन देऊन त्या विषयावर चर्चा करण्यात आली.तसेच सुरक्षा रक्षक मंडळाचे सचिव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. व या विषयावर कायदेशीर रीत्या मंडळाची बाजु घेऊन सदर आस्थापनेने काढलेले पत्र कसे रद्द करता येईल याचा प्रयत्न करावा असे संघटनेच्या वतीने त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व त्यांनी सकारात्मक रेस्पॉन्स देत आश्वस्त केले की सदर आस्थापनेला मिटिंग मध्ये मार्ग काढला जाईल असे सांगण्यात आले.



# हुंड्यासाठी विवाहितेची आत्महत्या

**पतीसह सासरच्यांवर गुन्हा दाखल**

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :
लग्नानंतर एका कुटुंबाने सुनेचा इतका मानसिक आणि शारीरिक छळ केला की, तिने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. स्वतःला जाळून घेत तिने या त्रासापासून कायमची सुटका करून घेतली. ही संतापदायक घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी तिच्या पतीसह सासरच्यांवर हुंडाबळीचा गुन्हा नोंदविला आहे. आकाश प्रकाश शहारे (३०), प्रकाश शहारे (५३), अल्का प्रकाश शहारे (४५) आणि मोंटू प्रकाश शहारे (२५) अशी आरोपींची नावे आहेत.

आकाशची पत्नी पायल (२८) ही मुळची तुमसर येथील रहिवासी होती. १९ मे २०१९ रोजी पायलचे वडील सूरजलाल अंबादे यांनी रितिरिवाजासह तिचे आकाशशी लग्न लावून दिले होते. लग्नावेळी त्यांनी त्यांच्या परिस्थितीनुसार धुमधडाक्यात लग्न केले आणि सासरच्यांची प्रत्येक मागणी पूर्ण केली. मात्र लग्नाच्या काही दिवसानंतरच सासरच्यांनी पायलला पुन्हा घरून हुंडा आणण्यासाठी त्रास देण्यास सुरूवात केली. तिच्यावर सतत वडिलांना पैसे मागून आणण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता. नकार दिल्यास पती आकाश आणि त्याचे कुटुंबीय पायलचा शारीरिक आणि मानसिक त्रास देत होते. याबाबत पायलने कुटुंबीयांनाही माहिती दिली होती. मात्र त्यानंतरही पायलचा छळ सुरूच होता. अखेर १३ सप्टेंबरला पायलने अंगावर डीझेल ओतून आग लावली.

# ३.६८ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :
चोरांनी दिवसाढवळ्या एका घराचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांसह ३ लाख ६८ हजारांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरती रमेश कश्यप (४८) रा. गोविंद अपार्टमेंट, लक्ष्मीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

आरती एमआयडीसीतील स्नेहदीप स्ट्रक्चर कंपनीत अकाऊंट मॅनेजर आहेत. त्यांचे पती रमेश हे जयपूर येथे नोकरी करतात.

बुधवारी आरतीच्या एका नातेवाईकाचे निधन झाले होते. सकाळी ९ वाजताच्या सुमारास आरती घराला कुलूप लावून नातेवाईकाकडे रेवतीनगर येथे गेल्या होत्या. या दरम्यान चोरांनी कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख १ लाख आणि ७८ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. दुपारी २.३० वाजताच्या सुमारास आरती घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. दिवसाढवळ्या चोरीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

# महामार्गाच्या संथ कामामुळे फेटरीतील घरांमध्ये पाणी



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १८ :
नागपूर तालुक्यातील फेटरी गावातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे रस्ता रुंदीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने काल संध्याकाळी झालेल्या मुसळधार पावसाचे पाणी थेट घरांमध्ये घुसले. त्यामुळे दुकाने, हॉटेल्स व जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. नागपूर शहराबाहेरील बाह्यवळण मार्ग ते काटोल रोड चौकादरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम हायकोर्टाच्या आदेशानुसार सुरु आहे. गोरेवाडा जंगलातून जाणारा रस्ता पूर्ण झालेला असला तरी गेल्या चार महिन्यांपासून बाह्यवळण जंक्शन ते माहुरझरी फाटा या दीड किलोमीटर अंतरावरील काम मात्र कासवगतीने सुरू आहे.

फेटरी गावाच्या मधोमध असलेल्या या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नाल्यांचे खोदकाम केले असून त्यातील मातीचे ढिगारे गेल्या दीड महिन्यापासून रस्त्यालगत टाकून ठेवले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी अडवले जाऊन लगतच्या घरांमध्ये शिरते आणि मोठे नुकसान घडते. कालच्या पावसामुळे महामार्गाच्या सखलभागात पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.

महामार्ग प्राधिकरणाकडून होत असलेल्या या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थ संतप्त झाले असून पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी ठाम मागणी सरपंचांसह संपूर्ण फेटरी ग्रामवासियांनी केली आहे.

**महासागर प्रभाग वार्ता**

# स्त्यावर पाळीव कुत्र्यांचे शौच एक सार्वजनिक समस्या

प्रमोद जांभूळकर
नागपूर दि. १८
प्रभाग क्रमांक २ इंदोरा आजच्या आधुनिक शहरी जीवनशैलीचा अविभाज्य भाग म्हणजे पाळीव प्राणी, विशेषतः कुत्रा. माणसाचा सर्वात विश्वासू मित्र म्हणून ओळखला जाणारा कुत्रा शहरी कुटुंबाचा भाग बनला आहे. मात्र या स्नेहात सामाजिक आणि आरोग्यविषयक जबाबदाऱ्या ही तितक्याच महत्त्वाच्या ठरतात. दुर्दैवाने, अलीकडील काळात इंदोरा परिसरासारख्या शहरी भागांमध्ये सकाळ-संध्याकाळ कुत्र्यांना फिरवताना त्यांच्या शौचासंदर्भातील समस्येचे प्रमाण वाढले आहे.या विषयी अजय सहारे म्हणतात रस्त्यांवर कुत्र्यांचे मलमुत्र फुटपाथ, उद्याने, सार्वजनिक रस्ते अस्वच्छ करतात. त्यातून दुर्गंधी पसरते आणि नागरिकांना चालणेदेखील कठीण होते.सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण झाले आहे.हरीश चौबे यांचे मत आहे की स्वच्छ भारत अभियानाच्या पार्श्वभूमीवर अशा अस्वच्छतेमुळे प्रयत्नांना मोठा अडथळा निर्माण होतो. यामुळे त्वचारोग, जठराचे विकार व श्वसनाचे त्रासही वाढण्याची शक्यता असते, विशेषतः लहान मुलं आणि वृद्धांसाठी.देवानंद पानतावणे सांगतात या समस्येमुळे नागरिकांमध्ये मतभेद, तक्रारी आणि पाळीव प्राण्यांविषयी नकारात्मक भावना वाढत आहेत.हरीश सहारे पुढे सांगतात, महानगरपालिकांनी काही ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना फिरवताना मास्क लावणे अनिवार्य केलं आहे. तसेच शौचासाठी वापरण्यात येणारे संकलन साधन (बाळगणे बंधनकारक आहे.सत्यजित लांजेवार म्हणतात, नियम तयार झाले आहेत, पण त्याची अंमलबजावणी अजूनही प्रभावी नाही. नागरिक शिस्तीत वागायला तयार नाहीत. जनजागृतीची गरज आहे. त्यासाठी पोस्टर्स, माहितीपत्रके आणि समाजमाध्यमांद्वारे मोहीम राबवण्यावर भर दिला जात आहे.पण नियमाची पायमल्ली होतांना दिसत आहे.हेमराज जांभुळकर यांचे मत स्पष्ट आहे पाळीव प्राणी पाळणे हा अधिकार आहे, पण त्यासोबतच जबाबदारी देखील आहे. सार्वजनिक स्वच्छता राखणे, इतरांना त्रास न होईल याची खबरदारी घेणे आणि नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.विशाल मांडाळे, करुण तिरपुडे, विश्वजीत मेश्राम, संजय अंबादे, प्रभू गजभिये, राजन शेंडे, प्रमोद लोखंडे, मनोज साखरे, मंगेश नागबौद्ध, राजेश वासनिक, संदीप चौधरी, राजेश राऊत आदींनी दंडात्मक कार्यवाहीची जोरदार मागणी केली आहे. त्यांनी स्थानिक प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



# रमणा मारुती नगर येथे लोकांच्या घरात शिरले पाणी

अंशुल जिचकार,
नागपूर दि.१८
मंगळवारी रात्री नागपूर शहरात झालेल्या धुवाधार पावसामुळे पूर्व नागपूर परिसरातील रमना मारुती नगर येथील जेपी कॉन्व्हेंट परिसरामध्ये लोकांच्या घरात पाणी शिरलेले आढळले. लोकांनी नेहरूनगर झोन येथे अनेकदा संपर्क करून अधिकाऱ्यांना सूचना देण्याचा प्रयत्न केला पण अधिकाऱ्यांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे लोकांच्या घरात घर उंच असून सुद्धा पाणी शिरल्याचे आढळले आहे.
जेपी कॉन्व्हेंट समोरील हसनबाग ते साकोरे चौक येथे सिमेंट रोडचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले त्यामुळे हा रोड खूप उंच झाला आहे व त्यामुळे आजूबाजूच्या वस्त्यांमध्ये पाणी आढळले आहे. सामाजिक कार्यकर्ता राहुल अभंग यांनी सांगितले की त्यांनी नेहरूनगर येथे तक्रार सुद्धा दाखल केलेली होती की या भागातील गटर लाईनचे काम त्वरित करण्यात यावे. पण तरीसुद्धा अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष दिलेले नाही त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागले.



# इंदिरा नगरमध्ये नाल्यावर स्लब नाही; दूषित पाणी वस्तीत शिरले

## नागरिकांच्या आरोग्याला धोका

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि.१८
झोन मंगळवारीतील प्रभाग क्रमांक १ नारा येथील इंदिरा नगर परिसरातील नागरिक सध्या नाल्यामुळे उद्भवलेल्या गंभीर समस्यांना सामोरे जात आहेत. पेट्रोल पंपालगत असलेल्या नाल्यावर अद्यापही स्लब टाकण्यात आलेला नाही, नाल्याची योग्य सफाई झालेली नाही, आणि संरक्षण भिंत देखील अर्धवट अवस्थेत सोडण्यात आली आहे. परिणामी, नाल्याचे घाणेरडे व दूषित पाणी थेट वस्तीत शिरत असून, डास व माशांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.



स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश नागबौद्ध यांनी यासंदर्भात बोलताना सांगितले की, नाल्यावर ना स्लब आहे, ना सफाई झाली आहे, ना संरक्षण भिंत पूर्ण झाली आहे. सर्व काम अर्धवट सोडल्यामुळे दूषित पाणी घराघरात पोहोचत आहे. डास-माश्यांमुळे रोगराई पसरण्याची भीती आहे.याबाबत नागरिक नितीन करवाडे यांनीही प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नाराजी व्यक्त केली असून, तातडीने नाल्याचे काम पूर्ण करून वस्तीत होणाऱ्या दूषित पाण्याचा प्रवाह थांबवण्याची मागणी केली आहे.निखिलेश मेश्नाम ,भगवान लांजेवार ,रोशन गजभिये ,पौर्णिमा नागदेवे ,दर्शना गजभिये ,अर्चना लांजेवार ,संदीप रामटेके ,निलेश शुक्ला ,भारत गोस्वामी नितेश कराडे ,मंगला बागडे ,लोकेश नागदेवे यांनी संबंधित झोन कार्यालय व महानगरपालिकेला त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा नागरिकांच्या आरोग्याशी होणाऱ्या या खेळामुळे आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

# पावर ग्रीड चौक ते बाबा दीपसिंग नगर रस्त्याची दयनीय अवस्था

प्रभू गजभिये,
नागपूर दि. १८
उत्तर नागपुरातील प्रभाग क्रमांक २ मधील पावर ग्रीड चौक ते बाबा दीपसिंग नगर रोडची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यासंदर्भात अनेक वेळा नागपूर महानगरपालिका च्या ऑनलाइन पोर्टलवर तक्रारी दाखल करण्यात आल्या, नागरिकांनी थेट नागपूर सुधार प्रन्यासपर्यंत तक्रार नेली, आणि स्थानिक माजी नगरसेवकांपासून आमदारांपर्यंत सर्व संबंधित लोकप्रतिनिधींना ही समस्या सांगण्यात आली, तरीसुद्धा याकडे कोणीही लक्ष दिलेले नाही. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यामध्ये रस्त्यावरील खड्डे इतके मोठे झाले आहेत की, नागरिकांना रोज अपघातांना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या लोकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. स्थानिक समाजसेवक विवेक सांगोडे यांनी शासन-प्रशासनावर रोष व्यक्त करत विचारले आहे की, शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी प्रभाग क्रमांक २ कडे दुर्लक्ष का करत आहेत? मैक्स बोधि, सेवक पटले, कोमल पटले, नागेश पंधरे, संजू जगताप, मेहुल, सचिन, चंदू कोटांगळे, सुशील मरापे, अजय नागदेवे, रेखा रापतीवार, तेजस्विनी सहारे, प्रीती बोदेले, अश्विनी जनबंधू, सुनीता पटले या नागरिकांनीही आपल्या असंतोषाची तीव्रता व्यक्त केली आहे.स्थानिक नागरिकांनी आता एकच मागणी केली आहे की, प्रभाग क्रमांक २ च्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी आणि नागरिकांना या मूलभूत सुविधेसाठी त्रास सहन करावा लागू नये.

